सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
धाराशिव | रविवार, २ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २४२ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# बबनराव अवताडे शिवसेनेत प्रवेश करणार?

### राजकीय चर्चेला उधाण; आवताडे यांच्या कार्यालयास उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१ नोव्हेंबर-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मंगळवेढ्यात येऊन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष बबनराव आवताडे व खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिध्देश्वर आवताडे त्यांच्या कार्यालयास भेट दिली.

शनिवारी सिध्देश्वर आवताडे यांचा वाढदिवस असल्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवताडे यांचा सत्कार केला. याप्रसंगी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष बबनराव आवताडे, सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे, विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ



भालके, तालुका प्रमुख आबासाहेब लांडे, शहर प्रमुख प्रतीक किल्लेदार, स्वप्नील निकम आदी उपस्थित होते. दरम्यान, या भेटीमध्ये येत्या तीन चार दिवसात बबनराव आवताडे गटाचा शिवसेनेत प्रवेश होणार असल्याचे बोलले जात आहे. बऱ्याच दिवसापासून प्रवेश होणार, अशी चर्चा रंगली होती. यावेळी सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे यांनी आवताडे यांचा प्रवेश घ्यायचा आहे. त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले तीन चार दिवसात प्रवेश करून घेऊ असे आश्वासन यावेळी दिले. दरम्यान, आमदार समाधान आवताडे यांनी दामाजी चौकात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले दामाजी पुतळ्यास एकनाथ शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून शिंदे यांचा ताफा बबनराव आवताडे यांच्या कार्यालयाकडे गेला.



# टेंभुर्णी पोलिसांचा २४ तासांत खुनाचा उलगडा!

### अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १ नोव्हेंबर-**

मौजे रांजणी शिवारातील उजनीच्या मुख्य कॅनलमध्ये सापडलेल्या हातपाय बांधलेल्या अनोळखी युवकाच्या खुनाचा तपास टेंभुर्णी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उलगडला आहे. पोलिसांनी या प्रकरणी तीन आरोपींना अटक करून खुनाचे गूढ उकलले आहे.

३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजण्यापूर्वी उजनी धरणालगतच्या मुख्य कॅनलमध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाचे हातपाय दोरीने बांधून, त्याला दगड लावून पाण्यात फेकण्यात आले होते. प्राथमिक तपासात हा खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर टेंभुर्णी पोलिसांनी जिल्ह्यात तसेच जिल्हाबाहेर मृत व्यक्तीचा फोटो प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाद्वारे प्रसिद्ध करून ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातून मयताची ओळख आश्रम विठ्ठल करंडे (वय ३१, रा. फपाळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर) अशी पटली. सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्याचे वडील विठ्ठल नवनाथ करंडे आणि नातेवाईकांनी मृतदेहाची ओळख पुष्टी केली. गावात चौकशी केली असता मयताला दारूचे व्यसन असल्याचे, तो नेहमी घरातील व बाहेरील लोकांना त्रास देत असल्याचे समोर आले.

तपासादरम्यान पोलिसांनी मृताचा भाऊ रणजित उर्फ सौरभ विठ्ठल करंडे याच्यावर संशय घेतला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आणि त्याचे साथीदार सचिन धर्मा चौधरी व सोमनाथ उर्फ श्याम मोहन तांबे (तिघेही रा. फपाळवाडी, ता. बार्शी) यांनी आश्रम करंडेचा खून केल्याची कबुली दिली. तिघांनी बार्शी जवळील कदमवस्ती परिसरात दाताळाने डोक्यात मारून, नंतर गळा आवळून आश्रम करंडेचा खून केला. त्यानंतर ओळख पटू नये म्हणून हातपाय बांधून, दोरीला दगड बांधून मृतदेह उजनी कॅनलमध्ये फेकण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अटक आरोपींना माढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, त्यांना ७ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर आणि सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप, टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारायण पवार, सपोनि विशाल वायकर, पीएसआय कुलदीप सोनटक्के, अजित मोरे, पुरुषोत्तम धापटे, विलास रणदिवे, प्रदीप पर्वते, संदीप गिरमकर, विलास नलवडे, रमेश जाधव, मोहन तळेकर, सुरज मुलाणी, प्रसाद अनभुळे, प्रकाश जगदाळे, गणेश इंगोले आदी सहभागी झाले होते.

## मूळच्या अहिल्यानगरच्या तेजस्वी सातपुते एसआयटीच्या प्रमुख

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १ नोव्हेंबर-**



फलटण येथील डॉ. संपदा मुंडे मृत्यू प्रकरणी तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वात हे पथक काम करणार आहे. त्यांच्या पथकाला तत्काळ तपास सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेच. तेजस्वी या मूळच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील (शेवगाव) आहेत. मोठ्या जिद्दीने आयपीएस अधिकारी झाल्या असून पोलिस अधीक्षक आणि उपायुक्त (सशस्त्र पोलीस दल उपायुक्त पुणे येथे कार्यरत) म्हणून विविध ठिकाणी त्यांनी काम केलेले आहे. आता या गाजलेल्या, महत्वाच्या आणि तेवढ्याच संवेदनशील गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी सरकारने त्यांच्यावर सोपविली आहे

# महापालिकेचे गाळे, समाजमंदिर, खुल्या जागेचे भाडे थकबाकी वसुली मोहिम उद्यापासून

### विशेष वसुली पथकांची नियुक्ती; अन्यथा सील कारवाई महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने शहर हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मेजर शॉपिंग सेंटर, मिनी शॉपिंग सेंटर, भुई-भाडे (खुली जागा), अभ्यासिका-समाजमंदिर, अधिकृत खोके इत्यादी संपत्तीवरील गाळेधारक व भाडेधारकांकडील थकबाकी वसुली मोहिम सोमवार दि. ३ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी ९ वाजल्यापासून सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती पालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार दि. ३ नोव्हेंबर पासून सकाळी ९ वाजल्यापासून ही मोहिम राबविण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित विभागामार्फत विशेष वसुली पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या विविध शॉपिंग सेंटर आणि खुल्या जागांवर अनेक गाळेधारक व भाडेधारकांकडून दीर्घकाळापासून थकबाकी बाकी आहे. या पार्श्वभूमीवर महसूल वाढ व शासकीय महसूल पुनर्प्राप्तीच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात येत आहे. थकबाकीदार गाळेधारक व भाडेधारक यांनी आपली थकबाकी रक्कम तातडीने भरून मनपाला सहकार्य करावे. अन्यथा महानगरपालिकेकडून गाळे व जागा सील करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. उद्या पासून मेजर गाळ्यासंदर्भात कारवाई सुरु करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या महसूल विभागाने या मोहिमेसाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली असून, सर्व संबंधित अधिकारी व वसुली पथके यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. ही मोहीम सातत्याने राबवून थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्याचा मनपा प्रशासनाचा संकल्प आहे, असेही उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले आहे.

# पालिका कर्मचाऱ्यांसाठी शासनाने दरमहा विशेष निधी द्यावा

### ▸▸धर्मवीर कर्मचारी संघटनेची उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**





सोलापूर महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता मिळत नाही. सोलापूर महापालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याने अडचणी येत आहेत. यामुळे नगर विकास विभागाने सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांसाठी दरमहा सुमारे १० कोटी रुपये विशेष निधी द्यावा या मागणीचे निवेदन धर्मवीर शहर व शहर हद्दवाढ कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना ''धर्मवीर'' संघटनेच्या वतीने त्यांना हे निवेदन देण्यात आले. सोलापुरात धर्मवीर कर्मचारी संघटनेसह विविध संघटनांच्या वतीने महापालिका कर्मचाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात येत आहे. या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण पत्र देण्यात आले, अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी दिली. सोलापूर महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता मिळत नाही. त्यामुळे वारंवार प्रशासनाकडे संघटनेच्या मार्फत शासनाप्रमाणे महागाई भत्ता देणे बाबत निवेदन दिलेलो आहेत. महापालिका प्रशासनाकडे पैसे नसल्यामुळे महागाई भत्ता देऊ शकत नाहीत, अशी अडचण सांगण्यात येते. त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाकडून सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांसाठी विशेष निधी म्हणून कमीत कमी दरमहा ८ ते १० कोटी मंजुर करुन सोलापूर महानगरपालिकेकडे वितरीत करावा. तसे आदेश नगरविकास विभागास द्यावेत, असे धर्मवीर कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी या निवेदनात म्हटले आहे.

# क्रीडा





सोलापूर : राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय जिल्हा कबड्डी स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविलेला विद्या मंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोळाचा संघ. दुसऱ्या छायाचित्रात १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविलेला कै.व.दे.विद्यालय व ज्युनिअर कॉलेज जवळेचा संघ. या कामगिरीवर दोन्ही संघाची पुणे विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली. दोन्ही संघाचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुधद्धचंद्र झपके यांनी अभिनंदन केले.



# रुद्र ॲकॅडमी, शिवस्मारक व ट्रेडिशनल अँड स्पोर्ट्स कराटेच्या ॲथलिटसची कामगिरी

### सोलापूर शहर व पुणे विभागीय शालेय कराटे स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

शालेय कराटे या क्रीडाप्रकारात सोलापूर शहर व पुणे विभाग स्तरावर रुद्र ॲकॅडमी, शिवस्मारक व ट्रेडिशनल अँड स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे सर्व ॲथलिटस आपापल्या वजनीगटात विजेते ठरले.

स्पोर्टस कराटे बॅचची आर्या यादव ही संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाची इयत्ता बारावीमधील विद्यार्थिनी एकोणीस वर्षाखालील मुली बावन्न किलो खालील वजन गटात तर सतरा वर्षाखालील मुले सत्तर किलो खालील वजनगटात ऋतुराज साठे हा बी.एफ. दमाणी प्रशालेचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी राज्य स्तरीय स्पर्धेसाठी विभागाचे प्रतिनिधित्व करतील.सर्व यशस्वी कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय कराटे ॲथलिट आशीयाई पदक विजेती भुवनेश्वरीच्या मार्गदर्शनाने अ स्तरीय राष्ट्रीय पंच व कोच मिहिर सुरेश जाधव तसेच रुद्रच्या सात रस्ता शाखा व दमाणी प्रशालेचे प्रशिक्षक आकाश झळकेनवरु यांनी प्रशिक्षण दिले असून संचालिका रेन्शी संगीता सुरेश जाधव यांचे निर्देश लाभले आहेत.

**शहरस्तरावरील यशस्वी कराटे ॲथलिट:**

अंश सोलसकर (यशोधरा कनिष्ठ महाविद्यालय), तेजस तुरेराव (गांधीनाथा हायस्कूल), तन्मय बहिरवाडे (सिद्धेश्वर इं.मे. स्कूल), कौशल तापडिया (महेश इंमे स्कूल), सिद्धराज कुलकर्णी (संगमेश्वर पब्लिक स्कूल), श्रेयस कवीटकर (मॉडर्न स्कूल), अक्षिता कुलकर्णी (मॉडेल पब्लिक स्कूल), लहर सज्जन, सानवी वाळवेकर (दोघे आय एम एस), शिवम डोईजोडे, क्षितिज जाधव, यशदीप देशपांडे, प्राची ताकभाते, ऋतुजा मोरे, स्वरा ताकभाते (सर्व दमाणी प्रशाला).

## मंगळवारी शरीरसौष्ठव स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

नागेश करजगी ऑर्किड शाळा मैदान, जुनी मिल कंपौंड, मुरारजी पेठ येथे यशराज नागेश करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त, एन. के. श्री शरीर सौष्ठव स्पर्धा मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे. जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सूरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली व आरिफ माधवार यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा सोलापूर, धाराशिव, व लातूर जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आयोजित केली आहे. ही स्पर्धा ६ वजनी गटात असून प्रत्येक गटात ४ बक्षीसे,रोख रक्कम,सन्मान पत्र व सन्मान चिन्ह देवून विजयी खेळाडूंना गौरविण्यात येईल. विजेत्या श्रीसाठी २१ हजार, उपविजयीसाठी ५ हजार तर बेस्ट पोझर व मोस्ट अपकमिंगसाठी अडीच हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच ६ वजनी गटातून प्रथम चौघांना ४, ३, २ व १ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. परगावच्या खेळाडूंना एकवेळचे एसटी प्रवास व एक वेळ भोजनाची व्यवस्था संयोजकांनी केली आहे. वजन तपासणी मंगळवारी सायं. ४ ते ५ या वेळेत होईल. इच्छुकांनी जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव प्रमोद काटे (मो. ९४२२३८००३३) यांच्याकडे नोंदणी करावी.

# संगमेश्वर कॉलेजला दुहेरी मुकुट

### महाविद्यालीयन व्हॉलिबॉल स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत माढा आर्ट्स अँड कॉमर्स महाविद्यालय येथे झालेल्या महाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या पुरुष व महिला संघाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात त्यांनी गतवर्षीच्या उपविजेता बोरामणीच्या ग्लोबल महाविद्यालयाचा २-१ सेटने पराभव केला. महिला गटात त्यांनी सांगोला महाविद्यालयास हरविले. दोन्ही संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी, सुहेल पठाण, मलिक नदाफ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव प्रा. ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.

**विजयी संघ : महिला :** तृप्ती माने, सानिका वाठवडे, प्रीती माने, अंबिका हुले, प्राची घोडकुंभे, श्रावणी माने, तेजस्विनी गोयल, आरती वानखडे, स्वाती झिंगाडे, वर्धना धपाटे.

**पुरुषः** सुमित बचूटे, अजिंक्य पाटील, तनवीर नाईकवाडी, प्रज्वल नाले, सोहेब पठाण, झहीर शेख, शहेजान शेख, शुजल कोरे, ओंकार व्हाणकडे, जुबेर शेख, जफर शेख निरंकार काळे.




## ‘सोनी’च्या कांबळेची राज्य स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर :** डी.एच.बी. सोनी कॉलेजमधील १२ वी सायन्सच्या उत्कर्षराजे कांबळे याने शालेय विभागीय एअर पिस्तूल स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलांच्या गटात तृतीय स्थान मिळविले. या कामगिरीवर त्याची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास शारीरिक शिक्षण संचालक सुवर्णा कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संचालिका डॉ वासंती अय्यर, प्राचार्य डॉ. आशा रोकडे, उपप्राचार्य बुमरा यांनी अभिनंदन केले.



**सोलापूर : मुंबईत झालेल्या महाराष्ट्राच्या वरिष्ठ गट महिला संघाने मध्यप्रदेशचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. त्या संघाच्या निवड समितीचे चेअरमन सोलापूरच्या स्नेहल जाधव होत्या. त्यानिमित्त सोलापूरच्या क्रिकेटपटूंनी केक कापून आनंदोत्सव साजरा केला.**

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, २ नोव्हेंबर २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रभक्तीने परिपूर्ण आणि अनुशासनबद्ध संस्कारांनी ओतप्रोत शे-दोनशे व्यक्ती कोणत्याही गावात असल्या तर त्या गावातील दोन-चार हजार नागरिकसुद्धा त्यांचे अनुकरण करतील आणि याच मार्गाने आपल्या हिंदू राष्ट्रात आसेतु हिमाचल एकसूत्र, राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भारतीय समाज उभा राहू शकतो. या कार्यासाठी वेळ लागू शकतो, पण यश निश्चित आहे.

**बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# 'वंदे मातरम्' समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधणारे

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

**जबलपूर, १ नोव्हेंबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शनिवारी 'वंदे मातरम्' लिहिणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचे स्मरण केले आणि समाजात विभाजनाची प्रवृत्ती वाढत असल्याने 'वंदे मातरम्'ची भावना आत्मसात करावी, असे आवाहन केले. विभाजनाच्या वाढत्या प्रवृत्तीत 'वंदे मातरम्' हे समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधू शकते, असे होसबळे यांनी सांगितले.

१८७५ मध्ये रचलेले हे गीत राष्ट्रीय कवी रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तेव्हापासूनच हे गीत केवळ देशभक्तीचा केवळ मंत्रच नव्हे, तर राष्ट्रीय घोषणा, राष्ट्रीय चेतनेचा आवाज आणि राष्ट्राचा आत्मा बनले आहे. त्यानंतर 'वंदे मातरम्' बंगालच्या फाळणीसह भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील सर्व सेनानींचे घोषवाक्य बनले, असे होसबळे यांनी म्हटले.

महर्षी अरबिंदो, मॅडम भिकाजी कामा, महान कवी सुब्रमण्यम् भारती, लाला हरदयाल, लाला लजपत राय इत्यादी देशातील अनेक विद्वान आणि महापुरुषांनी त्यांची वर्तमानपत्रे आणि मासिकांच्या नावांमध्ये 'वदे मातरम्'चा समावेश केला होता. महात्मा गांधीही अनेक वर्षे त्यांच्या पत्रांचा शेवट 'वंदे मातरम्'ने करीत असत, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.

'वंदे मातरम्' हे देशाचे आत्मगीत आहे, त्याची प्रेरणा सर्वांना मिळते. 'वंदे मातरम्'ची रचना झाल्यानंतर १५० वर्षांनीही दिव्य प्रभावामुळे समाजात राष्ट्राप्रति समर्पणाची भावना निर्माण करण्याची शक्ती त्यात आहे. प्रदेश, भाषा आणि जात इत्यादी संकुचित विचारसरणीच्या आधारावर



आज फूट पाडण्याची प्रवृत्ती वाढत असताना 'वंदे मातरम्' हा समाजाला एकत्र आणणारा धागा आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी म्हटले.

या राष्ट्रीय गीताला भारतातील सर्व प्रदेश, समाज आणि भाषांमध्ये सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. आजही 'वंदे मातरम्' समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी, सांस्कृतिक ओळखीसाठी आणि एकतेच्या भावनेसाठी एक मजबूत पाया म्हणून काम करते. आजही ते समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी, सांस्कृतिक ओळखीसाठी आणि एकतेच्या भावनेसाठी एक शक्तिशाली पाया आहे. राष्ट्रीय चेतना आणि राष्ट्रनिर्मितीच्या या पवित्र वेळी, या महान मंत्राच्या भावनेचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे होसबळे यांनी सांगितले.

'वंदे मातरम्' या गीताच्या रचनेला १५० पूर्ण झाल्याच्या शुभ प्रसंगी, रा. स्व. संघ सर्व स्वयंसेवकांसह संपूर्ण समाजाला आवाहन करतो की, त्यांनी प्रत्येक हृदयात 'वंदे मातरम्'ची प्रेरणा जागृत करावी आणि 'स्व'च्या आधारावर राष्ट्र उभारणीच्या कार्यात सक्रिय व्हावे तसेच या प्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### एकतेच्या भावनेचा मजबूत आधार

'वंदे मातरम्' आजही राष्ट्रीय चेतना, सांस्कृतिक ओळख आणि समाजाच्या एकतेच्या भावनेचा मजबूत आधार आहे. राष्ट्रीय चेतना आणि राष्ट्र उभारणीच्या पुनर्जागरणाच्या या पवित्र काळात, या महान मंत्राच्या भावना समजून घेण्याची गरज आहे.

# व्यंकटेश्वर मंदिरातील चेंगराचेंगरीत १० ठार

## आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम् येथील दुर्घटना

**श्रीकाकुलम्, १ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील कासीबुग्गा येथील व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात शनिवारी झालेल्या चेंगराचेंगरीत १० भाविकांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एकादशीमुळे मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास ही चेंगराचेंगरी झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दुर्घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

एकादशी असल्याने व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात शनिवारी मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली. मंदिर परिसरात प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढल्याने लोकांमध्ये गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले. साडेअकरा वाजता झालेल्या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू, तर दोन जण जखमी झाल्याची माहिती काशीबुग्गा उपविभागाचे पोलिस उपअधीक्षक लक्ष्मण राव यांनी दिली. या चेंगराचेंगरीत किमान पाच भाविक जखमी झाले, अशी माहित आंध्रप्रदेशच्या गृहमंत्री वंगालेपुडी अनिथा यांनी दिली. मृत्युमुखी पडलेले भाविक ३५ ते ४० वर्ष वयोगटातील असल्याचे त्यांनी सांगितले.

कासीबुग्गा व्यंकटेश्वर मंदिर हे देणगी विभागाच्या अखत्यारित नव्हे, तर खाजगी आहे. दर शनिवारी येथे दीड ते दोन हजार भाविक येतात. कार्तिकातील एकादशीनिमित्त येथे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली, असे अनिथा यांनी सांगितले.

या चेंगराचेंगरीवर आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी दुःख व्यक्त केले. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान कार्यालयाकडून दोन लाखांची मदत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेवर तीव्र शोक व्यक्त केला. पंतप्रधान कार्यालयाने मृतकांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयाने दिली.

# जुबेरच्या वळसंगमधील शिबीरामध्ये उपस्थित असलेल्या एकाची चौकशी

**शिबीरात उपस्थित नावाची यादी पोलिसांकडे**

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

पुणे एटीएसने अटक केलेला जुबेर हंगरगेकर हा वळसंग येथे ज्या शिबीरासाठी आला होता, त्या शिबीराला उपस्थित असलेल्यांच्या नावाची यादी पोलिसांना मिळाली असून या यादीतील सोलापूरातील सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

अल कायदा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असलेल्या जुबेर हंगरगेकर दहा दिवसाखाली सोलापुरात एका कार्यक्रमासाठी आला होता. त्या कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्यांपैकी जेलरोड पोलिसांनी एकास ताब्यात घेवून शनिवारी चौकशी केली आहे. मात्र पोलिसांनी त्याविषयी माहिती देण्यास नकार दिला. त्या कार्यक्रमासाठी हजर राहिलेल्यांची यादी पोलिसांच्या हाती लागली आहे. त्यानुसार प्रत्येकास बोलावून चौकशी केली जात आहे. तसा अहवालही वरिष्ठ कार्यालयास दिला जाणार आहे. अल कायदा शी संबंधित असलेल्या जुबेर हंगरगेकर यास पुणे एटीएस पोलिसांनी अटक केली असून त्यास ४ नोव्हेंबर पोलिस कोठडी दिली आहे.

त्याच्याशी संपर्कात असलेल्या प्रत्येकांना ताब्यात घेवून चौकशी केली जात आहे. त्यानुसार पुणे एटीएस पथकाने सोलापूर शहरातील तिघांना ताब्यात घेवून चौकशी केली आहे. जुबेर वळसंग मधील एका शाळेमध्ये ऑक्टोंबरमध्ये आला होता. त्या ठिकाणी उपस्थित राहिलेल्या ३० हून अधिक जणांची यादी पोलिसांच्या हाती लागली आहे. त्या प्राप्त यादीनुसार शहरातील त्या कार्यक्रमासाठी गेलेल्यांची चौकशी होणार आहे.

## महत्त्वाचे

### सीएमएस-०३ उपग्रहाचे आज होणार प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा** : भारतीय अंतराळ संस्था अर्थात इस्रो रविवारी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून सायंकाळी ५:२६ वाजता ४,४१० किलो वजनाचा सीएमएस-०३ उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करणार आहे. हा भारतातून सोडला जाणारा इस्रोचा सर्वाधिक वजनाचा उपग्रह आहे आणि नौदलाची क्षमता वाढविणे याचा उद्देश आहे. सीएमएस-०३ उपग्रह इस्रोच्या शक्तिशाली रॉकेट, एलएमव्ही३-एम५ वापरून पृथ्वीच्या भू-समकालिक हस्तांतरण कक्षेत प्रक्षेपित केला जाईल. हा उपग्रह भारताच्या उच्च-क्षमतेच्या अंतराळ संशोधनाला एक नवीन दिशा प्रदान करेल आणि सागरी क्षेत्रात संवाद साधण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नौदल आणि लष्करात समन्वय साधण्यासह शत्रूची गोपनीय माहिती मिळविण्यासाठी या उपग्रहाचा उपयोग होणार आहे. देशातील डिजिटल संप्रेषण, उपग्रह इंटरनेट आणि सागरी कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी उपग्रहाचा फायदा होईल.

### जेईई मेन्स-२०२६ साठी नोंदणी प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली** : जानेवारी महिन्यात होणाऱ्या जेईई मेन्स सत्र १ च्या परीक्षेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख २७ नोव्हेंबरपर्यंत आहे. परीक्षा केंद्राची यादी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केली जाईल. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, जेईई मेन्स दोन परीक्षांमध्ये घेतली जाईल. पहिली परीक्षा जानेवारीमध्ये आणि दुसरी एप्रिलमध्ये घेतली जाणार आहे. जेईई मेन्स २०२६ सत्र १ साठी नोंदणी सुरू झाली आहे. एनटीएच्या संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे. सत्र १ ची परीक्षा २१ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे, तर दुसरे सत्र १ एप्रिल ते १० एप्रिल २०२६ पर्यंत असेल. ही परीक्षा १३ भाषांमध्ये घेतली जाईल, त्यात इंग्रजी, हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलुगू आणि उर्दू यांचा समावेश आहे.

# मतदार याद्या निर्दोष करा, नंतरच निवडणूक घ्या

## राज-उद्धव यांचे निवडणूक आयोगाला आवाहन

**मनसे-उबाठाचा मुंबईत मोर्चा, शरद पवार गट आणि काँग्रेस नेते सहभागी**

**मुंबई, १ नोव्हेंबर**

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाचा आरोप करत, आधी मतदार याद्या निर्दोष, पारदर्शक करा, त्यानंतर निवडणुका घ्या, अशी मागणी मनसे अध्यक्ष राज ठाकरे, उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्याच्या मोर्चाला संबोधित करताना केली.

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाचा आरोप करत महाविकास आघाडीने मुंबईत सत्याचा मोर्चा काढला. या मोर्चात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, सुप्रिया सुळे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सहभागी झाले आहेत. सोबतच डाव्या पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते देखील मोर्चात सहभागी झाले होते.



मोर्चाला उसळलेली गर्दी

कल्याण-डोंबिवली-मुरबाड येथील साडेचार हजार मतदारांनी मलबार हिल मतदारसंघातही मतदान केल्याचा आरोप राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून केला. पुराव्यादाखल त्यांनी तीन नावे वाचूनही दाखविली. सगळे लपून-छपून सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. तर जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याद्यांवर काम करा. प्रत्येक चेहरा ओळखला पाहिजे. दुबार-तिबार तिथे आले, तर तिथेच फोडून काढा आणि मग पोलिसांच्या ताब्यात द्या, असे आवाहन यावेळी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. (तभा वृत्तसेवा)

**सत्तेचा गैरवापर केला जात आहे : शरद पवार**
(पान ५ वर)

### माझ्या नावाने खोटा अर्ज : उद्धव ठाकरे

माझ्या म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाने खोटा अर्ज करण्यात आल्याचा खुलासा उद्धव ठाकरेंनी यावेळी केला. आयोगाचे अधिकारीच पडताळणीसाठी आले आणि त्यांनी सांगितले. असा सगळा बोगस प्रकार चालला आहे. असे सगळे पुरावे घेऊन न्यायल्यात जाणार असून, न्याय मिळेल अपेक्षा आहे. जनता तुमचा निर्णय करेल असा इशारा देत आम्ही एकत्र तुमच्यासाठी आलो असे सांगत, तुम्हीच साथ दिली नाही तर आमच्या एकत्र येण्याला काही अर्थ नसल्याचे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

### जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपये

**नवी दिल्ली** : कर कपातीनंतर सणासुदीच्या काळात झालेल्या खरेदीमुळे ऑक्टोबरमध्ये एकूण जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपयांवर गेले. हे संकलन वार्षिक वृद्धीच्या ४.६ टक्के आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील जीएसटीची ही सर्वात कमी आकारणी आहे.

# निवडणुकांच्या तोंडावर मविआचा फेक नरेटिव्हचा कट उधळून लावा : रविंद्र चव्हाण

## भाजपाचे मूक आंदोलन

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ ऑक्टोबर:**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पराभवाच्या भीतीपोटी लोकसभेसारखाच पुन्हा फेक नरिटिव्ह पसरवण्याचा कट आहे. भाजपाच्या बूथ स्तरापासूनच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने पेटून उठायला हवे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केली.

महाविकास आघाडीचा खोटा प्रचार आणि भ्रम निर्माण करण्याचे डाव हाणून पाडण्यासाठी, मविआच्या दुटप्पी भूमिकेची पोलखोल करण्यासाठी शनिवारी गिरगाव चौपाटी येथे करण्यात आलेल्या मूक आंदोलनावेळी चव्हाण बोलत होते. भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, कौशल्य विकास




आणि उद्योजकता व पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, आ. योगेश सागर, आ. विद्या ठाकूर, आ. संजय उपाध्याय यांच्यासह अनेक आमदार, युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी सहभागी झाले होते. यावेळी चव्हाण म्हणाले की, प्रत्येक नागरिकाच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवण्यासाठी महायुती सरकार झोकून काम करत असताना महाविकास आघाडी राज्यात अराजक माजवून पिछाडीवर नेण्याचा प्रयत्न करत आहे. परदेशी शक्ती आणि फंडिंगच्या मदतीने पोसणा-या सामाजिक संस्थांना हाताशी घेऊन विकास रोखण्याचे आणि दिशाभूल करून अस्थिरता निर्माण करण्याचे काम ही मंडळी करत आहेत. ठाकरे बंधूंवर निशाणा साधत चव्हाण म्हणाले की, हे बंधू वक्तृत्वशैलीच्या बळावर जनतेला महाराष्ट्राच्या अस्मितेवरून भावनिक आवाहनांमध्ये अडकवून त्यांची दिशाभूल करत आले आहेत. महाराष्ट्राला सर्वात वाईट दिवस ठाकरे बंधूंनी दाखवले. महायुती सरकारच्या काळात राज्याला पुढे नेण्यासाठी होत असलेले प्रकल्प, योजना याकडे डोळे उघडे ठेवून पहा असे आवाहन केले. अमित साटम म्हणाले की, मतदार आपल्याला का नाकारत आहेत याचे आत्मपरिक्षण करण्याऐवजी मविआ नेत्यांनी मोर्चाच्या माध्यमातून असत्याचा तमाशा लावला आहे. आगामी निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील मतदारांनी मविआला घरचा रस्ता दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर प्रतिक्रिया काय द्यायची याची पूर्वतयारी म्हणजे हा मोर्चा आहे अशी खिल्ली त्यांनी उडविली.



## रोखठोक

# एक धागा सुताचा

**दिनेश गुणे**

दैनंदिन जीवनशैलीत ज्या काही बाबी आपल्याला जिव्हाळ्याच्या वाटतात, त्यामध्ये राजकारण हा एक आवडता विषय असतो. अनेक जण राजकारणाकडे गांभीर्याने पाहात असल्याने, देशाच्या राजकारणात जे काही घडत, बिघडत असते, त्यानुसार त्यांच्या आनंदाचा निर्देशांक बदलत असतो. अनेकदा असे काही घडते की त्यामुळे त्यांना काहीतरी आशादायक वाटू लागते आणि असेही काही वेळा घडते, त्यामुळे नैराश्य वाटू लागते. कधी कधी राजकारणाविषयी चिंता वाटू लागते आणि कधी कधी किळसही येते. अलिकडच्या काळात तर चिंता वाटण्यासारख्याच घटना अधिक असाव्यात अशी स्थिती असल्याने, राजकारणाकडे गांभीर्याने पाहावयाचे की जे काही चालले आहे त्याकडे करमणुकीच्या भावनेने पाहावयाचे याचा संभ्रम वाटण्यासारखी स्थिती आहे. गेल्या काही महिन्यांत तर, राजकारण ही केवळ करमणूकच नव्हे, तर तो निव्वळ विनोद असावा असेही काही घडताना दिसू लागले आहे. दिवाळीच्या दिवसांत फटाक्यांची आतषबाजी करण्यातली मजा अनुभवणे हा मुलांच्या आनंदाचा सोहळा असतो. यंदाच्या दिवाळीत मात्र, पावसाळी वातावरणामुळे काही फटाके वाजलेच नाहीत. आपला फटाका हमखास वाजणार या विश्वासाने काही जण तो घेऊन मैदानात उतरले, त्याची वातही पेटविली आणि आता मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने लोकांच्या नजराही त्या फटाक्याकडे लागल्या. फटाका वाजविणाऱ्यानेही आपले कान झाकून घेतले आणि होणाऱ्या हादऱ्याने बरीच काही पडझड वगैरे होणार या अपेक्षेने वाटही पाहिली. पण त्यांना आणि लोकांनाही अपेक्षित धमाका झालाच नाही आणि फटाक्याची पेटविलेली वात आतल्या दारूपर्यंत पोहोचण्याआधीच विझून गेल्याने त्यांचाच हिरमोड झाला. आता दिवाळी संपल्यानंतर असे, न वाजलेले फटाके गोळा करून त्यांना दुसऱ्या फटाक्यांच्या वाती लावून पुन्हा वाजविण्याचा प्रयत्नही काही जणांनी सुरू केला आहे. कुणा एखाद्याने अगोदर वाजवलेला फटाका फुसका निघाल्यानंतर त्याला दुसऱ्या फुसक्या फटाक्याची वात लावून तो पुन्हा वाजविण्याचे तंत्र जमले की होणारा आनंद मूळ वातीच्या फटाक्यातून निघणाऱ्या आवाजाहूनही अधिक असतो. तो आनंद मिळविण्याचा प्रयत्न त्यामध्ये होता, हे उघड आहे. पण तो प्रयत्नदेखील फसल्यावर होणारा हिरमोड मात्र निराशाजनक असतो.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना, काही आठवड्यांपूर्वी काहीसा तोच अनुभव आला असावा. ॲटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात मोठा गाजावाजा करून त्यांनी उभ्या पक्षाला कामाला लावून एक ॲटम बॉम्ब तयार केला आणि मोठ्या उत्साहात माध्यमांच्या साक्षीने त्यांनी या ॲटम बॉम्बची वातदेखील पेटविली. या फटाक्याचा मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने त्यांनी स्वत:चेच कान घट्ट झाकूनही घेतले, पण तो फटाकाही वाजलाच नाही. मोठ्या अपक्षेने फटाक्याची वात पेटवावी, हाताने कान घट्ट झाकून घ्यावे आणि वात विझून गेल्याने आवाजही येऊच नये, असे झाल्यावर लहान मुलांना जे वाटते, तसेच काहीसे त्यांनाही झाले असावे. राहुल गांधी यांच्या त्या ॲटम बॉम्बचा स्फोट तर झाला नाहीच, पण तो साधा वाजलादेखील नाही. उलट, राहुल गांधी ज्या आवेशात आरोपांच्या माळा लावतात, तो आवेशच नंतर फुसका ठरतो हे पुन्हा एकदा दिसू लागल्याने त्यांचा हा नवा बॉम्बदेखील अगोदरच्या अनेक फुसक्या फटाक्यांप्रमाणेच निकामी ठरल्याचीच चर्चा सुरू झाली. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला मतचोरीचा फटका बसला होता, असा एक कांगावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनीही एकदा केला होता, तेव्हाही काँग्रेसजनांना तो मोठा ॲटम बॉम्ब वाटला होता. पण निवडणूक आयोगाने काँग्रेसला चर्चेसाठी पाचारण केल्यावर मात्र, या बैठकीत हजर राहण्याचे टाळून आपला बॉम्ब फुसका निघाल्याची अप्रत्यक्ष कबुलीच काँग्रेसने दिली होती. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मतचोरीचे काही दाखले दिल्यानंतर हेच आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल करण्याचे आयोगाने दिलेले आव्हानही काँग्रेसने स्वीकारलेच नाही आणि नेहमीप्रमाणे हा नवा फटाकादेखील फुसका होता हे स्पष्ट झाले.

ॲटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात राहुल गांधींना मैदानात उतरवायचे आणि ऐनवेळी तो बॉम्बच फुसका निघावा हा राहुल गांधींच्या बाबतीत काँग्रेसला येणारा हा काही पहिलाच अनुभव नाही. याआधीही राहुल गांधींचे अनेक फटाके असेच फुसके ठरले होते. त्यामुळे असे फुसके फटाके वाजविण्याऐवजी नव्या करमणुकीच्या खेळांचा सराव सुरू झालेला दिसतो. राहुल गांधी हेच या नव्या खेळांचे कप्तान आहेत. सध्या त्यांनी पंतप्रधान मोदी यांना घेरण्यासाठी लावलेल्या नव्या फटाक्याची वात काँग्रेसच्याच दिशेने फिरल्याचे दिसू लागले आहे. मोदी मतांसाठी काहीही करून दाखवतील, त्यांना नाच करावयास लावले तर ते नाचदेखील करतील असे काहीसे विचित्र विधान त्यांनी एका सभेत जाहीरपणे केल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर फिरू लागली आणि मतदारांच्या हातात हात गुंफून नाच करणाऱ्या सोनिया गांधी, प्रियांका गांधी आणि खुद्द राहुल गांधी यांच्याच चित्रफितींचा सुळसुळाट समाजमाध्यमांवर दिसू लागला. मतांसाठी नाच करण्याची गांधी कुटुंबाचीच परंपरा अधोरेखित करून राहुल गांधींचा नवा फटाकादेखील फुसका ठरविण्याकरिता समाजमाध्यमांवरील एक सजग वर्ग सज्ज झालेला दिसत आहे.

तरीही, अशा प्रकारे राहुल गांधी यांनी पेटविलेले फटाके फुसके निघाल्यानंतर न वाजलेल्या त्याच फटाक्यांना नव्या वाती लावून नवे स्फोट घडविण्याची नवीच कल्पना उद्धव ठाकरे यांच्या गटास सुचली आणि हुबेहूब राहुल गांधी यांनी केलेल्या तयारीचीच नक्कल करून आदित्य ठाकरे यांनी मतदारयाद्यांच्या घोळाचे प्रात्यक्षिक करून राहुल गांधींना जे



जमले नाही ते करून दाखविण्याचा प्रयत्न केला. मागच्या आठवडाभरात अशाच 'कॉपी पेस्ट' उपक्रमांना महाराष्ट्राच्या राजकारणात उधाण आले होते. आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या वरळी विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांमधील घोळाचे काही नमुने कार्यकर्त्यांसमोर सादर केले आणि पुन्हा एकदा निवडणूक आयोगाविषयी संभ्रम पसरविण्याच्या राहुल गांधी यांच्याच प्रयत्नांची पुनरावृत्ती करून पाहिली. पण त्या फटाक्याचाही फारसा गाजावाजा झालाच नाही. राहुल गांधींच्या फुसक्या फटाक्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आव्हान तरी दिले होते. आदित्य ठाकरे यांनी तोच न वाजलेला फटाका नव्या वातीनिशी पुन्हा वाजविण्याचा प्रयत्न केल्यानंतर निवडणूक आयोगाने तर त्याची दखलही घेतलेली दिसत नाही. या फटाक्याचा स्फोट घडविण्यासाठी आदित्य ठाकरे यांनीदेखील राहुल गांधी यांच्यासारखाच मंच सजवला होता. त्याच पद्धतीचे सादरीकरण करून काकणभर सरस नेपथ्य घडविण्याचा प्रयत्नही केला गेला. पण मतदारयाद्यांतील काही त्रुटींमुळे किंवा यादीतील घोळामुळे मतदानात घोळ असल्याचा छातीठोक दावा मात्र कोणालाच करता आला नाही. एखाद्या मतदाराचे नाव वेगवेगळ्या याद्यांमध्ये असू शकते, त्याची काही कारणेही असतात. नावांची अशी पुनरावृत्ती होणे योग्य नाही, याबाबत कोणाचेही दुमत नसूनही, दोन वेगवेगळ्या याद्यांमध्ये नाव असलेला मतदार दोन वेळा मतदान करू शकत नाही, ही बाब मात्र गुलदस्त्यात ठेवून मतदारांमध्ये संभ्रम पसरविणारा तो फटाकाही फुसकाच ठरला. मागे एकदा, नवी मुंबईतील एका सभेत खुद्द शरद पवार यांनीच मतदारांना एक सल्ला दिला होता. आपल्या गावी असलेल्या यादीत तुमचे नाव असेल तर गावाकडे मतदान करा, नंतर बोटावरची शाई पुसा आणि पुन्हा मुंबईत मतदान करा, असे त्यांनी भर सभेत सांगितल्यामुळे गोंधळ उडाला. आम आदमी पार्टीने तर, याआधीच्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाल्याचा थेट आरोपही केला. या वक्तव्याच्या चौकशीची चक्रे फिरू लागली तेव्हा पवार यांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली. असे दुबार मतदान कसे करता येईल असा प्रश्नही विचारला गेला आणि आपण गमतीने तसे बोललो असे सांगून पवार यांनीच दुबार मतदानाच्या शक्यतेचा इन्कारही केला होता. आज पवारांनी मतदारांना दिलेला तो सल्ला आणि नंतर केलेली ती सारवासारव लक्षात असती तर कोणीही दुबार मतदानाचा कांगावा करत भुई धोपटली नसती.

आदित्य ठाकरे यांचा प्रयोगही राहुल गांधी यांच्या प्रयोगाप्रमाणेच फसला. असा कांगावा लोकांना पटत नाही हे स्पष्ट झाल्यावर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी आता याच मुद्यावर दंड थोपटले आहेत. मनसेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांना एका गहन प्रश्नाने ग्रासलेले आहे. तोच प्रश्न खुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनाही पडला होता आणि त्याचे उत्तर त्यांना कधीच सापडलेही नव्हते. आपल्या सभांना एवढी प्रचंड गर्दी होते, मग मतदानाच्या वेळी हे लोक कोठे जातात, असा प्रश्न त्यांनी सभेला उपस्थित असलेल्या जनतेलाच विचारला होता. तेव्हा तर, राज्यात काँग्रेसच्या झेंड्याखाली सत्ताकारण सुरू होते. बाळासाहेबांना ते कोडे कधीच उलगडले नाहीच, पण त्याच कोड्याचे ओझे पुढे राज ठाकरे यांच्या खांद्यावर येऊन पडले. राज ठाकरे यांच्या सभांनाही प्रचंड गर्दी होते. त्यांच्या भाषणाला टाळ्या, शिट्ट्यांचा गजरही होतो. पण त्यांनाही मते मात्र मिळतच नाहीत. मनसेच्या स्थापनेपासून पुढे या पक्षाला मतांच्या राजकारणात गळतीच लागली आणि त्यांच्यासमोरील हे कोडे अधिकच गूढ होत गेले. अजूनही त्यांना तो प्रश्न पडलेला असल्याने, मतदारयाद्यांच्या घोळाचा धागा पकडून त्याचे उत्तर शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. वस्तुत:, राज ठाकरे किंवा उद्धव ठाकरे यांनी मतदारांच्या मानसिकतेचा किंवा मतदारांच्या अपेक्षांचा फारसा विचार केलेला नसावा, असा त्यांच्या एकूण राजकारणाचा बाज आहे. आपण ठरवू ते धोरण आणि आपण बांधू ते तोरण अशीच त्यांची राजनीती आहे. त्यामुळेच, सत्ता हाती द्या, मी सगळे सुतासारखे सरळ करेन असा दावा करणारे राज ठाकरे सतत तोडफोडीची आणि खळ्ळ खट्याकचीच भाषा करत राहिले. मारझोड, नासधूस, ही त्यांच्या राजकारणाची दिशा अनेकदा स्पष्ट झाली आहे. कोणताही जनहिताचा प्रश्न हाती घेऊन तोदेखील नासधूस, तोडफोडीच्या मार्गाने सोडवावा या विचारावर राज ठाकरेंचा पक्ष ठाम असतो, असे अनेकदा दिसून आले आहे. रस्त्यांवरील टोल आकारणी हा जनतेच्या दृष्टीने संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तो राजकीय चातुर्याने हाताळला, तर जनतेचा विश्वास संपादन करणे शक्य होते. पण हा प्रश्नदेखील राज ठाकरे यांच्या पक्षाने खळ्ळ खट्याक नीतीनेच हाताळला आणि या मुद्यावरून लावलेला फटाकाही फुसकाच ठरला. सभेसाठी जमणाऱ्या अलोट गर्दीचे रूपांतर मतदानात का होत नाही, हा बाळासाहेबांना पडलेला प्रश्न राज ठाकरेंना पडला, ते साहजिकही होते. उद्धव ठाकरे यांना मात्र तो प्रश्न पडण्याचे फारसे काही कारणच नसावे. कारण त्यांनी युती आणि आघाडीच्या आधारावरच सत्ताकारण केले. शिवसेनेत फूट पडण्याआधी उद्धव ठाकरे यांनी आपल्या राजकारणाची दिशा बाळासाहेबांच्या राजनीतीच्या नेमक्या उलट दिशेने फिरवली. भाजपसोबतच्या दीर्घकाळातील युतीमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला सत्तेच्या सान्निध्यात राहणे शक्य झाले होते. पुढे भाजपविरोधात कडवट भूमिका घेऊन त्यांनी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी केली, त्यामुळे पुन्हा सत्तेची ऊब मिळतच गेल्याने, मतांच्या बेरजेचा हिशेबही करण्याची गरज त्यांना भासली नसावी. शिवसेनेच्या सभांना होणाऱ्या गर्दीत त्या पक्षाच्या मतदारांचा आकडा घरंगळत चालल्याचे स्पष्ट होऊनही, सत्ता सहजसाध्य होत गेल्याने, उद्धव ठाकरे यांना तो प्रश्न पडला नसावा. आता मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर पक्षाला पुरती गळती लागल्यावर कदाचित त्यांना सत्तेची नवी गणिते, नव्या कुबड्या शोधण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या प्रश्नाची पालखी त्यांच्याही खांद्यावर येण्याची चिन्हे दिसू लागल्याने, पुन्हा त्यांच्या गटानेही मतदारयाद्यांच्या घोळाच्या सुतावरून राजकारणातला स्वर्ग गाठण्याचा राहुल गांधी यांचा फुसका फटाका वाजविण्याचा खटाटोप चालविलेला दिसतो.

त्यामुळेच, राजकारणाकडे गांभीर्याने पाहणाऱ्यांना आता त्यात फारसा रस राहिलेला नाही. राजकारण हा करमणुकीचा खेळ वाटावा असे अनेक नवनवे किस्से यात भर टाकत आहेत. सरत्या आठवड्याच्या सुरुवातीस, गेल्या सोमवारी उद्धव ठाकरे यांच्या गटाचा निर्धार मेळावा मुंबईच्या वरळी डोममध्ये पार पडला. याच मेळाव्यात आदित्य ठाकरे यांनी मतदारयादीतील गोंधळाच्या राहुल गांधी यांच्या प्रात्यक्षिकाचा पुढचा प्रयोग सादर केला होता आणि त्यापाठोपाठ राज ठाकरे यांनी आपल्या पक्षाच्या मेळाव्यात मतदान यंत्रे घोळ करू शकतात असे लोकांना भासविण्यासाठी काही जादूचे प्रयोगही करून दाखविले होते. सार्वजनिक मंचावर सनसनाटी आरोप करून सरकारविरुद्ध आणि सरकारी यंत्रणांविरुद्ध समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याची एक सूत्रबद्ध कार्यपद्धती कामाला लागलेली आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या त्या फसलेल्या प्रयोगानंतर केला होता. अशा प्रयोगांमुळे आरोप करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेभोवतीच गैरसमज आणि संशयाचे धुके पसरणार असून ते टाळावयाचे असेल तर सज्जड पुराव्यांसह जनतेसमोर जाणे योग्य ठरते, असा सल्लाही त्यांनी त्या वेळी दिला होता. आदित्य ठाकरे यांनी राहुल गांधी यांच्या प्रयोगाचीच नक्कल केल्यानंतर फडणवीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. महाराष्ट्रात दुसरा पप्पू तयार होऊ नये, असा टोला त्यांनी हाणला होता. सरकार आणि स्वायत्त संस्थांच्या विरोधातील आरोपांची शहानिशा करण्याची एक विहित कार्यपद्धती असते. संविधानाने त्या कार्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संविधानाची हमी देत या कार्यपद्धतीस नाकारून कोणी नेता बेछूट वक्तव्ये करत असेल, तर त्यातील गांभीर्य नाहीसे होईल, म्हणून, केवळ सुताचा एक धागा पकडून स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न म्हणजे राजकारणातील करमणुकीचा प्रयोग ठरतो. तसे होऊ नये यासाठी नेत्यांनी काळजी घ्यायला हवी.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### अनुभूती व अनुभव देणारी गिरनार यात्रा

या वर्षीची गिरनार परिक्रमा १ नोहेंबर ते ५ नोहेंबर कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमापर्यंत होणार आहे. या परिक्रमेची आख्यायिका अशी आहे. गिरनार हा हिमालय पुत्र व माता पार्वतीचा भाऊ. माता पार्वती आणि शिव यांचा विवाह सोहळा २०००० वर्षांपूर्वी हिमालयात झाला. बहिणीच्या लग्नासाठी गिरनार समुद्रातून बाहेर पडला आणि जमिनीवर स्थिर झाला समुद्रापासून अवघ्या ५० किमी. वर, हिमालयात जाऊ शकला नाही. पुढच्या त्रिपुरारी पौर्णिमेला माता पार्वती भगवान शिवासह गिरनारला मुक्कामी आल्या. शिव पार्वती विवाहात सर्व देव, ऋषी, तीर्थ, नवग्रह अष्ट सिद्धी, नावनिधी, ५२ वीर, ६४ मातृका, ११ जलदेवता, नव नाग, अष्ट वसू, कुबेर भंडारी आले होते. त्यांच्यासह शिव पार्वती ४ दिवस गिरनारवर होते. त्या काळात सर्व देवतांनी गिरनारच्या जंगलात मुक्काम केला होता. आजही कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या दिवसात सर्व देवता गिरनारच्या परिक्रमा मार्गात मुक्कामी असतात. परिक्रमेत पाच रात्री मुक्काम करावा. कमीतकमी एक रात्र तरी मुक्काम करावा म्हणजे या देवतांचे सान्निध्य व आशीर्वाद मिळतात. याकरिता ही परिक्रमा केली जाते. शास्त्रानुसार एकूण ३ गिरनार परिक्रमा केल्या की एका कैलास यात्रेचे पुण्य मिळते. गिरनार पर्वत उजव्या हाताला ठेवून त्याला प्रदक्षिणा घालणे यालाच परिक्रमा करणे असे म्हणतात. गिरनारच्या भोवती पूर्ण जंगल आहे. जे सध्या वनविभागाच्या अखत्यारीत आहे. वर्षभर आपल्याला या जंगलात प्रवेश मिळत नाही. फक्त या परिक्रमेच्या कालावधीत ५ दिवस सर्वांसाठी प्रवेश मिळतो. या जंगलात मुंगी, विंचूपासून ते सिंहापर्यंत भरपूर प्राणी आहेत. पण या ५ दिवसांत हे प्राणी आपल्याला काहीही त्रास देत नाहीत. ही दत्तगुरूंचीच कृपा आहे. देव आणि त्यांचे गण हे सुद्धा या कालावधीत परिक्रमेसाठी येतात आणि परिक्रमा करतात अशी आख्यायिका आहे. ही परिक्रमा करण्याने आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या अनेक पापांची मुक्ती मिळते. त्यामुळे प्रचंड संख्येने भक्त मंडळी ही परिक्रमा करतात. आपल्यासारख्या सामान्य माणसांपासून ते साधु, संत आणि देव सुद्धा ही परिक्रमा करतात. त्यामुळे परिक्रमा करताना या सत्पुरुषांचे दर्शन, आशीर्वाद मिळाल्यास सोने पे सुहागा असतो. गिरनार परिक्रमेचा मार्ग हा पूर्णपणे जंगलातून जातो. तीन डोंगर चढणे आणि उतरणे त्यात तीव्र चढ आणि अतीतीव्र उतार असे स्वरूप आहे.

परिक्रमेला सुरुवात झाल्यावर १२ किलोमीटरवर जिनाबाबा की मढी हे स्थान येते. मागील शतकात गिरनार येथे जिनाबाबा नावाचे अवलिया होऊन गेले. त्यांची एक चिलीम अद्याप येथे आहे. त्या चिलमीतून ते आत-बाहेर करत होते असे म्हणतात. यांची समाधी व धुनी येथे आहे. येथे परिक्रमावासींसाठी गरम भोजन या संस्थानतर्फे उपलब्ध असते. थोडे पुढे सरनो नावाची छोटी नदी लागते. त्यात बरेच जण स्नान करतात. तेथून पुढे ८ किलोमीटरवर मालवेला हे स्थान आहे. मालवेला येथे आंब्याची अनेक झाडे आहेत. तेथून पुढे ८ किलोमीटरवर बोरदेवीचे स्थान आहे. विग्रह आणि मंदिर दोन्ही नितांत सुंदर आहेत. परिक्रमेतील शेवटचा टप्पा हा बोरदेवी ते तलेटी हा मार्ग परिक्रमावासींसाठी अतिशय सरळ आहे.त लेटी म्हणजे गिरनार पर्वताच्या पहिल्या पायरीजवळ आल्यावर ही परिक्रमा पूर्ण होते.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

### जीवनाची समृद्धता : कार्तिक एकादशी

शेकडो वर्षे पंढरपूरच्या विठुमाउलीच्या महाद्वारामध्ये लाखो भक्त अलौकिक सुखाचा अनुभव घेत आले आहेत. महाराष्ट्राच्या मातीमध्ये जन्माला आलेल्या संतांच्या विभूतीने भागवतधर्माचा जो काही आनंदकल्लोळ केला त्यातून समाधानाच्या आनंदाचे निदान सापडले. आणि ते आजही तसेच टिकून आहे. ज्या जागेपणी हा सुखाचा सोहळा अनुभवायचा असतो, तीच आजची प्रबोधन एकादशी आहे. आषाढातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात आणि कार्तिकातल्या प्रबोधिनी एकादशीला ते जागे होतात, अशी विठलभक्तांची श्रद्धा आहे. परंतु ज्या काळात देव झोपतात, त्याच काळात भक्तांनी जागे राहायचे असते. कदाचित म्हणूनच आषाढी ते कार्तिकीच्या चातुर्मासामध्ये अनेक विठ्ठलभक्तांचा पंढरीमध्ये निवास असतो. महाराष्ट्रातल्या अनेक गावागावांमध्ये आश्विन ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत काकडा आरतीचा परिपाठ पाहायला मिळतो. देवाचे झोपणे किंवा जागे होणे हा भक्तांच्या परमेश्वरावरील प्रेमाचा उत्तुंग असा कल्पना विलास म्हणावा लागेल. कारण कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी हा शब्द वापरून भक्तांनी स्वतमच्याच प्रबोधनाचा वसा मात्र कायम ठेवलेला दिसून येतो. आषाढीची महिनाभराची वारी त्यानंतर आपापल्या घरी आलेले वारकरी प्रपंचामध्ये रममाण होत असले तरी विठ्ठलाच्या साक्षीने जागवलेला हा परमार्थ तसाच पुढे चालू ठेवायचा आहे. ही जाणीव त्यांच्या मनामध्ये असते. त्याचे आपल्याला विस्मरण होऊ नये या एकाच श्रद्धेपोटी हा भगवद्भक्त पुन्हा पुन्हा त्या पंढरीच्या महाद्वारावर जाऊन आपल्या भगवद्भक्तीच्या अधिष्ठानाचे आवर्तन करीत असतो.



कोणी काहीही म्हणो. परंतु महाराष्ट्राला मिळालेली ही भागवत धर्माची देणगी विलक्षण आहे. ज्ञानेश्वर माउली, जगद्गुरू तुकाराम महाराज, नामदेव महाराज, जनाबाई, मुक्ताबाई अशी ही संत विभूतींची मांदियाळी म्हणजे भगवंताने महाराष्ट्राला प्रेमाने भक्तीचा अलंकारच दान दिल्यासारखे म्हणता येईल. आजच्या प्रबोधिनी किंवा कार्तिकी एकादशीचासुद्धा याच दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातल्या संतांनी आपल्या या अनुभवातूनच समाजाला समृद्ध करणारे अभंग लिहिले.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### अमेरिकेचे आकर्षण कमी करावे

पूर्वीपासूनच आम्हा भारतीयांना अमेरिकेचे जबरदस्त आकर्षण आहे. अमेरिका शस्त्र-शक्ती-धन-तंत्रज्ञानसंपन्न राष्ट्र आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात, संशोधनाच्या क्षेत्रातही तो देश आघाडीवर आहे. लहान देशांना एकमेकाशी भांडण्यात गुंतवून स्वत:चा प्रभाव वाढवण्याचा विचित्र डाव अमेरिका सातत्याने खेळत आहे. जगावर सत्ता गाजवण्याची, बलशाली असल्याने, अमेरिकाला अनुकूल परिस्थिती मिळत राहिली. त्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा अमेरिकेने घेतला आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही त्याच देशाचे वर्चस्व आहे. सगळे जागतिक प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाच्या मार्फतच सोडविले जातात आणि त्यात अमेरिकेच्या मताला जास्त महत्त्व असते. कमी लोकसंख्या असल्याने तो देश धनाढ्य आहे. त्यामुळे तो भौतिकवादी देश आहे. तिथे पैशाला खूप जास्त मान आहे, माणसाला नाही. भावनिक नाते त्या वातावरणात टिकून राहू शकत नाही. भारत आर्थिकदृष्ट्या गरीब होता पण आता भारताने नवीन आर्थिक धोरण राबवून देशाला आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आणले आहे. देशाचे सैन्यबळ वाढले आहे. नवीन-नवीन संकल्पना राबवून देश प्रगत राष्ट्र होण्याच्या मार्गावर आहे. भारताची परराष्ट्रधोरणे मैत्री वाढवणारी असल्याने अनेक देशांशी भारताचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले आहेत.

भारताने कोरोना काळात जगाला केलेली औषधांची मदत वाखाणली गेली. भारताची ही सगळी आगेकूच, ही दमदार कामगिरी अमेरिकेच्या सत्ताधाऱ्यांना सहन होत नाहीये. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताच्या दौऱ्यावर येऊन गेले आहेत. पंतप्रधान मोदींनी त्यांचे हार्दिक स्वागत केलेले आहे. दोघांनी मैत्रीसंबंध जाहीर केले आहेत, असे असूनही अमेरिकेने विदेशी विद्यार्थ्यांना-भारतीय विद्यार्थ्यांना त्या देशात राहण्याची परवानगी नाकारली, त्यांना भारतात परत पाठविले तेही अत्यंत अपमानास्पद पद्धतीने. देशावर आर्थिक दबाव आणण्यासाठी अनावश्यक आयातकर जाहीर केले, भारताने रशियाकडून तेल घेऊ नये यासाठी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. ऑपरेशन सिंदूर हे अभियान अमेरिकेच्या मध्यस्थीमुळेच थांबवावे लागले असे जाणकारांचे मत आहे. आता अमेरिका पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करतो आहे हे वाचण्यात आले.

अमेरिकेच्या अशा वागण्याचा तरुणांनी विचार करावा. जो देश आपल्याला चुकीची वागणूक देतो, आपल्या शत्रूला मदत करतो, आपल्या प्रगतीत अडसर निर्माण करतो त्या देशात जाणे म्हणजे आपला देशाभिमान, स्वाभिमान विसरण्यासारखे आहे. आपल्या घरात जसे आपण राजे असतो, तसे आपल्या देशात आपण स्वतंत्र, सुरक्षित व निर्भय असतो. म्हणून तरुणांनी अमेरिकेचे आकर्षण कमी करावे. आपला देश जास्त चांगला आहे हे नीट लक्षात घ्यावे.

**आशा पांडे**/नागपूर

## मुंबई वार्तापत्र

# सत्याचा नव्हे, सत्तेचा मोर्चा!

**नागेश दाचेवार**

सत्ता गेल्यानं विरोधक चवताळलेले दिसत आहेत. विरोधकांना असं वाटत होतं, नव्हे आजही वाटतं की सत्ता ही त्यांची मक्तेदारी आहे. एक चहावाला येऊन पंतप्रधान कसा होऊ शकतो... हे अजूनही त्यांच्या पचनी पडलेलं नाही. हा यांचा जो अहंकार आहे, त्याला जनतेने धक्का दिला. मग त्याचा राग आता विरोधक अशा मार्गाने काढताना दिसत आहेत. आपल्याला हवी तशी सत्ता मिळत असेल तरच निवडणुका होऊ द्यायच्या नाही तर निवडणुका नकोत, असा अत्यंत धक्कादायक आणि देशविघातक पवित्रा विरोधकांनी घेतलेला दिसत आहे. त्यांच्या या उपद्व्यापाचाच एक भाग म्हणजे सत्तेसाठी काढलेला हा असत्यांचा मोर्चा होय..!

संवैधानिक संस्थांवर हल्ले करणे, त्यांच्या विश्वासार्हतेला धक्का लावणे आणि निवडणुका होऊ देणार नाही असा इशारा देण्याचे प्रकार विरोधकांनी चालविले आहेत. निवडणुका हा संसदीय लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. जेव्हा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये यांना यश मिळालं, तेव्हा हीच मतदारयादी होती. तेव्हा कधी यांनी तक्रार केली नाही. विधानसभा निवडणुकीतही हीच मतदारयादी होती. निवडणूक लढून निर्णय लागेपर्यंत यावर कधीही आक्षेप घेतला नाही. मात्र, आता या लोकांनी फार मोठे गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. यांचा प्रश्न हा मतदारयादीतल्या तथाकथित घोळापुरता मर्यादित नाही. यांचं कसं झालं आहे, आमच्या मनाप्रमाणे झालं तर ठीक, नाहीतर निवडणूकच होऊ देणार नाही. राज ठाकरेंनी सार्वजनिक सभेतून तसे जाहीरच केले ना... ''निवडणुका कशा होतात ते मी बघतो'' म्हणून. महत्त्वाचं म्हणजे निवडणुका होऊ देणार नाही ही भाषा नक्षल्यांची आहे. आणि तीच भाषा आता हे लोक वापरत आहेत. हे आता अर्बन नक्षल्यांची भाषा वापरू लागल्याचे दिसते, असे म्हणायला वाव आहे. संविधान मान्य नाही, ते नष्ट करायचे. वैधानिक संस्था नष्ट करायच्या, संसदीय लोकशाहीचा आधार असलेल्या निवडणुकाच होऊ द्यायच्या नाहीत. हे प्रकार यापूर्वी नक्षलवादी नेहमी फलक, पत्रकं टाकून निवडणुकीवर बहिष्कार टाकून करायचे. कारण त्यांना संविधान मान्य नाही, लोकशाही मान्य नाही. त्यासाठी ते अशा पद्धतीने निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचं आवाहन करायचे. बसं... सारखा प्रकार करताना हे लोक दिसत आहेत. नक्षलवादी किमान लपून छपून निवडणुकीवर बहिष्काराची भाषा बोलायचे, हे लोक तर उघडपणे आता त्यांचीच भाषा करू लागले आहेत. एकीकडे नक्षलवादी शरण येत आहेत आणि अर्बन नक्षल उचल खात आहेत की काय असेच वाटू लागले आहे.

बरं हे निवडणुका घेऊ नका हे कोणत्या परिस्थितीत म्हणत आहेत. तर, सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका आटोपण्याचे निर्देश दिलेले असताना. याचा सरळ अर्थ विरोधक सर्वोच्च न्यायालयाला देखील मानत नाहीत, निवडणूक अयोगालाही मानत नाहीत, संसद, विधिमंडळालाही मानत नाहीत, कायदा व सुव्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या यंत्रणेलाही मानत नाहीत. विनापरवानगी मोर्चा काढला... मुळात यांच्या या एकूण वर्तनातून हे देशाचे संविधान आणि संसदीय लोकशाहीच उद्ध्वस्त करायला निघाल्याचे दिसते.

भारतीय लोकशाहीत विरोधी पक्ष असला पाहिजे, विरोधी पक्षाचा नेता असला पाहिजे. त्यांनी जनतेचे प्रश्न मांडले पाहिजेत, बाजू मांडली पाहिजे, सरकारच्या चुका दाखविल्या पाहिजेत. हे सगळं अपेक्षितच आहे. पण थेट मुळावरच घाव घालण्याचा प्रकार यांनी चालवला आहे. याला तर बेजबाबदारपणाचा कळसच म्हणावा लागेल.

मुळात हे सगळे लोक घराण्यातून पुढे आले आहेत. उद्धव ठाकरे आज एका पक्षाचे नेते का आहेत? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे चिरंजीव आहेत. राज ठाकरेंनी जरी मनसे हा पक्ष स्वबळावर स्थापन केला असला तरी, त्यांना एखादा पक्ष स्थापन करण्याइतकं बळ कुठून मिळालं? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे पुतणे आहेत. शरद पवार घराणेशाहीच चालवत आहेत. सुप्रिया सुळे, रोहित पवार, अजित पवार हे त्यांच्या घराणेशाहीची मूर्तिमंत उदाहरणं आहेत. काँग्रेस तर घराणेशाहीचा कळस आहे, हे वेगळ्यानं सांगण्याची गरज नाही. या लोकांना सगळं आयतं मिळालं असल्यामुळं संघर्ष माहिती नाही. जनता, जनतेचे प्रश्न, प्रत्यक्ष जमिनीवरील समस्या, लोकशाहीच्या तत्त्वांशी विसंगत वाटणे, अधिकारांचे उल्लंघन होणे, किंवा एखाद्या विशिष्ट धोरणाचे अपेक्षित परिणाम साध्य होत नसल्यास त्याचा वैधानिक पद्धतीने विरोध करण्याऐवजी हे लोक थेट व्यवस्थाच उद्ध्वस्त करायला निघाले आहेत. त्यामुळे हा विषय केवळ भारतीय जनता पक्षापुरता मर्यादित नाही, आपल्या भवितव्याचा प्रश्न आहे. संवैधानिक व्यवस्था उरली नाही, लोकशाही टिकली नाही, निवडणुका झाल्या नाही तर, आपलं, आपल्या देशाचं काय होईल? असा व्यापक गंभीर प्रश्न विरोधकांच्या या भूमिकेच्या निमित्तानं निर्माण झाला आहे.

सार्वजनिकपणे प्रात्यक्षिक दाखवून बनावट आधार कार्ड बनवायचं. आणि गुन्हा दाखल झाल्यावर त्याचं समर्थनदेखील करायचं. उद्या नोटा कशा छापायच्या याचंही प्रात्यक्षिक दाखवायला हे लोक मागेपुढे पाहणार नाहीत. वरून त्याचं समर्थनदेखील करतील. या भूमिकेला गुन्हेगारी नाही तर काय म्हणायचं. राहुल गांधींनी हायड्रोजन बॉम्ब फोडला... तेव्हा निवडणूक आयोगानं त्यांना केवळ तुमचे हे सर्व आरोप प्रतिज्ञापत्रावर सादर करा असं सांगितलं. पण आजवर राहुल गांधींनी ते दिलं नाही. मात्र, सत्याचा मोर्चा काढणाऱ्यांना आजवर शपथेवर सत्य बोलता आले नाही. कारण प्रतिज्ञापत्रावर तुम्ही खोटं बोलला, चुकीची माहिती दिली तर, शिक्षा होते. बाकी काही कळत नसलं तरी एवढं कदाचित राहुल गांधींना कळत असावं किंवा त्यांना त्यांच्या सल्लागारांनी समजावून सांगितलं असावं. बरं राहुल गांधी असोत किंवा मग हे दोन नौटंकी भाऊ असोत... यापैकी कोणीही वैधानिक, न्यायिक मार्ग स्वीकारताना दिसत नाही. बिहारमधील 'एसआयआर' विरोधात न्यायालयात गेल्यावर तोंडावर आपटणारे, हे विरोधक आता कोणीही न्यायालयात दाद माण्याच्या तयारीत नाहीत. कारण त्यांनी केलेल्या आरोपातले सत्य त्यांच्या मनाला माहिती आहे. त्यामुळे संविधानाने उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही मार्गाचा अवलंब न करता, जनतेच्या मनात विष पेरून, संवैधानिक संस्था उद्ध्वस्त करण्याचा यांचा डाव आता उघड झाला आहे.

त्यामुळे हा विषय केवळ आता भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस असा सत्ताधाऱ्यांच्या विरोधापुरता किंवा यांनीच विचार करण्यापुरता राहिलेला नाही. यावर आता तुम्ही आम्ही अर्थात सर्वसामान्य जनतेला, सामान्य मतदारांना विचार करायला भाग पाडणारा हा गंभीर विषय आहे. हे असं चालू द्यायचं का? यावर निर्णय आता जनतेला घ्यावा लागणार आहे. सत्ता मिळविण्यासाठी संपूर्ण देशाची व्यवस्था उद्ध्वस्त करणाऱ्या यांच्या षडयंत्राला जनता आता बळी पडणार नाही, एवढं मात्र निश्चित आहे.

९२७०३३३८८६

### समाजरक्षकच गुन्हेगार झाले तर?

पोलिसांचे मुख्य कर्तव्य म्हणजे नागरिकांचे रक्षण, कायद्याचे पालन आणि समाजात शांतता व सुरक्षितता निर्माण करणे. मात्र, आज अशा घटना वारंवार घडताना दिसतात, ज्यात पोलिसच गुन्हेगार असल्याचे समोर येते. नुकताच मद्रास उच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात पोलिसांचा खोटारडेपणा उघड करून त्यांना दिलेली शिक्षा हे त्याचेच ठळक उदाहरण आहे. प्रकरण असे की, चेन्नईतील तीन पोलिस अधिकाऱ्यांनी अमली पदार्थविरोधी प्रकरणात एका निरपराध नागरिकाविरुद्ध खोटे पुरावे निर्माण करून खोटी साक्ष दिल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी उच्च न्यायालयाने या तिन्ही पोलिस अधिकाऱ्यांना १० लाख रुपयांचा दंड ठोठावला. एका निरपराध व्यक्तीला अडकवण्यासाठी पोलिसांनी जर असा कट रचला असेल, तर हे अत्यंत धक्कादायक आहे. उच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, या पोलिसांनी कायद्याची चौकट वाकवून न्यायव्यवस्थेचा गैरवापर केला. सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवर विश्वास असतो, कारण त्यांना वाटते की पोलिस त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना न्याय देतील. परंतु, चेन्नईतील या निकालाने हा विश्वास डळमळीत झाला असून नागरिकांचा भ्रमही दूर झाला आहे. अलिकडच्या काळात अशा अनेक घटना घडल्या आहेत. पूर्वी चोरी, धमकी, हत्या, बलात्कार असे गुन्हे केवळ गुंड करत असत; पण आता हीच कृत्ये काही पोलिसांकडून उघडपणे होताना दिसतात. फलटण येथे नुकत्याच घडलेल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणातही पोलिसांची गलिच्छ मानसिकता समाजासमोर आली आहे. पोलिस दल हे समाजाची संरक्षक भिंत आहे. परंतु या भिंतीला जर तडे गेले, तर समाज नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. हे गांभीर्याने लक्षात घेऊन गुन्हेगार पोलिसांविरोधात सरकारने कठोर आणि निष्पक्ष भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. पोलिसांची निवड करताना केवळ उंची, ५६ इंच छाती आणि वजन हेच निकष न ठेवता सद्सदविवेकबुद्धी, नीतिमत्ता आणि समाजहित या निकषांना प्राधान्य द्यायला हवे. कारण, जेव्हा रक्षकच भक्षक बनतात, तेव्हा न्याय आणि सुरक्षिततेचा पाया डळमळतो.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## आजचे संघगीत-३०

रविवार, २ नोव्हेंबर २०२५

### वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा

वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा
ऐक्याचा नित सर्वत्रांनी जयजयकार करावा ।।धृ.।।

वेगळेच जरि वंशपंथ तरि असे एक आदेश
नकोत अमुच्या झेंड्याखाली भिन्न भिन्न गणवेश
कोनाकोनामधुनी यावे सुपुत्र झेंड्याखाली
महान त्यागानेच करू या भरतखंड बलशाली ।।१।।

सहिष्णुता अंगात बाणवा निंदु नका परक्यास
सहकाऱ्यांवर जीवेभावे राखा दृढ विश्वास
परस्परांतिल सर्व भेद हे विसरू या मोदाने
जाते घडि ही अपुली राखा अभंग एकोप्याने ।।२।।

कलह मिटावे परस्परांतिल ऐक्यबीज रुजवावे
ऐक्याच्या वट वृक्षावरती संघपुष्प विलसावे
स्वदेशसेवेवाचुनि दुसरा हृदयी भाव नसावा
शाखाशाखांमधुनी असला नित संस्कार घडावा ।।३।।

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जनजागृतीपर रॅली

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षता जनजागृती सप्ताह २०२५ च्या अनुषंगाने सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यावतीने सोलापूर शहरामध्ये शनिवारी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅलीचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी हिरवा झेंडा दाखवुन केले. या रॅलीमध्ये उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, उपअधिक्षक प्रशांत चौगुले व २ पोलीस अधिकारी, १३ पोलीस अंमलदार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय येथील ७ पोलीस अधिकारी, १० पोलीस अंमलदार, ५० आरसीपी पोलीस अंमलदार, भरतीपूर्व प्रशिक्षण, सोलापूर येथील ५० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. सदर रॅली पोलीस सोलापूर शहर आयुक्त कार्यालय येथुन गांधी चौक, सात रस्ता चौक, रंगभवन चौक मार्गे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.



## चंदेले महाविद्यालयात इंदिरा गांधी, वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

चंदेले समाजकार्य महाविद्यालयात भारताच्या पहिला महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी थोर स्वातंत्र्य सेनानी भाई छंनुसिंह चंदेले, इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला विद्यालय महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री राहुलजी चंदेले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र. प्राचार्य गायकवाड एस बी, ग्रंथपाल संतोष भागवत, प्रताप चंदेले राणी भुजंगे महादेव गावडे रामेश्वर गवळी ज्योतिबा राऊत सचिन कांबळे संजय कांबळे शैलेश रजपूत आधी उपस्थित होते.



## 'उमेद'चे ७०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

अतिवृष्टीमुळे सिना नदीला आलेल्या पुरामध्ये शालेय विद्यार्थी यांचे शालेय साहित्य वाहून गेले होते. सदर विद्यार्थ्यांना परिपूर्ण शालेय साहित्य देवुन उमेदने केलेले सामाजिक काम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांनी केले. उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्वयंसहायता समूह मधील सदस्य, अभियानातील कर्मचारी यांनी स्वखुशीने निधी जमा करून करमाळा तालुक्यातील ७ गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी यांना ७०० शालेय कीटचे वाटप केले. यावेळी गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, तालुका अभियान व्यवस्थापक अवधूत देशमुख, सुषमा बिचुकले, गणेश पाटील, आण्णा आवताडे, उमेश डांगे, तालुका व्यवस्थापक योगेश जगताप, दिगंबर साळुंखे, चंद्रकांत माने उपस्थित होते. उमेद अभियानाच्या वतीने जवळपास चार लाख ५० रुपये किंमतीचे शालेय साहित्य ७०० विद्यार्थी यांना वाटप करून सामजिक कार्यात सहभागी झाल्याचा आनंद व्यक्त केला.



## राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त बीएसएनएल येथे शपथ कार्यक्रम

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

भारत सरकारचे गृहमंत्री व सहकार मंत्री आदरणीय श्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशभर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. सरदार पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त देशभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांच्या एकजुट भारताच्या कार्याची प्रेरणा आजही देशवासीयांना एकात्मतेचा संदेश देते. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा टेलिफोन भवन, बीएसएनएल कार्यालयात राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाप्रबंधक श्रीकांत मुब्रूखाणे यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गास राष्ट्रीय एकता शपथ देण्यात आली. याप्रसंगी उपमहाप्रबंधक विठ्ठल कुलकर्णी, श्रीधर अतनूर, संतोष जेटगी, बिराजदार, कोलारकर, त्रिंबके, रवी लिंगनूर, प्रवीण कवडे, राजेश तेलगावकर, अमित पोटफोडे, कुमार आळगीकर, ए. शेख, व्ही. माने, प्रवीण कवडे, प्रशांत कवडे, अंकोलीकर तसेच कार्यालय अधीक्षक सुजित हावळे उपस्थित होते.

# 'रेशीमगाठी' पुन्हा जुळताहेत, संसार फुलताहेत

### वादानंतर विस्कटलेल्या नात्यांची पुनर्बांधणी करताना जोडपी करताहेत नव्या नियमांची आखणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

एकमेकांशिवाय राहवत नाही; पण एकत्र राहणंही अवघड या भावनेतून अनेक जोडपी आज नव्या अटी-शर्तीवर आपला संसार पुन्हा फुलविताना दिसत आहेत. वैचारिक मतभेद, वेगवेगळ्या जीवनशैली, व्यसनाधीनता, एकत्र कुटुंबातील तणाव किंवा परस्परांवरील संशय अशा अनेक कारणांवरून दाम्पत्यांत वाद होतात. त्यामुळे पत्नी माहेरी निघून जाते किंवा पती तिला घराबाहेर काढतो. अशा परिस्थितीत वाद किंवा राग शांत झाल्यानंतर पत्नी नांदायला येत नसेल किंवा पती नांदायला घेऊन जात नसेल तर साथीदार न्यायालयाचा दरवाजा ठोठावतो. त्यानंतर, पुन्हा एकत्र येताना मात्र जोडपी विविध अटी अनब शर्तीचा आधार घेत असल्याचे चित्र कौटुंबिक न्यायालयात दिसून येत आहे.

भांडण झाल्यानंतर माहेरी गेलेली पत्नी किंवा पत्नीला नांदविण्यास तयार नसलेला पती अशा दोन्ही परिस्थितीत साथीदार न्यायालयाचा दरवाजा ठोठावतात. हिंदू विवाह कायद्यातील कलम ९ नुसार अशा जोडप्यांना पुन्हा एकत्र येण्याची कायदेशीर संधी मिळते. पती अथवा पत्नीने न्यायालयात अर्ज केल्यानंतर त्या दोघांचे



समुपदेशकामार्फत समुपदेशन केले जाते. या वेळी, त्यांच्याकडून एकमेकांसमोर अटी-शर्ती ठेवल्या जातात. त्या मंजूर झाल्यानंतर न्यायालय त्या जोडप्यांच्या एकत्रित येण्याच्या आदेशात या अटी-शर्तीचा उल्लेख करते. तसेच न्यायालयास योग्य वाटतील, अशा बाबींचा देखील त्यात उल्लेख असतो. दाम्पत्यांना अटी-शर्ती मंजूर झाल्यानंतर त्यावर न्यायालयाचा शिक्कामोर्तब होतो अन् पुन्हा नव्याने संसाराला सुरुवात होते. प्रत्येक प्रकरणातील अटी व परिस्थिती वेगवेगळ्या असतात. जोडप्यातील मतभेदांचे स्वरूप काय आहे, हे समजून घेत समुपदेशनानंतर न्यायालय त्यावर निर्णय देते. एखाद्या जोडीदाराने धर्मांतर करणे, मानसिक आजाराने ग्रस्त असणे किंवा कोणत्याही वैध कारणाविना संसार त्यागणे अशा परिस्थितींमध्ये अर्ज नामंजूर होण्याची शक्यता अधिक असल्याचे वकिलांनी सांगितले.

बहुतांश प्रकरणात अटी-शर्ती म्हणजे नाते तुटण्याचे कारण मानले जाते. परंतु, आजची जोडपी त्यांच्याच माध्यमातून नातं जपण्याचा प्रयत्न करत आहेत. तडजोड नव्हे, तर नव्या नियमांच्या चौकटीतून पुन्हा एकदा संसार उजळिवण्याचा हा प्रयत्न आधुनिक काळातील नवा विवाहसंस्कार ठरत आहे.

*** दोघांकडून ठरविल्या जाणाऱ्या प्रमुख अटी -**
- काही विशिष्ट व्यक्तींशी संबंध ठेवायचे नाहीत.
- समाजमाध्यमांत वावर मर्यादित ठेवायचा.

*** पतीकडून ठेवण्यात येणाऱ्या प्रमुख अटी...**
- वाद घालायचा नाही.
- सासू-सासऱ्यांची काळजी घ्यायची.
- कुटुंबाच्या हितासाठी सल्ला ऐकायचा.
- सासरकडील मंडळींचा संसारातील प्रत्येक गोष्टींमध्ये हस्तक्षेप नको.

*** पत्नीकडून ठेवण्यात येणाऱ्या प्रमुख अटी...**
- पतीने व्यसन करायचे नाही.
- शारीरिक, मानसिक छळ करायचा नाही.
- सासू-सासऱ्यांसोबत राहायचे नाही.
- माहेरच्या लोकांना आदराने वागवायचे.



## माथाडी कामगार, चालकांसाठी आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

सोलापूर मालधक्का येथे माथाडी कामगार आणि चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कर्मचारी कल्याण आणि सामुदायिक आरोग्यासाठी एक सक्रिय पाऊल म्हणून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २९ आणि ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर मालधक्का परिसरात, रामवाडी येथे माथाडी कामगार आणि ट्रक/टेम्पो चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरादरम्यान एकूण ९४ एक्स-रे, ८१ रक्त चाचण्या, ५७ सायनस टीबी चाचण्या आणि १८ थुंकीच्या चाचण्या घेण्यात आल्या. सोलापूर महानगरपालिकेच्या क्षयरोग विभागातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या समर्पित टीमने आरोग्य तपासणी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. हा उपक्रम सोलापूर महानगरपालिका रुग्णालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता आणि सोलापूरच्या मुख्य वस्तू पर्यवेक्षक आणि त्यांच्या टीमकडून मौल्यवान सहकार्य मिळाले, ज्यामुळे सुरळीत समन्वय आणि सहभाग सुनिश्चित झाला. पंतप्रधानांच्या 'क्षयरोग मुक्त भारत अभियान' (क्षयरोगमुक्त भारत मोहीम) अंतर्गत वस्तू हाताळणीच्या कामात गुंतलेल्या कामगारांमध्ये क्षयरोग आणि इतर आरोग्य समस्यांचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे आरोग्य शिबिर सोलापूर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि सार्वजनिक आरोग्यासाठीच्या सततच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते.

## विकास सहकारी बँकेतर्फे श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांचे वाग्यज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

येथील विकास सहकारी बँकेतर्फे बुधवार ५ नोव्हेंबर ते शुक्रवार ७ नोव्हेंबर दरम्यान श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर ह्यांच्या वाग्यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार ५ नोव्हेंबर ते शुक्रवार ७ नोव्हेंबर दरम्यान रोज सायंकाळी साडे सहा ते साडे आठ ह्यावेळेत हेरिटेज लॉन्स, गांधीनगर येथे प्रवचने संपन्न होतील. २००९ पासून प्रतिवर्षी चैतन्य महाराजांची ज्ञानेश्वरीतील विविध विषयांवर सोलापूरात प्रवचने होत असून ह्यावर्षी म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु अर्थात (कर्तृत्व आणि कृपा) ह्या अठराव्या अध्यायातील ओवीवर महाराज सलग तीन दिवस विवेचन करतील.



गेल्या दोनशे वर्षांपासून ज्ञानेश्वरी सेवा आणि चातुर्मासात पंढरीत वास्तव्य ही देगलूरकर घराण्याची परंपरा आहे, त्यांचे निष्ठापूर्वक जतन आणि संवर्धन करण्याचे काम चैतन्यमहाराज करीत आहेत. आजपर्यंत महाराजांनी ज्ञान,भक्ती, कर्म, मन,बुद्धी, अहंकार, दैवी संपत्ती,गुरू महिमा,पसायदान अशा वैविध्यपूर्ण विषयांवर मंडलेले अभ्यासपूर्ण चिंतन सोलापूरकरांच्या पसंतीस उतरले आहे.

मागील २२ वर्षापासून प्रतिवर्षी परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी यांच्या त्रीदिवसीय वाग्यज्ञाचे आयोजन बँकेमार्फत केले जात असे. या वाग्यज्ञास सर्व बंधू भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे चेअरमन कमलकिशोर राठी, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार आणि सर्व संचालकांनी केले आहे.





# पालिकेच्या बस स्टॉपमध्ये पडलेले भगदाड बुजविले

### 'तरुणभारत'च्या वृत्ताची दखल; महापालिकेची कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

शहराच्या मध्यवर्ती अशा गजबजलेल्या ठिकाणी असलेल्या सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाच्या लकी चौकातील बस स्टॉप मध्ये मोठे भगदाड पडल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच महापालिकेने दखल घेतली. या बस स्टॉपमधील ते भगदाड बुजविण्यात आले आहे. महापालिकेने कार्यवाही केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरातील नवी पेठ लगत असलेल्या सुभाष चौक (लकी चौक) येथे सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाचे बस स्टॉप अनेक वर्षापासून आहे. वर्दळीच्या ठिकाणी असलेले हे बस स्टॉप प्रसिद्ध आहे. नेहमी या ठिकाणी मोठी गजबज असते. मात्र या बस स्टॉपच्या खालच्या बाजूला खंदक बागेकडे मोठे भगदाड पडले होते. यामुळे या बस स्टॉप मध्ये थांबणे धोकादायक झाले होते. गेल्या अनेक दिवसापासून याकडे महापालिका परिवहन उपक्रम प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तातडीने दखल घेतली.

महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतर नियंत्रण अधिकारी तपन डंके यांनी याबाबत कार्यवाही केली. संबंधित विभागाकडून या बस स्टॉपमधील ते पडलेले भगदाड बुजविण्यात आले आहे. बस स्टॉप परिसरातील स्वच्छताही करण्यात आली. महापालिका प्रशासनाने कार्यवाही केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

दरम्यान, विशेष म्हणजे या बस स्टॉपच्या समोरच दुचाकी आणि चार चाकी वाहने पार्किंग केली जातात. यामुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या बस स्टॉपची असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे. महापालिका परिवहन उपक्रम सुधारत असतानाच बस स्टॉपकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज वर्तवली जात आहे.

# ११ डिसेंबर रोजी होणाऱ्या मोर्चात सहभागी व्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मु.पो.लवंगी येथे श्री गणेश सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ही बैठक महादेव मंदिरात घेण्यात आली. यावेळी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे तालुकाध्यक्ष गुरूशांत कुंभार उपस्थित होते या बैठकीचे अध्यक्ष सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक व मोहोळ तालुका अध्यक्ष भास्कर कुंभार हे होते तर प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, सचिव धोंडिराम जेवूरकर, माळकवठे येथील भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सिद्राम बगले यांची होती. सिद्राम बगले



यांनी प्रास्ताविक केले तर अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी मी येथे का आपणांस विनंती करण्यासाठी आलों आहे कारण ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात विधानभवनवर मोर्चा काढण्यात येणार आहे त्यासाठी आपण जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालय कर्मचारी यांच्या किमान वेतन साठी मोर्चा काढण्यात येणार असून जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे . यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी सविता बेडगे, हेमलता पाटील, शशिकला बिराजदार, आरती पाटील, गुरुशात कुंभार, संजीव माणकोजी, श्रीशैल कुरणे, रूद्राप्पा बाके, इंद्रजित माने, संतोष कुंभार, रेवणप्पा काळे, संजय बिराजदार उपस्थित होते. आभार काशिनाथ पाटील यांनी मानले.

**सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.**
**शंकरनगर-अकलुज पो. यशवंतनगर (४१३११८) ता. माळशिरस जि. सोलापुर**
फोन नं.0२१८५ - २२२0४८,२२२२४८ फॅक्स नं.0२१८५ - २२२२४९
Email: smsmpssk@gmail.com Website: www.aklujsugar.com

**इथेनॉल वाहतूक टेंडर नोटीस**

आमचे कारखान्याकडील गळीत हंगाम २०२५-२०२६ मध्ये क्वार्टर-१ मध्ये उत्पादीत होणारे ५५.२० लाख लिटर इथेनॉल दि. 0१/११/२०२५ ते दि. २८/0२/२०२६ या कालावधीत कारखाना साईट ते खालील तपशिलाप्रमाणे ऑईल कंपनीचे डेपोंना टँकरव्दारे इथेनॉल वाहतूक करणाऱ्या अधिकृत वाहतूक कंत्राटदाराकडुन सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. नं. | वाहतूकीचे ठिकाण | एकेरी अंतर किमी |
|---|---|---|
| १ | बेंगलोर, कर्नाटक | ७३९.0 |
| २ | लोणी, पुणे, महाराष्ट्र | १५२.७0 |
| ३ | तिरूनावेल्ली, तामीळनाडू | १२६३.९0 |

तरी वाहतूकीचे सिलबंद टेंडर मा. कार्यकारी संचालक यांचे नावे शनिवार दि. ७/११/२०२५ रोजी दु. २.00 वा. पर्यंत ई-मेल व्दारे किंवा समक्ष जमा करावेत. सिलबंद टेंडर पाकीटावर **'इथेनॉल वाहतूकीचे कोटेशन'** असा स्पष्ट उल्लेख करून, पाकीटावर संपुर्ण पत्त्यासह मोबाईल नंबर देणेत यावा. तसेच इथेनॉल वाहतूकदार यांनी त्यांचेकडे स्वमालकीचे विविध क्षमतेचे २० टँकर सुस्थितीत असलेचा कागदोपत्री पुरावा व इथेनॉल वाहतूकीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शासकिय परवाने विधीग्राहय असल्याची पुर्तता करावी. टेंडर मंजुर झालेल्या वाहतूकदारांनी रू.१ लाख EMD आर.टी.जी.एस. ने जमा करावी.

वरीलप्रमाणे इथेनॉल वाहतूकीचे टेंडर स्विकारणे अथवा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा हक्क कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**राजेंद्र केरबा चौगुले**
**कार्यकारी संचालक**

**सही/-**
**शंकरराव रामचंद्रराव माने-देशमुख**
**व्हाईस चेअरमन**

**सही/-**
**जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील**
**चेअरमन**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी जि, सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि वैराग व ता. बार्शी पैकी नगरपंचायत वैराग हद्दितील येथील गट नं. ११८/१ याचे क्षेत्र 0.0८.00 हे.आर.चौ.मी.(0.८ आर) आकार 0 रू. १५ पैसे यापैकी क्षेत्र 0.00३.७0 हे.आर. चौ.मी. याचा नगरपंचायत मिळकत नंबर २२२२/४ असून नगरपंचायत दप्तरी क्षेत्रफळ ३७५८ चौ.फूट आहे. सदर जागेचा प्लॉट नं.६ आहे. याचे मोजमाप दक्षिण-उत्तर रूंदी २३ मी. ४८ सेमी.(७७ फूट) व पूर्व-पश्चिम लांबी१५ मी. 0४ सेमी(४९ फूट) आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं. ५, दक्षिणेस-गुरव यांची जमीन व उत्तरेस-२४ फूट रूंद रस्ता, याची वागणूक व पाणी उत्तर बाजुने जाणेची वहिवाट आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुली प्लॉटजागा आतिल तदंगभूत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कासहीत. सदरची प्लॉट जागा वैराग नगरपंचातीच्या हद्दीतील असून रहिवाशी झोनमधील आहे.

उपरोक्त वर्णन केलेल्या खुली प्लॉट जागा ही श्री. धनाजी मोहन सुतार यांची स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे. विद्यमान मालकांनी सदरची प्लॉटजागा त्यांचे प्रांपचिक अडचणीसाठी व व्यवसायासाठी आर्थिक गरज असल्यामुळे विक्रीस काढलेली आहे व आमचे अशिलाबरोबर विक्री करणेकामी ठराव केलेला आहे. सदर प्लॉटजागा मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद प्लॉटजागेवरती कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर प्लॉट जागेसंदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरूपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर प्लॉटजागेवर कोणाचा बोजा हक्क हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास काही वाद असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात हरकत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर प्लॉटजागा ही निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १/११/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. घोडके आर. आर.**
B.Sc. L.L.B Roll No. - MAH/2166/2018
**वैराग, ता. बार्शी सोलापूर**
**मो.नं. ९८८१८४१५९५**

विशेष वसुली व विक्री अधिकारी दि लक्ष्मी को ऑप बँक लि. सोलापूर (अवसायानात) मुख्य कार्यालय- ३१९ दक्षिण कसबा सोलापूर

**स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष्य ताबा बाबत सूचना**

सर्व जनतेस, कर्जदार, भागीदार, जामीनदार यांना सदर ताबा सुचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्या अर्थी दि लक्ष्मी को. ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर मुख्य कार्यालय सोलापूर या संस्थेचे विशेष वसुली अधिकारी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७/३ अन्वये दिनांक ११/१२/२०२१ रोजी कर्जदार प्रथमेश मेडिकल अँड जनरल स्टोअर्स चे प्रो. प्रा. बाळप्पा अडव्यंप्पा नंदुरे व जामीनदार यांना मागणीची सूचना (डिमांड नोटीस) पाठवून १५ दिवसाचे आत थकीत रक्कम आमचेकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्याअर्थी सदर कर्जदार, जामीनदार यांना कळविणेत येते की खालील सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा दिनांक ०१/०९/२०२३ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम ११ ड (१) अन्वये प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. आणि मा. उपविभागीय दंडाधिकारी सोलापूर (जा. क्रं २०२५/उविअक्रं. १/एमजी/एस.आर.कावि ७५८/२०२५ दि, १९/०८/२०२५) यांच्या आदेशाने दि. २८/१०/२०२५ रोजी प्रत्यक्ष्य ताबा घेतला आहे. सबब उपरोक्त कर्जदार, जामीनदार आणि तमाम जनतेस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, विक्री, बोजा, तारण, वाटणी, वहिवाट, बक्षीस, भाडेपट्टा अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये याउपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे असे ठरवून आमचे बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही याची नोंद उपरोक्त कर्जदार, जामीनदार आणि तमाम लोकांनी घ्यावी,

**स्थावर मालमत्तेचा तपशील मिळकतदार-बाळप्पा आडव्याप्पा नंदुरे**

जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील उत्तर कसबा येथील सि.सं.नं.१३८० विठ्ठल आर्केड या इमारतीवर बांधण्यात आलेल्या गाळा नं १४ यासी क्षेत्रफळ २७९० चौ. मी. यासि चतुःसिमा येणेप्रमाणे
पूर्वेस-गाळा नं १३ दक्षिणेस-प्यासेज
पश्चिमेस-प्यासेज उत्तरेस-पार्किंग

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि. लक्ष्मी को ऑप बँक लि. (अवसायनात)**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### महिला विश्वचषकात सुनिधी चौहान गाणार



**नवी दिल्ली** : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रविवारी नवी मुंबईत होणाऱ्या आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या अंतिम सामन्यात भारतीय गायिका सुनिधी चौहान आपल्या सर्वात प्रसिद्ध गाणे गाऊन प्रेक्षकांना आनंदित करणार आहे. भारतातील घराघरात प्रसिद्ध असलेली सुनिधी ६० नर्तकांच्या गटासह येणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक संजय शेट्टी यांचा स्पेशल-इफेक्ट फटाक्यांचा कार्यक्रम देखील असेल, असे आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये मध्य-डाव दरम्यान लेसर शो, ३५० मास्ट कास्ट कलाकार आणि ड्रोन प्रदर्शन यांचा समावेश असेल. जेमिमाह रॉड्रिग्जच्या विजयी शतकी खेळीच्या बळावर भारताने उपांत्य सामन्यात सात वेळा विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर अंतिम फेरीसाठी आपले स्थान निश्चित केले. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडला नमवून यजमान संघाविरुद्धच्या जेतेपदाच्या लढतीत आपले स्थान पक्के केले. सामन्यापूर्वी सुनिधी भारतीय राष्ट्रगीत सुद्धा गाणार आहे, तर केपटाऊनच्या टॅरिन बँककडून दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रगीत सादर केले जाईल. ■

### न्यूझीलंडने इंग्लंडविरुद्धची वन-डे मालिका जिंकली

**वेलिंग्टन** : माउंट मौंगानुई आणि हॅमिल्टन येथे झालेल्या पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात विजय मिळवल्यानंतर, यजमान न्यूझीलंडने स्काय स्टेडियमवर झालेल्या मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात रोमांचक विजय मिळवला आणि इंग्लंडला ०-३ असा हृदयद्रावक पराभव पत्करावा लागला. मिशेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील संघाने पाहुण्या संघाचा दोन गड्यांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना, इंग्लंडचा संघ ४०.२ षटकांत २२२ धावांवर गारद झाला. जेमी स्मिथ, बेन डकेट आणि जो रूट स्वस्तात बाद झाल्याने टॉप-ऑर्डर फलंदाज अपयशी ठरले.

### प्रो-रेसलिंग लीगचे जानेवारीत पुनरागमन

**नवी दिल्ली** : प्रो-रेसलिंग लीग जानेवारीमध्ये होणार आहे. ही लीग १८ दिवस चालेल आणि सहा संघांपैकी प्रत्येकी नऊ कुस्तीगीर असतील, ज्यात चार महिलांचा समावेश असेल. सर्व संघांमध्ये पाच भारतीय आणि चार परदेशी कुस्तीगीर असू शकतात. कोरोनाच्या साथीमुळे चार हंगामांनंतर निलंबित करण्यात आलेली प्रो रेसलिंग लीग जानेवारी २०२६ मध्ये पुनरागमन करणार आहे, आर्थिक पारदर्शकता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी कुस्ती फेडरेशन ऑफ इंडिया थेट कुस्तीगीर आणि फ्रँचायझींना पैसे देणार आहे. माजी प्रमुख ब्रिजभूषण शरण सिंग यांच्या विरोधात झालेल्या निषेधाचा भाग असलेल्या कुस्तीगीरांना भेदभाव सहन करावा लागणार नाही आणि त्यांना लिलावात त्यांची नावे नोंदवण्याची परवानगी दिली जाईल. पूर्वी, डब्ल्यूएफआयने वार्षिक रॉयल्टी शुल्कासाठी प्रो-स्पोर्टीला आयोजन करण्याचे अधिकार दिले होते, परंतु बहुतेक सहभागींनी तक्रार केली की त्यांना अनेक वर्षांपासून त्यांचे कर वजावटीवर स्रोत तपशील मिळाले नाहीत. ■

# भारताचे लक्ष्य ऐतिहासिक विश्वचषक

◆ **नवी मुंबई, १ नोव्हेंबर**

भारतीय महिला क्रिकेट एका निर्णायक क्षणाच्या उंबरठ्यावर आहे, जो पुरुषांच्या १९८३ च्या ऐतिहासिक विजयाची आठवण करून देतो. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ रविवारी येथे आयसीसी महिला वन-डे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेचा सामना करताना आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याचा निर्धार करत आहे.

विश्वचषकाच्या १३ व्या आवृत्तीत तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचलेला भारत आणि पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचलेला दक्षिण आफ्रिका यांच्यात एक नवीन विजेता निर्माण होणार आहे.

विश्वविजेतेपद जिंकल्यास भारतात महिला क्रिकेटमध्ये अभूतपूर्व रस निर्माण होऊ शकतो. तरुण मुलींच्या नवीन पिढीला हा खेळ स्वीकारण्यास प्रेरणा मिळू शकते. तीन हंगामांपूर्वी महिला प्रीमियर लीगच्या आगमनापेक्षाही जास्त मुली क्रिकेट खेळण्यासाठी मैदानावर येऊ शकतात.

**भारताला तिसऱ्यांदा संधी**

यजमान भारतीय महिला संघाला ऑस्ट्रेसलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यातील विजयाच्या आनंदातून लवकर बाहेर पडावे लागणर आहे. जेमिमाह रॉड्रिग्जची अविस्मरणीय १२७ धावा आणि हरमनप्रीतची ८९ धावांची खेळी आणि सात वेळचा विश्वविजेता ऑस्ट्रेलियाच्या असामान्यपणे अनियमित खेळीमुळे भारत तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला.

२०१७ च्या एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यात भारताचा इंग्लंडविरुद्ध नऊ धावांनी झालेला पराभव अजूनही त्या मोहिमेचा भाग असलेल्यांसाठी वेदनादायक आहे, यात हरमनप्रीतचाही समावेश आहे. त्यानंतर २०२३ च्या टी-२० विश्वचषक उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच धावांनी पराभव झाला आणि २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाच्या सामन्यात त्याच प्रतिस्पर्ध्यांकडून आणखी एक हृदयद्रावक पराभव झाला.

भारतासाठी, लढाई आता कौशल्य किंवा फॉर्म सिद्ध करण्याबद्दल नाही, तर या स्पर्धेत अंतिम अडथळ्याला पार करण्याबद्दल आहे. भारताला विश्वचषक जिंकण्यासाठीची ही तिसरी संधी आहे.

सलग तीन सामने गमावल्यानंतर भारतीय महिला संघाने माजी विजेत्या न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियावर जबरदस्त विजय मिळवून घरच्या मैदानावर पुन्हा एकदा जोरसादर मुसंडी मारली, आता त्यांनी विजयाची हीच लय अंतिम फेरीत कायम ठेवण्याची अपेक्षा आहे.

भारताला सर्वोत्तम फलंदाज स्मृती मंधाना (३८५ धावा) धावा काढेल अशी अपेक्षा होती परंतु तिला जेमिमाह रॉड्रिग्जच्या रूपात एक शिल्पकार सापडला.

डीवाय पाटील स्टेडियमच्या सपाट खेळपट्टी उच्च धावसंख्या आणि सायंकाळी दव पडण्यासाठी ओळखली जाते. आता भारतीय महिलांनी क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजीत उत्तम कामगिरी करणे अपेक्षित आहे. भारताने ऑस्ट्रेलियावर मात करताना वेगवान गोलंदाज क्रांती गौड व रेणुका सिंग ठाकूरने लयीसाठी संघर्ष केला व कर्णधार हरमनप्रीतनेही एक नियमित झेल सोडला. परंतु स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणारी १७ बळी घेणारी दीप्ती शर्मा पुन्हा एकदा भारताच्या यशाची गुरुकिल्ली ठरेल.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेला 'अंडरडॉग' म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय जिद्द व चिकाटी दाखवली आहे. अनुभवी मॅरिझाने कॅप (२०४ धावा, १२ बळी), नादिन डी क्लार्क (१९० धावा, ८ बळी), तझमिन ब्रिट्स (२१२ धावा), क्लोई ट्रायन (१६७ धावा, ५ बळी) आणि कर्णधार लॉरा वोल्वार्डने (४७० धावा) उत्तम कामगिरी केली आहे. डावखुरी फिरकी गोलंदाज नोनकुलुलेको म्लाबा (१२ विकेट) भारताच्या उजव्या हाताने जबरदस्त फलंदाजीची परीक्षा घेईल.

गत वर्षी टी-२० विश्वचषक अंतिम फेरीत न्यूझीलंडकडून पराभव पत्करल्यानंतर, एक पाऊल पुढे जाण्याची दक्षिण आफ्रिकेची भूक प्रचंड आहे.

**इतिहास घडविण्यासाठी हरमनप्रीतला अखेरची संधी**

शेवटी, कोणता संघ दबाव चांगल्या प्रकारे हाताळतो यावर स्पर्धा अवलंबून असेल. हरमनप्रीत कौरसाठी, कर्णधार म्हणून एकदिवसीय विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला म्हणून इतिहासात आपले नाव कोरण्याची ही शेवटची संधी असू शकते. ◀(वृत्तसंस्था)



शनिवारी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर भारत महिला आणि दक्षिण आफ्रिका महिला यांच्यातील आयसीसी महिला विश्वचषक अंतिम एकदिवसीय क्रिकेट सामन्यापूर्वी सराव सत्रादरम्यान भारताची हरलीन देओल, (डावीकडे), जेमिमाह रॉड्रिग्ज (मागे मध्य भागी) व दीप्ती शर्मा (समोर मध्य भागी)

**भारत- दक्षिण आफ्रिका अंतिम सामना आज**

**स्थळ** : डी. वाय. पाटील स्टेडियम, नवी मुंबई
**वेळ** : दुपरी ३.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्टसवर

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), ऋचा घोष (यष्टिरक्षक), उमा चेत्री (यष्टिरक्षक), जेमिमाह रॉड्रिग्ज, हरलीन देओल, शेफाली वर्मा, अमनजोत कौर, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, क्रांती गौड, रेणुका सिंह ठाकूर, श्री चरणी, अरुंद, अरविंद.

**दक्षिण आफ्रिका** : लॉरा वोल्वार्ड (कर्णधार), ताझमिन ब्रिट्स, सिनालो जाफ्ता, काराबो मेसो, ॲनेके बॉश, नादिन डी क्लर्क, ॲनेरी डेर्कसेन, मारिझान कॅप, सुने लुस, नॉन्डुमिसो शांगासे, क्लो ट्रायॉन, अयाबोंगा खाका, मसाबालु, सेब्बाले, मसाबालु, सेबाला.

# श्रेयस अय्यरला रुग्णालयातून सुटी

### आता त्याची प्रकृती स्थिर: बीसीसीआय

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात यशस्वीरित्या झेल घेण्याच्या प्रयत्नात प्लीहा आणि बरगडीच्या दुखापतीनंतर भारताचा एकदिवसीय उपकर्णधार श्रेयस अय्यरला सिडनी येथील रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. आता त्याची प्रकृती सुधारत आहे.

सिडनी आणि भारतातील तज्ज्ञांसह बीसीसीआय वैद्यकीय पथक त्याच्या प्रकृतीवर समाधानी आहे आणि त्याला आज रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे, असे बीसीसीआयने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे.

तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर ॲलेक्स कॅरीचा कठीण झेल घेण्याचा प्रयत्न करताना ३० वर्षीय अय्यर याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली होती.

अय्यर जेव्हा विमान प्रवास करण्याजोगा तंदुरुस्त होईल तेव्हा तो भारतात परतण्याची अपेक्षा आहे, परंतु पुढील दोन महिने तो खेळापासून दूर राहील.

दुखापत त्वरित ओळख पटली आणि किरकोळ प्रक्रियेनंतर रक्तस्त्राव त्वरित थांबवण्यात आला. त्यासाठी त्याचे योग्य वैद्यकीय व्यवस्थापन करण्यात आले आहे, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# टेनिसपटू रोहन बोपण्णा निवृत्त

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**



भारताचा दोन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता रोहन बोपण्णाने शनिवारी व्यावसायिक टेनिसमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यामुळे त्याच्या २० वर्षांच्या कारकिर्दीचा शेवट झाला. त्याने आतापर्यंत देशाला अनेक गौरव मिळवून दिले.

बोपण्णाने निवृत्तीचा निर्णय पॅरिस मास्टर्स १००० मध्ये ॲलेक्झांडर बुब्लिकसोबत खेळल्यानंतर काही दिवसांनी घेतला. या जोडीला अखेर ३२ व्या फेरीत जॉन पीअर्स आणि जेम्स ट्रेसी यांच्याकडून ५-७, ६-२, १०-८ असा पराभव पत्करावा लागला.

२० अविस्मरणीय वर्षांच्या दौऱ्यानंतर आता मी अधिकृतपणे माझी रॅकेट बंद करत आहे, असे रोहनने एका लांबलचक पोस्टमध्ये लिहिले.

भारतातील महान टेनिसपटूंपैकी एक म्हणून ओळखले जाणारा बोपण्णा याने आपल्या शक्तिशाली सर्व्हिस, कुशल नेट कौशल्ये आणि पुरुष आणि मिश्र दुहेरीमध्ये कायमस्वरूपी प्रभाव यांच्या आधारे एक उल्लेखनीय वारसा निर्माण केला. वीस वर्षांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत, ४५ वर्षीय हा खेळाडू भारतीय टेनिसचा आधारस्तंभ राहिला आहे, त्याने अनेक डेव्हिस चषक मोहिमांमध्ये आणि ऑलिम्पिक स्पर्धेत अभिमानाने देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# विदर्भाविरुद्ध तामिळनाडू ४ बाद २५२

### प्रदोष रंजन पॉलचे शतक

◆ **कोइम्बतूर, १ नोव्हेंबर**

प्रदोष रंजन पॉलने फलंदाजीत आपली उत्तम कामगिरी सुरू ठेवत आणखी एक शतक झळकावले. शनिवारी विदर्भाविरुद्धच्या एलिट ग्रुप अ रणजी करंडक सामन्याच्या पहिल्या दिवशी खेळ थांबला तेव्हा तामिळनाडूने ४ बाद २५२ धावा केल्या.

मागील फेरीत नागालॅण्डविरुद्ध कारकिर्दीतील सर्वोत्तम द्विशतक ठोकणाऱ्या पॉलने १३ चौकारांसह ११३ धावा केल्या, तर बाबा इंद्रजित खेळाच्या शेवटी ९४ धावांवर नाबाद होते, तो आपल्या शतकापासून सात धावा दूर आहे. तामिळनाडूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पॉलने इंद्रजितसोबत चौथ्या गड्यासाठी १७९ धावा जोडल्या. सलामीवीर विमल कुमार (२) आणि अतीश एसआर (३) अनुक्रमे नचिकेत भुते आणि प्रफुल्ल हिंगे यांनी स्वस्तात बाद केल्याने यजमान संघ सुरुवातीलाच अडचणीत सापडला होता. त्यानंतर पॉलने अँड्र्यू सिद्धार्थ सी सोबत हातमिळवणी करून डाव सावरला आणि नंतर तो ३० व्या षटकात अक्षय कर्णेवारला बाद झाला. डावखुरा फलंदाज इंद्रजित सोबत एक मजबूत भागीदारी करून तमिळनाडूला सुरक्षिततेकडे नेले. ◀(वृत्तसंस्था)

# बुमराह खेळत असेल तर अर्शदीपचे नाव यादीत दुसऱ्या क्रमांकावर असायला हवे : अश्विन

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**

भारताचा माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने भारतीय संघ व्यवस्थापनाच्या टी-२० अंतिम एकादशममधून अर्शदीप सिंगला वगळण्याच्या निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

कामगिरीनुसार जसप्रीत बुमराहनंतर डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप हा दुसऱ्या क्रमांकाचा पसंतीचा वेगवान गोलंदाज असावा. अर्शदीपसारख्या सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूला दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही, असे अश्विनने म्हटले आहे.

मेलबर्नमध्ये झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियाकडून चार गड्यांनी पराभव झाल्यानंतर अश्विनने हे विधान केले. भारताचा संघ केवळ १२५ धावांवर गारद झाला, परंतु ऑस्ट्रेलियाने १४ षटकांतच धावांचा पाठलाग करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. कॅनबेरा येथे झालेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला टी-२० सामना वाया गेला..

जर बुमराह खेळत नसेल, तर अर्शदीप त्या संघाच्या यादीत प्रथम क्रमांकाचा पहिला गोलंदाज होतो. या संघातील अकरा खेळाडूंमधून अर्शदीप सिंग कसा बाहेर पडतो हे मला समजत नाही, असेही अश्विन म्हणाला. रोहित शर्मा-राहुल द्रविडच्या काळात, अर्शदीप टी-२० क्रिकेटमध्ये भारताच्या सर्वात विश्वासार्ह वेगवान गोलंदाजांपैकी एक झाला होता आणि सध्या तो या फॉरमॅटमध्ये देशातील सर्वाधिक बळी टिपणारा आणि १०० बळींचा टप्पा ओलांडणारा पहिला भारतीय गोलंदाज आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताला पहिल्या विजयाची आशा

◆ **होबार्ट, १ नोव्हेंबर**

रविवारी होबार्टमधील निमजा स्टेडियममध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया संघादरम्यान तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. जोश हेझलवूडच्या अनुपस्थितीत भारतीय फलंदाज चांगली कामगिरी करण्याचा आणि मालिकेत पहिला विजय नोंदविण्याचा प्रयत्न करतील. सध्या पाच सामन्याच्या टी-२० मालिकेत ऑस्ट्रेलिया १-० ने आघाडीवर आहे. पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द करण्यात आला.

या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या ॲशेस कसोटी मालिकेत हेझलवूडला पुन्हा जोमाने खेळता यावे म्हणून त्याला विश्रांती देण्यात आली आहे. हेझलवूड भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतील उर्वरित सामन्याचा भाग असणार नाही. त्यामुळे हेझलवूडत्या योग्य लांबी व अचूक गोलंदाजीमुळे भारताच्या अव्वलर फलंदाजांना कोणत्याही दडपणाविना खेळण्याची संधी मिळेल.

'हे निश्चितच दिलासादायक ठरेल. मी कधीही अशा गोलंदाजीचा सामना केला नव्हता, असे स्टार सलामीवीर अभिषेक शर्मा मेलबर्न सामन्यानंतर म्हणाला होता.

हेझलवूडच्या अनुपस्थितीचा अर्थ असा होईल की, भारतीय फलंदाज उसळी व वेगवान चेंडू हाताळण्यात थोडे कमकुवत दिसत आहे. त्याच्या अनुपस्थितीमुळे झेवियर बार्टलेट, नॅथन एलिस किंवा शॉन ॲबॉट सारख्य गोलंदाचा सामना करताना भारतीय फलदाजांना थोडे अधिक आश्वासक वाटेल.



**भारत-ऑस्ट्रेलिया तिसरा टी-२० सामना**

स्थळ : निमजा स्टेडियम, होबार्ट
वेळ : दुपारी १:४५ वाजतापासून (भारतीय वेळेनुसार)
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर



कर्णधार सूर्यकुमार यादव व कर्णधार-इन-वेटिंग शुभमन गिल दोघांनाही अतिरिक्त उसळी व वेगवान गोलंदाजीचा सामना करण्यात अडचणी आल्या होत्या.

मात्र, होबार्ट येथील बेलेरिव्ह ओव्हलच्या सीमा आकाराने लहान आहे. २०१२ मध्ये बेलेरिव्ह ओव्हलवर चॅम्पियन एकदिवसीय फलंदाज म्हणून विराट कोहलीने विजयासाठी ३२१ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेविरुद्ध ८६ चेंडूत नाबाद १३३ धावांची उत्कृष्ट खेळी केली.

**अर्शदीप सिंगला संधी मिळणार**

भारतीय संघ व्यवस्थापनाचा फलंदाजीच्या खोलीबद्दलचा ध्यास या दौऱ्यात चर्चेचा विषय राहिला आहे आणि एमसीजीवर १२५ धावा करणे यासारख्या काही फलंदाजीतील अपयश अशा रणनीतीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात.

अतिरिक्त उसळी असलेल्या खेळपट्टीवर, भारत तीन फिरकी गोलंदाजांसह मैदानात उतरला, परंतु अर्शदीप सिंग हा १०० टी-२० बळींसह एकमेव भारतीय गोलंदाज असूनही त्याला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाले नाही.

जर जसप्रीत बुमराह खेळत असेल, तर अर्शदीप सिंगचे नाव यादीत दुसऱ्या क्रमांकावर असायला हवे. जर बुमराह खेळत नसेल, तर अर्शदीप सिंगचे नाव यादीत पहिले असेल, असे रविचंद्रन अश्विनने म्हटले होते.

जरी कोणी हर्षितला एक सक्षम फलंदाज मानत असेल, जो तो नक्कीच आहे, तरी दुसऱ्या सामन्यातील काही आकडे नक्कीच डोळे उघडणारे असतील.

होबार्टमध्ये एका बाजूला खुले क्षेत्र स्विंग गोलंदाजीला मदत करेल, भारताने अर्शदीपला खेळवण्याच्या वेदीवर एका फिरकी गोलंदाजीचा पर्याय बलिदान देण्याचा विचार केला पाहिजे. ◀(वृत्तसंस्था)

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, अक्षर पटेल, हर्षित राणा, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), अर्शदीप सिंग, रिंकू सिंग, वॉशिंग्टन सुंदर.

**ऑस्ट्रेलिया** : मिचेल मार्श (कर्णधार), शॉन ॲबॉट (सामने १-३), झेवियर बार्टलेट, महली बियर्डमन (सामने ३-५), टिम डेव्हिड, बेन द्वारशुइस (सामने ४-५), नॅथन एलिस, ग्लेन मॅक्सवेल (सामने ३-५), ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुहनेमन, मिचेल ओवेन, जोश फिलिप, तन्वीर संघा, मॅथ्यू शॉर्ट आणि मार्कस स्टोइनिस

# भारत अ संघाला १५६ धावांची गरज

### ऋषभ पंत नाबाद ६४

### दक्षिण आफ्रिका अ संघाचा दुसरा डाव गडगडला

◆ **बंगळुरू, १ नोव्हेंबर**

येथे सुरु असलेल्या भारत अ संघाविरुद्ध पहिल्या अनधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिका अ संघाने दुसऱ्या डावांत १९९ धावा काढून भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य ठेवले. धावांचा पाठलाग करताना दिवस अखेर भारत अ संघाने ३९ षटकांत ४ ब ाद ११९ धावांचा टप्पा गाठला असून त्यांना विजयासाठी आणखी १५६ धावा काढण्याची गरज आहे.

दक्षिण आफ्रिका अ संघाने पहिल्या डावांत ३०९ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात भारत अ संघाला २३४ धावांपर्यंतच मजल मारता आली. पहिल्या डावांत ७५ धावांची आघाडी मिळविणाऱ्या दक्षिण आफ्रिका अ संघाने दुसऱ्या डावात दुसऱ्या दिवस अखेर बिनबाद बिनबाद ३० धावा केल्या, याच धावसंख्येवरून आज दक्षिण आफ्रिकेने पुढे खेळण्यास सुरुवात केली आणि त्यांचा दुसरा डाव ४८.१ षटकांत सर्वबाद १९९ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिका अ संघाने भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य ठेवले. भारत अ संघाने तिसऱ्या दिवस अखेर ३९ षटकांत ४ बाद ११९ धावा काढल्या. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून भारत अ संघाला आता विजयासाठी आणखी १५६ धावा काढण्याची गरज आहे. त्यांच्याकडे आणखी सहा गडी शिल्लक आहे.



ऋषभ पंत : नाबाद ६४, चेंडू ८१ , चौकार ८, षट्कार २

बिनबाद ३० धावावरून पुढे खेळताना दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज भारत अ संघाच्या गोलंदाजांसमोर फारसे चमकू शकले नाही. लेसेगो सेनोक्वाने व झुबायर हामझाने प्रत्येकी ३७ धावांची, तर त्शेपो सिपाम्लाने २५ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य राहिले. दक्षिण आफ्रिका अ संघाला दुसऱ्या डावांत १९९ धावांत गुंडाळताना भारत अ संघाच्या तनुष कोटियानने ४ बळी, अंशुल कम्बोजने ३ बळी, गुरनूर ब्रारने २ बळी, तर मानव सुतारने एक बळी टिपला.

धावांचा पाठलाग करताना भारत अ संघाची घसरगुंडी उडाली, साई सुदर्शन (१२), आयुष म्हात्रे ( ६) व देवदत्त पडिक्कल (५) यांच्या रुपाने तीन महत्त्वपूर्ण मोहरे गमावल्यानंतर मात्र भारत अ संघाने जोरदार मुसंडी मारली. रजत पाटीदार व कर्णधार ऋषभ पंतने आपले कौशल्य पणाला लावत संघाच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी करून संघाला ३७ षटकांत ११९ धावांवर पोहोचवले, मात्र याचवेळी रजत पाटीदार तियान व्हॅन वुरेनच्या गोलंदाजीला बळी पडला. पाटीदारने ८७ चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने २८ धावांची खेळी केली. पुढे ऋषभ पंत व आयुष बदोनीने नाबाद खेळी करत दिवस अखेरपर्यंत भारत अ संघाला ३९ षटकांत ४ बाद ११९ धावांचा टप्पा गाठून दिला. पंत ६४ धावांवर, तर बदोनी शून्यावर नाबाद राहिलो ऋषभ पंतने ८१ चेंडूंत ८ चौकार व २ षट्कार हाणले. ◀(वृत्तसंस्था)

# महिला क्रिकेटपटूही होणार मालामाल

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना खेळताना भारतीय महिला क्रिकेट संघ इतिहासाच्या उंबरठ्यावर आहे आणि रविवारी नवी मुंबईत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने सुवर्णपदक जिंकल्यास त्यांना रोख नफा देऊन सन्मानित करण्यास बीसीसीआय पूर्णपणे सज्ज आहे.

बीसीसीआयचे माजी सचिव आणि आता आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी शिफारस केलेल्या 'समान वेतन' धोरणाचे पालन करून, गेल्या वर्षी अमेरिकेत टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाला देण्यात आलेल्या रकमेइतकीच रक्कम संघाला देण्याचा विचार वरिष्ठ करत आहेत, असे मानले जाते.

पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत कामगिरीसाठी संपूर्ण संघाला - खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला तब्बल १२५ कोटी रुपये बक्षीस देण्यात आले. भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता.

बीसीसीआय पुरुष आणि महिलांना समान वेतन देण्याचे समर्थन करते आणि म्हणूनच अशी अनेक चर्चा आहेत की जर आपल्या मुलींनी विश्वचषक जिंकला तर पुरूषांच्या जागतिक विजयापेक्षा बक्षीस कमी नसेल. परंतु कप जिंकण्यापूर्वी घोषणा करणे चांगले नाही, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले.

भारतीय महिला संघ २०१७ च्या विश्वचषक अंतिम सामन्यात लॉर्ड्सवर इंग्लंडकडून ९ धावांनी पराभूत झाला, तेव्हा बीसीसीआयने प्रत्येक खेळाडूला ५० लाख रुपये बक्षीस दिले होते. माजी मुख्य प्रशिक्षक तुषार आरोठे आणि इतर सपोर्ट स्टाफलाही उत्तम बक्षीस देण्यात आले.

आठ वर्षांनंतर, जर भारतीय महिला संघ जिंकला तर प्रत्येक क्रिकेटपटूला बक्षीस रक्कम कमी नाही तर १० पट जास्त असू शकते. ◀(वृत्तसंस्था)

# भारताने सांघिक गटात जिंकली दोन रौप्यपदके

### आशियाई शालेय बुद्धिबळ

◆ **उलानबाटार, १ नोव्हेंबर**

मंगोलियातील उलानबाटार येथे झालेल्या प्रतिष्ठित आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत ७ वर्षांखालील सांघिक गटात देशासाठी रौप्य पदक जिंकून, तरुण भारतीय बुद्धिबळपटूंचा समावेश असलेल्या संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपले कौशल्य सिद्ध केले.

मुंबईच्या लक्ष सत्येन जैन याच्या नेतृत्वाखालील भारतीय ७ वर्षांखालील संघाने आणि पुण्याच्या एसीएम कविश भट्टड आणि शिवांश नागा आदित्य कासुकुर्तीने प्रशंसनीय कामगिरी केली आणि १२ गुणांसह अंतिम फेरी गाठली. मंगोलियन संघाने १६.५ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

नऊ वर्षांखालील गटात भारताने एएफएम श्रेयन थिप्पार्थी, नोव्हा अय्यर जुगल आणि हृदय गर्गच्या नेतृत्वाखालील संघाद्वारे आणखी एक रौप्य पदक मिळवले. या वर्षीच्या आशियाई शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १६ देशांतील ८०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग होता.

तरुण भारतीय त्रिकुटाने संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय संयम, रणनीतिक प्रतिभा आणि लढाऊ वृत्ती दाखवली व जागतिक दर्जाचे बुद्धिबळ विजेते निर्माण करण्याचा भारताचा अभिमानास्पद वारसा पुढे चालू ठेवला. गेल्या चार दशकांपासून आशियाई आणि जागतिक स्तरावरील वयोगटातील स्पर्धांमध्ये भारताला प्रचंड यश मिळाले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करणे आणि रौप्य पदक मिळवणे हा भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे मुख्य प्रशिक्षक दुर्गा नागेश गुट्टुला म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# उन्नती हुडा उपांत्य फेरीत; लक्ष्यसेन बाहेर

◆ **हायलो, १ नोव्हेंबर**

किशोरवयीन बॅडमिंटनपटू उन्नती हुडाने जर्मनीमध्ये सुरु असलेल्या सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सरळ गेममध्ये विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांनी उपांत्य फेरीत धडक मारली.

१८ वर्षीय उन्नतीने ४७ मिनिटांत संपलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चौथ्या मानांकित चीन तैपेईच्या लिन हसियांग ती हिच्यावर २२-२०, २१-१३ अशी मात केली. महिला एकेरीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत, रक्षिता श्री संतोष रामराजला डेन्मार्कच्या सहाव्या मानांकित लाईन क्रिस्टोफरसेन हिच्याकडून ७-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत, लक्ष्यने पहिला गेम गमावल्यानंतर बरोबरी पुनर्संचयित करण्यासाठी पुनरागमन केले, परंतु अखेर एक तास आणि १४ मिनिटे चाललेल्या सामन्यात त्याला पराभव पत्करावा लागला. ◀(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### प्रत्येक विभागीय अधिकाऱ्यांनी नाले, ड्रेनेजची कामे नियमित करावीत

**महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली विविध नाले परिसराची पाहणी**

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

शहरातील नाल्यांची व्यवस्था कार्यक्षम राहावी. पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबविणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक विभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागातील नाले व ड्रेनेज कामांची नियमित पाहणी करून कामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत करण्याची काळजी घ्यावी, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील गणेश पेठ शॉपिंग सेंटर परिसर नाला, कुंभार वेस येथील रूपा भवानी चौकाजवळील नाला, लेप्रसी कॉलनी कचरा डेपो या ठिकाणी पाहणी केली. त्याप्रसंगी त्यांनी आदेश दिले. यावेळी सहायक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी बक्षी, सहायक अभियंता शकील शेख आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी या तिन्ही ठिकाणी सुरू असलेल्या नाल्यांच्या कामाची आणि कचरा डेपो परिसरातील स्वच्छतेची सविस्तर माहिती घेतली. त्यांनी नाल्यांमध्ये बॉक्स कन्व्हर्ट बसविण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, त्याआधी तांत्रिक तपासणी करून नाल्यांची लेव्हल तपासावी आणि त्यानुसार काम सुरू करण्याचे निर्देश दिले. लेप्रसी कॉलनी कचरा डेपो परिसरातील ड्रेनेज लाईनचे काम व्यवस्थितपणे पूर्ण झाले आहे का, याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्वच्छतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे, तसेच नाल्यांची अडथळामुक्त वाहतूक सुनिश्चित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.



### सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती व साफ सफाई करा

**ओमसाई प्रतिष्ठानच्या वतीने आरोग्य निरीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी**

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

प्रभाग २२ मधील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती व साफ सफाई करण्यात यावी, अशी मागणी ओमसाई प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष शिवराज गायकवाड यांनी महापलिका आरोग्य निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रभाग २२ येथील छोटी व मोठी इराण्णा वस्ती, गरिबी हटाव झोप नं २ व रेवणसिद्धेश्वर झोपडपट्टी परिसर आणि इतर भागातील सार्वजनिक स्वच्छतागृह, लाईट वीज वितरण व्यवस्था तसेच रस्त्यावरील खड्डे यांमुळे वस्तीतील लोकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्वच्छता व्यवस्था बाबत तेथील नागरिकांना शौचालयासाठी सार्वजनिक मैदानाचा व रेल्वेरूळ परिसराचा सहारा घ्यावा लागत असे. त्यामुळे या वातावरणाचा परिणाम सर्वच नागरिकांना होत आहे, त्या परिसरातील लहान मूल व काही वरिष्ट नागरिक यांना आजाराला सामोरे जावं लागत आहे. ड्रेनिज लाईन खराब झाली असून पाऊस झाल्यावर तेथील नागरिकांच्या घरांत पाणी घुसत असल्याने त्यांचे भवितव्य व पुढील वाटचालीस खूप मोठा धोका पत्करावा लागत असल्याने तेथील सामाजिक कार्यकर्ते धनराज संदोळाकर यांना निदर्शनास येताच त्यांनी सर्व विषयांवर गांभीर्याने प्रकाश पाडण्यासाठी ओम साई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शिवराज गायकवाड यांना माहिती दिली. परिसरात व वस्तीमध्ये जावून तेथील नागरिकांची समस्या जाणून घेतली. व ताबडतोब झोन अधिकारी अनिल चराटे यांना घडलेल्या या समस्येवर पूर्णतः लक्ष घालून समस्या व तेथील अडचणी दूर व्हाव्यात.तातडीने याचा पाठपुरावा करावा असे निवेदनात म्हटले आहे. जातीने लक्ष घालून सदर परिसरात व वस्तीत ताबडतोब कारवाई केली जाईल असे विश्वासपात्र विधान अधिकारी अनिल चराटे यांनी दिली. यावेळी शिवराज गायकवाड, धनराज संदोळाकर, विश्वास नागटिळक, श्रीकांत गिड्डे, देवा गायकवाड, महिंद्र गोसावी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### पठाणवस्ती ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**पिलीव, दि. १ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पठाणवस्ती ग्रामपंचायतीच्या वतीने स्वयंप्रेरणा वाचनालयाचे उद्घाटन अकलूजच्या प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर, सरपंच एजाज पठाण, चांदापूरीचे सरपंच जयवंत सुळ, ग्रामविकास अधिकारी विलासराव बाबर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शब्बीर पठाण, मंडल अधिकारी भोसले, ग्राम महसूल अधिकारी अनिल चव्हाण, मुख्याध्यापक ठवरे, शिक्षक आवटी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक महादेव शेटे, पोलीस पाटील अजय हिंगमिरे, माजी संचालक इस्लामखान पठाण, उपसरपंच श्रीमती शितल पवार, सदस्य वनिता शेटे, अशोक सोनवणे, इम्तियाज पठाण तनवीर पठाण, अजिज पठाण पितांबर मगर रामचंद्र शेटे ग्रामपंचायत कर्मचारी संजय मगर राजेंद्र शेटे उपस्थित होते. यावेळी शब्बीर पठाण, दुवाद पठाण, मंडळ अधिकारी भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. आभार सरपंच एजाज पठाण यांनी तर सूत्रसंचालन महादेव शेटे यांनी केले.

# अचकदानी तलावाजवळ पक्षी निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करा

**पक्षी व वन्यजीव प्रेमींकडून मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ नोव्हेंबर-**

अचकदानी (ता.सांगोला) या गावाला तेथील निसर्ग संपन्नता, पक्षी वैभव, तलाव परिसर व तेथील निरव शांतता यामुळे विशिष्ट ओळख प्राप्त आहे. अचकदानी वनविभाग परिक्षेत्रातील वनराईने समृद्ध रोपवाटिका व जलसंधारणातून समृद्ध असा जलाशय विविध स्थलांतरित व स्थानिक



पक्ष्यांना आकर्षित करीत असतो. म्हणून येथे तलावाच्या जवळ पक्षी निरीक्षणासाठी महाराष्ट्र शासन व वन विभागाकडून निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करण्यात यावी अशी मागणी पक्षी व वन्यजीव प्रेमी कडून होत आहे.

सांगोल्यातील पक्षी अभ्यासक प्रा.डॉ. प्रकाश बनसोडे व प्रा.डॉ.विधीन कांबळे हे पक्षी निरीक्षणासाठी अचकदानी येथे गेले असता त्यांना स्वर्गीय नर्तक या पक्षाच्या नर व मादीचे दर्शन झाले. प्रौढ नराचा रंग पांढरा असून डोके व त्याच्यावरील तुरा काळा व चमकणारी निळसर छटा असणारा असतो. प्रौढ नराची लांबी ही २० ते ३० सेंटिमीटर इतकी असते. अप्रौढ नराचा रंग तांबूस-तपकिरी असतो व त्याच रंगाची लांब शेपूट असते. मादी तांबूस तपकिरी असून शेपूट आखूड असते.



डोक्यावरील तुरा लहान असतो. हे पक्षी गर्द झाडीचे ठिकाण, जलाशय, ओढे, तलाव, यांच्याजवळ दिसून येतात. कीटक भक्षी असणाऱ्या या पक्षांचा विणीचा हंगाम पावसाळ्याच्या पूर्वार्धात सुरू होतो. हा पक्षी भारताच्या नैऋत्येकडील प्रदेशात स्थानिक व इतर भागात स्थलांतरित आहे. अचकदाणी परिसरात स्वर्गीय नर्तक आढळल्याने निसर्गप्रेमी, पक्षीप्रेमी वन्यजीव अभ्यासक व छायाचित्रकार यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. म्हणून याठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करण्याची मागणी होत आहे.



स्वर्गीय नर्तक या पक्षाला त्याच्या नराच्या शुभ्र पांढऱ्या रंगामुळे दुधराज असेही संबोधले जाते. हा पक्षी मध्य प्रदेश या राज्याचा राज्यपक्षी आहे. या पक्ष्याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या नराची लांब सडक पांढरी शेपूट. हा पक्षी हवेत उडत असताना या लांब सडक शेपटीच्या हवेत उडणाऱ्या रिबिनी प्रमाणे दिसणाऱ्या विशिष्ट हालचालींमुळे याला स्वर्गीय नर्तक हे नाव प्राप्त झाले आहे. स्वर्गीय नर्तक या पक्षाची सांगोला तालुक्यातील ही प्रथमच नोंद आहे. यापूर्वी इथे स्थलांतरित लाल सरी बदकेची शेकडोच्या संख्येने थव्याची नोंद २०२३ मध्ये केली आहे. या स्थलांतरित पक्ष्याच्या आढळण्यामुळे अचकदानीच्या पक्षी वैभवात भर पडली आहे. **- प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे, पक्षी अभ्यासक, सांगोला**



पक्ष्यांना निसर्गातील हवामान बदलाचे जन्मजात ज्ञान असते. सध्या चक्रीवादळामुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन होणाऱ्या हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या स्थलांतरावरही परिणाम होत असल्याचे जाणवत आहे. स्वर्गीय नर्तक या पक्ष्याला आययूसीएन रेड लिस्टमध्ये सर्वात कमी चिंताजनक म्हणून सूचीबद्ध केले आहे. अधिवासाचा नाश, विखंडन आणि ऱ्हास, तसेच हवामान बदल हे प्रमुख घटक या पक्षांच्या अस्तित्वासाठी संभाव्य धोके आहेत. **- प्रा.डॉ.विधीन कांबळे, पक्षी अभ्यासक, सांगोला**

### शहरातील रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१ नोव्हेंबर-**

शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्त्यावर अतिवृष्टी व इतर कारणामुळे झालेल्या खड्ड्यामुळे शहरवासीयांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवा. अन्यथा कामगार सेना तीव्र आंदोलन करणार असा इशारा वजा निवेदन सोलापूर महानगरपालिका आयुक्तांना महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने देण्यात आले. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात विठ्ठल कुराडकर, प्रसाद जगताप, गुरुनाथ कोळी, पप्पू शेख, अरुण सीडगिद्दी, रेखा अडकी, राधिका मीठ्ठा, स्वाती शिंदे, सविता दासरी, लक्ष्मी रच्चा, अंबव्वा मालपुरी, रामबाई माटेटी, लक्ष्मी गुंटला, पद्मा मॅकल यांचा समावेश होता.

## दयानंद बिडवे भारतीय जनता पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते : आ. कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१ नोव्हेंबर-**

भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ता दयानंद बिडवे हे शांत, संयमी व मितभाषी अजात शत्रू असलेले भारतीय जनता पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते आहेत. गेल्या ३५ वर्षापासून भाजपात काम करत असले तरी त्यांनी पक्षाच्या हितासाठीच काम केलेले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कधी काम केलेले नाही हे वाखाणण्याजोगे असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस दयानंद बिडवे यांच्या वाढदिवसा निमित्त सुभाष गल्ली येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मनिप्र बसवलिंग महास्वामी, अक्कलकोट भाजपा शहराध्यक्ष शिवशरण




जोजन, महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, मिलन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे, गुरुमाऊली मल्लम्मा पसारे, संतोष पराणे, अल्पसंख्याकचे नन्नू कोरबु, रजाक सय्यद उपस्थित होते.

याप्रसंगी कांतु धनशेट्टी, नागराज कुंभार, राजकुमार थांब, श्रीकांत झिपरे, सुनील गोरे, अनिल लोकापुरे, प्रशांत लोकापुरे, शुभम बिडवे, शरण बिडवे, सचिन गडसिंग, शिवकुमार चनशेट्टी, अंकुश केत, अनिल वेदपाठक, अविनाश पोतदार, गुरुनाथ पोतदार, नितीन पोतदार, संतोष घिवारे, समर्थ पराणे उपस्थित होते.

### प्रमोद महाराज जगताप यांना वारकरी पुरस्कार जाहीर


**पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर-**



चैतन्यसद्गुरू तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा वारकरी पुरस्कार प्रमोद महाराज जगताप यांना जाहीर झाला आहे. येत्या ३ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. वारकरी पंथाचे थोर सत्पुरुष चैतन्यसद्गुरू तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी वारकरी पंथाची सेवा करणाऱ्या सेवानिष्ठ विभूतीला वारकरी पुरस्कार प्रदान केला जातो.

या पुरस्काराचे वितरण श्रीक्षेत्र पंढरीत सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र, श्रद्धानिधी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्रीगुरु विठ्ठल महाराज वासकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्रीगुरु चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या हस्ते सोमवारी (दि.३ नोव्हेंबर) दुपारी दोन वाजता वासकर वाडा संतपेठ पंढरपूर येथे पुरस्कार वितरण होणार आहे.

## बार्शीच्या न्यू हायस्कूलमध्ये २० वर्षांनंतर भरली शाळा; माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला ११ हजारांची ग्रंथसंपदा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ ऑक्टोबर-**

शाळेच्या भिंतीवर वाचलेला सुविचार 'ग्रंथ हेच गुरु' प्रत्यक्षात उतरवण्याचे काम बार्शीतील न्यू हायस्कूल प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी केलं.

आपल्या शाळेसाठी ११ हजार रुपयांची पुस्तके, ग्रंथसंपदा भेट स्वरुपात देत विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साह आणि आठवणींच्या हिंदोळ्यात संपन्न झाला. तीच खोली, तेच मैदान, तोच बेंच, तेच मित्र आणि माझी शाळा... असा हा मित्रांचा स्नेहमेळावा तब्बल २० वर्षानंतर जुळून आला.

जुने दिवस, जुने मित्र आणि शाळेच्या गोड आठवणी', या सगळ्यांना उजाळा देण्यासाठी न्यू हायस्कूल, बार्शी येथे दहावी (२००५-०६) बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. तब्बल २० वर्षांनंतर माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र आले आणि आपल्या शाळेच्या अंगणात भेटून आनंदोत्सव साजरा केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते रावसाहेब मनगिरे. तसेच शाळेचे निवृत्त शिक्षक आणि विद्यमान शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी फेटा, पुष्पगुच्छ व छोटेसे रोप देऊन शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या स्नेहसंमेलनाला ८५ माजी विद्यार्थी उपस्थित होते.



## वारकऱ्यांची तहान भागवत आहेत 'स्वेरी'चे विद्यार्थी

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर-**

दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिकी वारीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या भेटीसाठी आतूर झालेल्या आणि दर्शन रांगेत तासन तास उभ्या असलेल्या वारकऱ्यांची तहान स्वेरीचे विद्यार्थी शुद्ध पाणी देवून भागवीत आहेत.

स्वेरीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंगचे विद्यार्थी, विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग हे पाणी वाटप करत आहेत. स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या हस्ते रिद्धी सिद्धी मंदिराजवळ या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच संस्थेतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी पाणी वाटप करत आहेत. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्रा. महुवा बिस्वास या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत. परंपरेप्रमाणे दर्शन रांगेतील वारकऱ्यांना आर.ओ. फिल्टर्ड पिण्याचे पाणी वाटपाचे कार्य नवमीपासून सुरु झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिद्धी सिद्धी गणपती मंदिरालगत असणाऱ्या पत्राशेड मधील दर्शन मंडप रांगेतील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याच्या कार्याला आज दशमीच्या दिवशी अधिक गती आली आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत गोपाळपूर, रिध्दी-सिध्दी मंदिर व दर्शन बारी, पत्रा शेड या ठिकाणी प्राध्यापक व विद्यार्थी वारकऱ्यांना प्रचंड उत्साहाने आर.ओ.फिल्टर्ड पाण्याचे वाटप करत आहेत. नवमी, दशमी व एकादशी या तीनही दिवशी विद्यार्थी ग्लास, वॉटर जग आणि वॉटर टँकद्वारे पाणी वारकऱ्यांपर्यंत पोहचवून वारकऱ्यांची तहान भागवणार आहेत. स्वेरीकडून दररोज आठ ते दहा हजार लिटर पाण्याचे वाटप केले जात आहे. प्रत्येक दिवशी ४ प्राध्यापक व २५ विद्यार्थी दिवसभर मोफत शुद्ध पाणी वाटप करत आहेत.

# सहकार शिरोमणी कारखाना सभासद व कामगारांचे हिताचाच विचार करणार

**चेअरमन कल्याणराव काळे; सहकार शिरोमणी कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर-**

सहकार शिरोमणी साखर कारखाना चालु नये, तो बंद पाडण्यासाठी विरोधकांनी अपप्रचार, बदनामी, असे अनेक अडथळे आणले. शासकीय कार्यालयात तक्रारी दाखल केल्या. त्यामुळे कारखान्यास वेळेत निधी उपलब्ध झाला नाही. मात्र विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता सर्व सभासदांचे, कामगारांचे व या संस्थेवर उपजिविक करणाऱ्या कुटुंबियांचे हित डोळ्यासमोर ठेवून आर्थिक अडचणीतून मार्ग काढत ही संस्था मार्गक्रमण करीत असल्याचे कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी सांगितले.

तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह. साखर कारखान्याची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (ता.३१) चेअरमन कल्याणराव काळे यांचे अध्यक्षतेखाली कारखाना कार्यस्थळावर खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत मार्गदर्शन करताना काळे बोलत होते. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन भारत कोळेकर उपस्थित होते.



**चेअरमन काळे यांनी केले १२ मुद्यांचे निरसन**

यावेळी उपस्थित सभासदांनी उपस्थित केलेल्या १२ मुद्याचे पुराव्यासह निरसन चेअरमन कल्याणराव काळे यांनी करुन उपलब्ध निधीचा ऊस बिल, तोडणी वाहतुक बिल, कामगार पगार इ. साठी केल्याचे सांगतले.

**एकमताने सर्व ठराव मंजूर**

वार्षिक सभेतील विषय पत्रिकेतील सर्व विषयांस उपस्थित सभासदांकडून हात उंचावून एकमताने मंजूरी देण्यात आली. यावेळी सभासदांचे सुचनेनुसार ऐनवेळी आलेल्या विषयावरही सर्व सभासदांनी आवाजी एकमताने मंजुरी दिली. विषयाचे वाचन प्र.कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी केले. कारखान्याचे संचालक युवराज दगडे यांनी श्रध्दांजली ठराव मांडला.

**संस्थेस आर्थिक नुकसान पोहचविणाऱ्यांचे सभासदत्व रद्द**

ऐनवेळी कारखान्याचे सभासद रणजीत जाधव यांच्यासह इतर सभासदांनी संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या, संस्थेस आर्थिक नुकसान पोहचविणाऱ्या सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याची मागणी केली. त्यास उपस्थित सर्व सभासदांनी आवाजी एकमताने मंजुरी दिली.

**नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात कारखाना होणार सुरु**

सन २०२५-२६ गळीत हंगामामध्ये सुमारे सहा लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट असून, नोव्हेंबरचे दुसऱ्या आठवड्यात कारखाना सुरु करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून, ऊस उत्पादक शेतकरी यांनी आपला संपुर्ण ऊस सहकार शिरोमणी कारखान्यास गळीतास देण्याचे आवाहन चेअरमन काळे यांनी केले.

## महत्वाचे...





### सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या वतीने रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

केंद्र सरकारच्यावतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणुन साजरा केला जातो. केंद्रीय गृह मंत्रालयाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० जयंती निमित्त सर्व पोलीस ठाणेच्या स्तरावर रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्यावतीने अकोलेकाटी येथे ५ कि. मी. चे रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. 'रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा करीता सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम व इतर अधिकारी व अंमलदार असे एकूण २० कर्मचारी, अकोलेकाटी येथील पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणा मधील विद्यार्थी व विद्यार्थीनी व आसपासच्या २०० लोकांनी सहभाग नोंदविला. सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी उज्वल भविष्या करीता मार्गदर्शन केले. पोलिस निरीक्षक देशपांडे यांनी रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा मध्ये स्वत: सहभाग नोंदवुन ५ कि.मी. चे अंतर धावुन पुर्ण केले. स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थी मधुन प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक निवडुन त्यांना पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे व सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम यांच्या हस्ते बक्षीस परितोषक वितरण करण्यात आले आहे. तसेच सहभाग नोंदविलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पदक देण्यात आले आहे.

### बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीला तर दहावीची २० फेब्रुवारीला

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**



राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या फेब्रुवारी मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केली आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी पासून, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. दोन्ही परीक्षा १९ मार्च रोजी संपतील. प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारीपासून सुरू होतील. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केलेल्या वेळापत्रक माहितीसाठी आहे, परीक्षेपूर्वी शाळा महाविद्यालयांकडे दिले जाणारे छापील वेळापत्रकच अंतिम असेल, अन्य समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर विश्वास ठेवू नये, असे राज्य शिक्षण मंडळांने कळविले आहे.

# भगवान श्रीदेवी भुदेवीसमेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सव उत्साहात

## सर्वत्र घुमला गोविंदा गोविंदा... वेंकटरमना गोविंदाचा जयघोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ नोव्हेंबर**

सोलापूर शहरातील पूर्व भागात असणाऱ्या श्री वेंकटेश्वर देवस्थान मध्ये गेल्या दोन दिवसांपासून श्री वेंकटेश्वर भगवान यांचा ब्रह्मोत्सव हा धार्मिक कार्यक्रम सुरू असून, शनिवारी सकाळी ब्रह्म मुहूर्तावर ५ .३० वाजता मुळमुर्ती अभिषेक , सकाळी ९.३० ते १२.०० होमहवन, पूर्णाहुती, हनुमान वाहन सेवा, अर्पण करण्यात आली. यावेळी मंदिरात गोविंदा हरी गोविंदा श्री व्यंकट रमणा गोविंदा... हा जयघोष दुमदुमला.

श्रीदेवी भुदेवी समेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सवास सायंकाळी साडेसहा वाजता मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. तत्पूर्वी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास श्री वेंकटेश्वर स्वामी रथोत्सव मिरवणुकीची तयारी सुरू करण्यात आली. तिर्थप्रसाद गोष्टी व सायं. ४, वाजता श्री श्रीदेवी भुदेवी समेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सवम मंदिरापासून मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साही आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.



सोलापूर : पूर्व भागातील दाजी पेठेतील व्यंकटेश्वर देवस्थान मंदिरात रथोत्सव काढण्यात आला.

दरम्यान, भगवंताची रथोत्सव मिरवणूक जोडबसवण्णा चौक, राजेंद्र चौक, कन्ना चौक, औद्योगिक बँक, मार्कंडेय चौक, भद्रावती पेठ, दत्त चौक, पद्मशाली चौक या मिरवणूक मार्गावरून पुन्हा मंदिराकडे संपन्न झाली. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास महाआरती व प्रसाद वाटप कार्यक्रम संपन्न झाल्याची माहिती मंदिर समितीने दिली. यावेळी दक्षिणात्य मंगल वाद्यांच्या तालावर धार्मिक विधी आणि कार्यक्रम संपन्न होत असून भाविकांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून आले. मिरवणूक मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची गर्दी होती. श्रींच्या दर्शनासाठी प्रत्येक भाविक आसुसलेला होता. श्रींना पुष्प अर्पण करून अनेक भाविकांनी यथोचित दर्शन घेतले.

**श्री व्यंकटेश्वर देवस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील ब्रह्मोत्सव तिरुमाला तिरुपती मंदिर समितीच्या दक्षिणात्य परंपरेनुसार सुरू आहे. हा धार्मिक उत्सव संपन्न करण्यासाठी दाक्षिणात्य पुजारी तसेच ब्रह्मरुंद सोलापुरात दाखल झाले आहेत. श्रींचा कल्याणोत्सव आणि रथोत्सव हा धार्मिक विधी दक्षिणात्य धार्मिक परंपरेनुसार संपन्न झाले. यावेळी सोलापूर शहरातील असंख्य भाविक रथोत्सव मिरवणुकीसाठी तसेच श्रींच्या दर्शनासाठी आवर्जून उपस्थित असल्याचे दिसून आले. तर आज ८१ कळशाभिषेक, संध्याकाळी गरुड वाहन पालखी सेवा संपन्न होणार आहे.**

# मानवी लैंगिक तस्करीवर प्रतिबंध करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

मानवी लैंगिक तस्करी वर प्रतिबंध करणे हे प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असल्याचे मत प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व अर्ज फौंडेशन गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी लैंगिक तस्करी प्रतिबंध, काळजी व लढा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी शर्मा बोलत होते.



यांप्रसंगी व्यासपीठावर दिवाणी न्यायाधीश ओ. एस. पाटील, एस. एस. शिंदे, एम. बी. कुडते, श्रीमती. ए. एस. बिराजदार आदी न्यायाधीश व अर्ज फौंडेशन चे फॉउंडर अरुण पांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचा उद्देश समाजात संवेदनशिलता निर्माण करुन प्रत्येक नागरिकाने तस्करीविरुध्द आवाज उठवणे' हा सामाजिक संकल्प घ्यावा, असा होता. यावेळी सर्वांनी सुरक्षित समाज सन्मानाचे जीवन हा संदेश देत लैंगिक तस्करीविरोधी लढ्यात सक्रिय राहण्याची प्रतिज्ञा केली. या कार्यशाळेत सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, विधी सेवेचे पॅनल विधीज्ञ, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, महिला व बाल विकास विभाग, बाल न्यायमंडळ, सखी वन स्टॉप सेंटर आदीं सहभागी झाले होते. कार्यशाळेत अरुण पांडे यांनी भारतातील वाढती लैंगिक तस्करी, तिची कारणं, कायदेशीर तरतूदी (पोस्को, आयटीपीए) तसेच बळी पडलेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. रुपेश पाठक लैंगिक तस्करी बाधित महिलांची मानसिकतेविषयी व सामाजिक भूमिकानविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ॲड. शिवकैलास झुरळे यांनी केले तर आभार डॉ. रुपेश पाठक यांनी मांडले.



# जामीन हा अधिकार नसून विवेकाधीन न्यायिक निर्णय

## ॲड. मिलिंद थोबडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

जामीन हा अधिकार नसून विवेकाधीन न्यायिक निर्णय आहे आणि त्यात वकिलांची मांडणी अत्यंत निर्णायक ठरते, असे मत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांनी व्यक्त केले.

सोलापूर बार असोसिएशनतर्फे सुरू असलेल्या विधी व्याख्यानमालेच्या ज्ञानसमृद्ध प्रवासाचा पाचवा टप्पा बार असोसिएशन हॉल येथे पार पडला. यावेळी ॲड. थोबडे हे बोलत होते.

ॲड. थोबडे यांनी लॉ रिलेटींग टू बेल या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय दंड प्रक्रिया संहिता, संविधानातील व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व आणि न्यायालयीन निर्णयांच्या माध्यमातून जामिनासंदर्भातील न्यायशास्त्राचा विस्तृत आढावा घेतला. असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. सहसचिवा ॲड. मीरा प्रसाद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्यांचे आभार मानले. यावेळी उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, खजिनदार ॲड. अरविंद देडे उपस्थित होते.

## आदिला नदीवर पूल उभारण्याचे काम युद्ध पातळीवर



सोलापूर : पुणे महामार्गावर आदिला नदीवर पूल उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शनिवारी टिपलेले छायाचित्र.

# सोलापूर जिल्ह्यात बनावट खतावर कारवाई

## टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; कृषी विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

मे. रेवणसिद्ध ॲग्रो एजन्सी, मोडनिंबचे चालक रेवण तनपुरे यांच्या गोडाऊनमध्ये बनावट इफको, पी.पी.एल कंपनीच्या बॅगमधील १०:२६:२६ व १८:४६:०० (DP) रासायनिक बनावट खताचा साठा आढळून आला.



या खताचा पुरवठादार रामलिंग माळी, रा. बैरागवाडी व उत्पादक दीपक सस्ते, राहणार ढवळेवाडी, तालुका फलटण यांचे विरुद्ध राष्ट्रीयकृत इफको व पीपीएल सारख्या खत उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या नावे विनापरवाना खते उत्पादन व विक्री करणे, साठवणुकी बाबतचा परवाना न घेणे, शासनाची व शेतकऱ्यांची दिशाभूल व फसवणूक केल्यामुळे खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील विहित तरतुदींचे उल्लंघन केले आहे. माढाचे तालुका कृषी अधिकारी शरद गावडे यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलाअसून पुढील तपास टेंभुर्णी पोलीस करत आहेत.

कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी हरीदास हावळे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बाळू बागल, मोहीम अधिकारी अजय वगरे , जिल्हा कृषी अधिकारी सागर बारावकर, शरद गावडे, प्रविण झांबरे, विलास मिस्किन, बार्शी, ईफको कंपनीचे प्रतिनिधी रवींद्र मोरे यांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली.

# पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष अरुण कंडरेसह नऊ जणांवर वाळू चोरीचा गुन्हा

## महसूल विभागाची कारवाई; १२ ब्रास वाळूसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**



पंढरपूर शहरातील भीमा नदीपात्रातून स्वतःच्या आर्थिक फायदा करिता ५६ हजार रुपयांचा अवैध वाळूसाठा करून ठेवल्या प्रकरणी पंढरपुरातील माजी उपनगराध्यक्ष अरुण कंडरे, माजी नगराध्यक्ष सुभाष दादा भोसले यांच्यासह भोसले व कंडरे कुटुंबा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई बुधवारी सायंकाळी साडेचार ते आठच्या सुमारास करण्यात आली आहे. यामध्ये अरुण कंडरे यांचे बंधू प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अजित कंडरे यांचा देखील समावेश आहे. नगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना हा दणका मानला जातोय. महसूल प्रशासनाच्या या कारवाईने वाळू चोरी करणाऱ्यांमध्ये खळबळ माजली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर शहरातील भीमा नदी पात्रालगत असलेल्या २२७/१, ११३/४ या सर्व्हे नंबरच्या जमिनीमध्ये हेमंत वसंतराव भोसले, माजी नगराध्यक्ष सुभाष वसंतराव भोसले, मुकुंद वसंतराव भोसले, दीपक वसंतराव भोसले, श्रीनिवास मोहन यलमार (कंडरे), जालिंदर मोहन यलमार (कंडरे), दिलीप प्रल्हाद यलमार (कंडरे), माजी उपनगराध्यक्ष अरुण प्रल्हाद यलमार (कंडरे), प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अजित प्रल्हाद यलमार (कंडरे) (रा. सर्व पंढरपूर) यांनी शासनाच्या संमतीचे विनापरवाना वाळू साठा करून ठेवला होता. या कारवाईत ३२ हजार रुपये त्यात एकूण ८ ब्रास वाळू, २४ हजार रुपये त्यात एकूण ४ ब्रास वाळू असे ५६ हजार रुपयांचा वाळू साठा जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाटी अमर पाटील, सहाय्यक तलाटी महेश कुमार मारुती सावंत, गणेश पिसे यांच्यासह महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध सरकारतर्फे महसूल अधिकारी महेश कुमार मारुती सावंत यांनी बी एन एस कलम ३०५ (इ), ३ (५), सह गाऊन खालीच कायदा कलम ४(१), ४ (क) (१), २१ पर्यावरण रक्षण अधि.का. १९८६ चे कलम १५ प्रमाणे कायदेशीर तक्रार दिली आहेत. पुढील तपास पोलिस हवालदार पवार करत आहेत.

# अमरावती येथे अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

यंदाच्या वर्षी ३८ वे महाराष्ट्र राज्य तथा तिसरे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या यजमानपदाखाली सुरू झाले. अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात १ आणि २ नोव्हेंबर दरम्यान होत असून या संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यास संमेलनाध्यक्ष म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी तथा मित्रा या राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण परदेशी हे ऑनलाइन पध्दतीने जोडले गेले होते. तर उद्घाटक म्हणून प्रधान वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी, मुख्य अतिथी म्हणून अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी संमेलनाध्यक्ष अनिल माळी, महाराष्ट्र पक्षी मित्रचे अध्यक्ष जयंत वडतकर, संमेलन आयोजन समितीचे अध्यक्ष तथा कार्यवाह महाराष्ट्र पक्षीमित्र डॉ. गजानन वाघ, स्वागताध्यक्ष डॉ अंजली देशमुख, सहसचिव डॉ. मंजुषा वाठ, उपाध्यक्ष श्रीकांत वऱ्हेकर आदी उपस्थित होते. या संमेलनासाठी संपूर्ण राज्यातून व राज्याबाहेरून किमान ३०० प्रतिनिधी या संमेलनासाठी उपस्थित होते.




संमेलनाध्यक्ष यांनी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. श्रीनिवास रेड्डी यांनी भविष्यात देखील अशा प्रकारच्या चळवळीस त्यांच्या वतीने भरघोस मदत करण्याचे त्यांनी जाहीर केले. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी याप्रसंगी भविष्यात होऊ घातलेल्या पक्षी मित्र निवडणुकीचे संभाव्य उमेदवार यांची यादी जाहीर केली व अमरावतीकरांना या पक्षांना मतदान करून एका आगळ्यावेगळ्या निवडणुकीसाठी आव्हान केले. माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी आपल्या भाषणात कुठल्यातरी एका कारणासाठी स्वतःचे आयुष्य झोकुन देणाऱ्या अशा पद्धतीच्या पक्षी मित्रांचे कौतुक केले. वेक्स या संस्थेस २५ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्ताने रानवेध या मासिकाचे विमोचन, सोबत अन्य पुस्तकांचे देखील विमोचनदेखील याप्रसंगी करण्यात आले. यावर्षीचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार संभाजीनगर येथील डॉ. दिलीप दिवाकर यार्दी यांना प्रदान करण्यात आला. इतर पुरस्कारांपैकी पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार अकोला येथील बाळ उर्फ जयदीप काळने यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार वाशिम येथील मिलिंद सावदेकर यांना, पक्षी संशोधन पुरस्कार वरुड (जि. अमरावती) येथील प्रतिक चौधरी यांना तर यावर्षीपासून नव्याने सुरुवात झालेला पहिला नवोदित पक्षिमित्र पुरस्कार साकोली (जि. भंडारा) येथील विकास बावनकुळे या नवोदित पक्षिमित्रास प्रदान करण्यात आला आहे. पक्ष्यांवर सातत्याने लिखाण करणाऱ्यास दिला जाणारा पक्षी विषयक साहित्य पुरस्काराची घोषणा सुद्धा यावेळी करण्यात आली. यावर्षीचा पक्षी साहित्य पुरस्कार सांगली येथील जेष्ठ पक्षी व पक्ष्यांच्या आवाजाचे तज्ञ शरद आपटे यांना तसेच भाईदर (जि. ठाणे) येथील डॉ. पराग नलावडे या दोन लेखकांना देण्यात आला. नवोदित शालेय विद्यार्थ्यांस दिला जाणारा स्व. विनोद गाडगीळ नवोदित पक्षिमित्र पुरस्कार पुण्याच्या सात वर्षिय अर्पित चौधरी यांस प्रदान करण्यात आला. संमेलनाच्या आधी छायाचित्र प्रदर्शन व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धांच्या विजयी उमेदवारांना देखील या प्रसंगी सन्मानित करण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आगामी निवडणूका काँग्रेस पक्ष ताकतीने लढणार : पाटील

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ नोव्हेंबर -**



आगामी जिल्हा परीषद,सर्व पंचायत समीती निवडणूक काँग्रेस पक्ष संपुर्ण ताकतीने लढणार असल्याचे मत काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. धिरज पाटील यांनी व्यक्त केले.

काँग्रेस पक्षाची तुळजापुर येथे जिल्हा परीषद, पंचायत समीती निवडणूकाबाबत आढावा बैठक पार पडली.याप्रसंगी जिल्ह्यातील सर्व काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

या बैठकीसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष विश्वास शिंदे, प्रदेश सचिव डॉ. अस्मिता शहापूरकर, तालुकाध्यक्ष रामचंद्र आलुरे, दिलीप भोकरे, राजाभाऊ शेरखाने, काटे गुरुजी, तात्यासाहेब शिंदे, मोहन कचरे, शहबाज काझी,उमेश निंबाळकर, अमोल कुतवळ, धनंजय राऊत, बालाजी आप्पा नरवडे, बालाजी बंडगर, प्रकाश चव्हाण, सयाजी देशमुख, रणजीत इंगळे, आनंद जगताप, संजय गुंजुटे आदी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आ. प्रवीण दरेकर यांचा श्री तुळजाभवानी देवी दर्शन

**तुळजापूर, दि.१ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र विधान परिषदेचे गटनेते तथा महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयंसमूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) आ. प्रवीण दरेकर यांनी दि.३१ ऑक्टोबर रोजी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवी मंदिरात उपस्थित राहून देवीचे दर्शन घेतले. पुजारी ऋषिकेश साळुंके यांच्या हस्ते त्यांनी साडी-चोळीची ओटी भरून महापूजा केली आणि देवीचे आशिर्वाद घेतले. यावेळी मंदिर संस्थानतर्फे तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी आ. दरेकर यांचा सत्कार केला. त्यानंतर शहरातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोधले, नारायण नन्नवरे, धैर्यशील दरेकर, आनंद कंदले, शुभम क्षीरसागर, संदीप गंगणे, राजेश्वर कदम, सागर गंगणे, अर्जुन अमृतराव, लक्ष्मण उळेकर आणि शेखर छत्रे यांनी त्यांचा सत्कार केला.

### बाबुराव पवार यांचे निधन

**तुळजापूर, दि.१ नोव्हेंबर -**



तालुक्यातील धारूर येथील जेष्ठ नागरिक बाबुराव भगवान पवार (वय ९२) यांचे शनिवार, दि.१ नोव्हेंबर रोजी पहाटे तुळजापूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी आपसिंगा रोडवरील मोतीझरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे. शहरातील जेष्ठ व्यावसायिक आबासाहेब पवार यांचे ते आजोबा होत.

### लक्ष्मण रोडगे यांचे निधन

**लोहारा, दि.१ नोव्हेंबर -**



लोहारा शहरातील जेष्ठ नागरिक लक्ष्मण नामदेव रोडगे (वय ९०) यांचे अल्पशा आजाराने शनिवार, दि.१ नोव्हेंबर रोजी सकाळी सुमारास ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ६ वाजता कास्ती रोड स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. विशाल रोडगे यांचे ते आजोबा होत.

### उमरगा शहरात घरफोडी

**उमरगा, दि.१ नोव्हेंबर -**

तुरोरी येथील भद्रया महाद्या स्वामी यांच्या घरातील कपाटातील डब्यात ठेवलेल्या दोन सोन्याच्या अंगठ्या (किंमत ४७ हजार रुपये) अज्ञात चोरट्याने ३० ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजता चोरून नेल्या. या प्रकरणी स्वामी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# तुळजापूर तालुक्यात खळबळ : केशेगावात कुऱ्हाडीने युवकाचा खून

**सिद्धाराम दहिटणे यांच्या मानेवर घाव घालून हत्या... ▶▶ आरोपी निखिल कांबळे पोलीसांच्या ताब्यात ...**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे आज शनिवार, दि.१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास भरचावडी चौकात सिद्धाराम पंडित दहीटणे (वय ३५) या युवकाचा निखिल सोमनाथ कांबळे (वय २५) या तरुणाने कुऱ्हाडीने वार करून खून केल्याची धक्कादायक घटना घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारास सिद्धाराम दहीटणे हे गावातील चावडी चौकाजवळील हॉटेलच्या बाजूला खुर्चीवर बसून मोबाईल पाहत होते.

त्याचवेळी आरोपी निखिल कांबळे हा मोटारसायकलवर आला आणि हातातील कुऱ्हाड घेऊन मागून येत सिद्धाराम यांच्या मानेवर सपासप ७ ते ८ वार केले. यात गंभीर जखमी झालेल्या सिद्धाराम यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर आरोपी कांबळे मोटारसायकलवरून पळून गेला. माहिती मिळताच नळदुर्ग पोलिस स्टेशनचे अधिकारी आणि इटकळ आऊटपोस्टचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व आरोपीस तात्काळ ताब्यात घेत अटक करण्यात आली आहे.

या थरारक हल्ल्याचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला असून दृश्यं अत्यंत भीषण असल्याचे समोर आले आहे. मागील वादातूनच ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला असून पुढील तपास सुरू आहे.

या भरदिवसा झालेल्या खुनामुळे केशेगाव व परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## मा.आ. राहुल मोटे यांनी घेतली भाजप नेते ठाकूर यांची भेट

**भेटीने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१ नोव्हेंबर -**



धाराशिव जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चाहूल लागल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. विविध पक्षांमध्ये मोर्चेबांधणी, रणनीती आखणी आणि पक्षांतराचे संकेत दिसू लागले असतानाच परंडा विधानसभेचे माजी आमदार राहुल मोटे यांनी भाजप नेते व विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या परंडा येथील निवासस्थानी भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अलिकडेच शरद पवार गट सोडून अजित पवार गटात प्रवेश केलेले राहुल मोटे यांनी महायुतीत सामील झाल्यानंतर प्रथमच भाजप नेते ठाकूर यांची भेट घेतली असल्याचे राजकीय सूत्रांनी सांगितले. या भेटीनंतर परंडा विधानसभेत दोस्तीत कुस्ती की नव्या समीकरणांची सुरुवात? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे की, जर अजित पवार गट आणि भाजप यांनी एकत्र येऊन निवडणूक लढवली, तर शिंदे गटासाठी आव्हानात्मक स्थिती निर्माण होऊ शकते.

दरम्यान, आमदार तानाजी सावंत देखील लवकरच ठाकूर यांची भेट घेणार असल्याची चर्चा आहे. ठाकूर हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू नेते मानले जातात, तर सावंत हे राज्याचे उच्च व तांत्रिक शिक्षणमंत्री म्हणून कार्यरत आहेत.

परंडा मतदारसंघातील काही कार्यकर्त्यांमध्ये तानाजी सावंत यांनी निवडणुकीनंतर मतदारसंघाकडे दुर्लक्ष केल्याच्या चर्चाही सुरू आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नवी राजकीय समीकरणे तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जरी ही भेट सदिच्छा भेट असल्याचे सांगितले जात असले, तरी तिच्यामागे राजकीय संकेत दडले असल्याचे सूत्रांचे मत आहे. त्यामुळे आता ठाकूर-मोटे-सावंत हे तिघेही एका व्यासपीठावर येणार का? या चर्चेला परंडा व धाराशिव राजकारणात वेग आला आहे.

## सीमा गवळी यांची महाराष्ट्र राज्य सेवेतून वर्ग १ अधिकारीपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ नोव्हेंबर -**

पंचायत समिती तुळजापूर येथे कार्यरत असणाऱ्या सहायक गटविकास अधिकारी सीमा गवळी यांची महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षा २०२४ मधून राजपत्रित अधिकारी (वर्ग १) पदासाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील आणि सध्या अहिल्यानगर येथे सासर असलेल्या सीमा गवळी या फेब्रुवारी २०२५ पासून तुळजापूर पंचायत समितीत परीविक्षाधीन कालावधीत सहायक गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून एक सक्षम, तत्पर आणि जनतेच्या सेवेसाठी समर्पित महिला अधिकारी म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

सत्कार प्रसंगी सामान्य प्रशासन अधिकारी ऋषिकेश पिंपळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सुखदेव पांडागळे, उमादेवी मगर, कल्पना शिंदे, वैशाली पाटील, कौशल्या सरडे, रुपाली बोपलकर, राधा दराडे आदी उपस्थित होते.

## भैरवनाथ शुगर वर्क्स लि. सोनारीच्या १८ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ नोव्हेंबर -**



परंडा तालुक्यातील भैरवनाथ शुगर वर्क्स लि., सोनारी या साखर कारखान्याचा १८ वा गळीत हंगामाचा मोळीपूजन कार्यक्रम शुक्रवारी चेअरमन अनिल सावंत आणि व्हाईस चेअरमन विक्रम सावंत यांच्या हस्ते, तसेच ऊस उत्पादक शेतकरी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या प्रसंगी बोलताना चेअरमन अनिल सावंत यांनी सांगितले की, आमदार तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली भैरवनाथ शुगर नेहमीच शेतकरीहिताला प्राधान्य देत आली आहे. याही वर्षी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास टिकवून ठेवत गाळपास येणाऱ्या ऊसाला जास्तीचा दर जाहीर करण्यात येईल.

सावंत यांनी पुढे सांगितले की, कारखान्याकडे तोडणी व वाहतूक यंत्रणा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून, संपूर्ण कारखाना गळपासाठी सज्ज झाला आहे. त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन केले की, उत्तम प्रतीचा, परिपक्व ऊस वेळेवर गाळपास पाठवून कारखान्याला सहकार्य करावे.

कार्यक्रमास बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर, जयदेव बप्पा गोफणे, बालाजी गुंजाळ, सतिश दैन, गजेंद्र सुर्यवंशी, रणजीत खरसडे, मांजरे महाराज, शिवाजी सुर्यवंशी, राहुल पाटील, कर्णे बप्पा लांडगे, सुधीर देशमुख, संतोष भुजे, प्रकाश गाढवे, कल्याण शिंदे, सचिन सोनारीकर, धोंडिराम फले, औदुंबर गाडे, रेवडे, तसेच कारखान्याचे जनरल मॅनेजर प्रल्हाद ठोंबरे, डिस्टिलरी मॅनेजर अजित भोसले, चिफ केमिस्ट दादासाहेब बोरकर, चिफ इंजिनिअर रविकांत सिंग, कोजन मॅनेजर उदयशंकर गडगे, चिफ अकौंटंट गोविंद कुलकर्णी, शेती अधिकारी भगवान काळे, बापूसाहेब देशमुख, सोमनाथ सुर्यवंशी, महादेव मुळीक, जेजेराम सुर्यवंशी, पोफळे, लांडगे, हेड टाइम किपर सुरेश साळुंके, आबा अनवणे, भैरू गरदाडे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूक ठेकेदार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## धाराशिवत मद्यधुंद अवस्थेत गोंधळ; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ नोव्हेंबर -**

धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मद्यधुंद अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्या अभिजीतसिंह बुबासाहेब बागल (वय ४७, रा. शिक्षक कॉलनी, धाराशिव) यांच्याविरुद्ध पोलिसांनी मदाका कलम ८५ महा.पो.का. अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ३१ ऑक्टोबर रोजी रात्री १२.१० वा. घडली. बागल याच्या गुन्हा नोंदवला असून धाराशिव शहर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## येरमाळा : दोन तलवारी आणि कोयत्यासह युवक ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**येरमाठळा, दि.१ नोव्हेंबर -**

खबऱ्याकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे येरमाळा पोलिसांनी जलद कारवाई करत एका संशयित युवकाकडून दोन धारदार तलवारी आणि एक कोयता जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, येरमाळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक तात्याराव भालेराव, सहाय्यक फौजदार चंद्रहंस मुंढे, कर्मचारी चौगुले, कदम, जाधव आणि चालक शेख हे नियमित गस्त घालत असताना खबऱ्याकडून एका युवकाकडे शस्त्रे असल्याची माहिती मिळाली.



त्यावर पोलिसांनी बळीराजा कृषी सेवा केंद्राजवळील रस्त्यावर तत्काळ धाव घेतली. संशयित युवकाला थांबवून चौकशी केली असता तो गोंधळला. पोलिसांनी त्याच्याकडील पोते तपासले असता त्यात दोन धारदार तलवारी आणि एक कोयता आढळून आला. पोलिसांनी तत्काळ यश माने (वय २० वर्षे) या युवकाला ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध शस्त्रबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक तात्याराव भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल रवी कांबळे करत आहेत.

## नंदगाव गटाच्या विकासासाठी शिंदे गट कटिबद्ध : सोमनाथ गुड्डे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ नोव्हेंबर -**

नंदगाव जिल्हा परिषद गटातील नागरिकांनी आमच्या पाठीशी उभे राहिले, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या भागात मोठ्या प्रमाणात विकास कामे करून गटाचा कायापालट करणार, असे शिवसेना (शिंदे गट) नेते सोमनाथ गुड्डे यांनी सांगितले.

ते सिंदगाव (ता. तुळजापूर) येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शिवसेना शाखेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमास शिवसेना शिंदे गटाचे तुळजापूर तालुका प्रमुख अमोल जाधव, उपशहरप्रमुख रमेश चिवचिवे, शहर संघटक प्रशांत मस्के, शहाजी हाक्के, संजय लोंढे, भुजंग मुकेरकर, जुबेर शेख, विभाग प्रमुख अंकुश रुपनुर आदी मान्यवर उपस्थित होते.

सोमनाथ गुड्डे पुढे म्हणाले की, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत नंदगाव गटातील नागरिकांनी शिवसेना शिंदे गटाच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावात विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी तालुका प्रमुख अमोल जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, या भागातील नागरिकांचे कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही; प्रत्येकाचे काम मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नव्या शाखेच्या पदाधिकाऱ्यांची निवड पुढीलप्रमाणे करण्यात आली. अध्यक्ष अतुल पांढरे, उपाध्यक्ष सलीम शेख, कार्याध्यक्ष महेश चव्हाण, सचिव लक्ष्मण पाटील, सहसचिव शिवानंद जाधव, सदस्य मुक्तार शेख, राजेंद्र इटकर, नुरुद्दीन इनामदार, बाबुशा इटकर आणि अमर गायकवाड यांची निवड करण्यात आली.

या शाखा उद्घाटन कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामार्गावरील दरोडेखोर टोळीचा पर्दाफाश; दोन आरोपी ताब्यात

**▶▶ धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने आणखी एक मोठी कामगिरी बजावत महामार्गावरील दरोडेखोर टोळीचा पर्दाफाश करण्यात यश मिळवले आहे. राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्री जॅक टाकून प्रवाशांच्या गाड्या बंद पाडून दरोडा टाकणाऱ्या या अंतरजिल्हा टोळीला अखेर पोलिसांनी गजाआड केले आहे.

मागील काही दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यातील महामार्गावर प्रवाशांना लुटण्याच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी उमरगा-सोलापूर महामार्गावर एका डॉक्टरांच्या कुटुंबावर दरोडा टाकण्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणी डॉ. अब्दुल गफूर अब्दुल रऊफ जनैदी यांनी मुरूम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

या गंभीर घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी स्वतःच्या मार्गदर्शनाखाली जलद गतीने करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद ईज्जपवार यांना दिले.

ईज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी तांत्रिक माहितीचा वापर करून तसेच पारंपरिक तपास पद्धतीचा अवलंब करत आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान पोलिसांनी अर्जुन बालाजी शिंदे व आशोक हिरामन शिंदे या दोन आरोपींना ताब्यात घेतले.

चौकशीत दोघांनी आणखी चार साथीदारांसह मुरूम परिसरातील दरोड्याची कबुली दिली. तसेच त्यांनी जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव परिसरातही ट्रक लूट केल्याची माहिती दिली.

या गुन्ह्यात वापरलेली दणत५०० गाडी, जॅक, तसेच जळगावातील दरोड्यात वापरलेला ट्रक पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद ईज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस अंमलदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, महिला पोलीस अंमलदार शोभा बांगर, फरहान पठाण, राठोड, तसेच चालक अंमलदार सुभाष चौरे, प्रकाश बोईनवाड, रत्नदीप डोंगरे, नागनाथ गुरव यांच्या संयुक्त प्रयत्नांतून यशस्वीरीत्या पार पडली.




या संपूर्ण मोहिमेत QRT आणि RCP पथकांनीही महत्वपूर्ण भूमिका बजावली. या धाडसी कारवाईमुळे महामार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांचा धाराशिव पोलिसांवरील विश्वास अधिकच दृढ झाला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मंगळसूत्र चोरी आणि खिसा कापणारे दोन चोरटे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

शहर व जिल्ह्यात वाढत्या चोरी-घरफोड्या रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने सुरू केलेल्या मोहिमेत दोन आरोपींना अटक करण्यात आली. दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये एकूण ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बीड स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स.पोलीस निरीक्षक धनराज जारवाल यांच्या पथकाने पाटोदा पोलीस ठाण्यातील गुन्हा नोंद क्र. ३५१/२०२५, कलम ३०३(२) बी.एन.एस. मधील आरोपीचा शोध घेत असताना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार गणेश कचरू पवार रा. आयोध्यानगर, बीड हा आरोपी असल्याची खात्री पटल्यावर पथकाने ३१ ऑक्टोबर रोजी चहाटा फाटा परिसरात त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीचे सोन्याचे मनीमंगळसुत्र किमती ६० हजार रुपये जप्त करण्यात आले. या आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून पुढील तपास पाटोदा पोलीस करीत आहेत.



दरम्यान शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हा नोंद क्र. ५१९/२०२५, कलम ३०३(२) बी.एन.एस. अंतर्गत संशयिताचा शोध घेत असताना स.पोलीस निरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या पथकाने महेश किसन गायकवाड रा. गांधीनगर, बीड यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३५ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला पुढील तपासासाठी शिवाजीनगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले.या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स.पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पो.उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, राहुल शिंदे, अंकुश वरपे, अर्जुन यादव, अश्फाक सय्यद, मनोज परजणे आणि सिद्धेश्वर मांजरे यांनी सहभाग नोंदविला.

## आगवान कुटूंबातील तिसरा प्राचार्य रविंद्र वसंतराव आगवान यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**



पारनेरकर महाराज विद्यालयाच्या प्राचार्यपदी निवड झाली. विष्णु रसाळ हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागी श्री.रविंद्र वसंतराव आगवान यांची नियुक्ती झाली.

या पूर्वी आगवान कुटूंबातील राजेंद्र संतुकराव आगवान हे निरगुडी ता.पाटोदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च विद्यालयात १९६८ ते २००१ पर्यंत प्राचार्य होते. तसेच सौ.मंगला संतुकराव आगवान या बीड शहरातील राष्ट्रीय कन्या माध्यमिक विद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून २५ वर्ष काम केले. मांजरसुंबा येथील आगवान कुटूंबातील एकाच घरातील तिघांनी प्राचार्य म्हणून काम केले. श्री.रविंद्र वसंतराव आगवान यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा

## सर्व पेन्शनर्स यांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर पर्यंत हयात नामे सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील सर्व पेंन्शनर धारकांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ पूर्वी हयात नामे आपल्या संबंधित विभागाकडे सादर करावे असे आवाहन पेन्शनर्स अॅण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे.

प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, जिल्हा परिषद कडून पेन्शन मिळणारे पेन्शनर्स यांनी त्या-त्या पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी कार्यालयाकडे आणि कोषागार कार्यालयाकडून पेन्शन प्राप्त होणार्या पेन्शनर्सनी संबंधित बँकेच्या (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र) शाखेत आपले हयात नामे सादर करावेत. हयात नाम्या सोबत आधार कार्ड, बँक आकॉऊंट झेरॉक्स आणि पीपीओ क्रमांक जोडावा असे आवाहन पेन्शनर्स अॅण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे.

## तुलसी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी संस्था प्रतिनिधी डॉ.प्रियांका रोडे, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे, तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात सरदार पटेल यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या एकीच्या संदेशाचा वारसा जपण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

## बीडमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथेचे भव्य आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

संत ज्ञानेश्वर महाराज यांची साडेसातशेवी जन्म जयंती सध्या संपूर्ण विश्वभर उत्साहात साजरी होत आहे. गेल्या बारा महिन्यांपासून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर विविध कार्यक्रमांचे आयोजन देशभर करण्यात येत असून, शासन स्तरावरही हा उत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जात आहे.



या पार्श्वभूमीवर, बीड शहरात गेल्या पंचवीस वर्षांपासून संत विचार पेरण्याचे कार्य करणारे स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने 'संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा' या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**साडेसातशेवी जन्म जयंतीनिमित्त साध्वी अनुराधा दीदींच्या संगीतमय कथेतून जीवनप्रेरणा**

## बीड जिल्ह्यात पुरग्रस्तांसाठी औरंगाबाद धर्मप्रांताकडून अन्नधान्य किटचे वाटप

### जनतेकडून धर्मप्रांताच्या संवेदनशीलतेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

अतिवृष्टीमुळे गंभीरपणे प्रभावित झालेल्या बीड जिल्ह्यातील पुरग्रस्त कुटुंबांना औरंगाबाद धर्मप्रांताने दिलासा देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या कठीण परिस्थितीत औरंगाबाद धर्मप्रांताचे अधिपती बिशप बर्नार्ड लान्सी यांच्या नेतृत्वाखाली १६५ पुरग्रस्त कुटुंबांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले.





गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान, जनावरे, घरे आणि उपजीविकेचे साधन हरपले आहेत. अशा परिस्थितीत धर्मप्रांताने दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता याबद्दल गावकऱ्यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

धर्मप्रांताच्या प्रतिनिधीं सेंट रपपी सोशल सेंटर येथे जाऊन पुरग्रस्तांना थेट किट वाटप केले. या किटमध्ये तांदूळ, डाळ, तेल, साखर, आटा आणि इतर आवश्यक वस्तू समाविष्ट होत्या.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, या आपत्तीच्या काळात औरंगाबाद धर्मप्रांताने दाखवलेली माणुसकी आणि तात्काळ मदत आमच्यासाठी मोठा आधार ठरली आहे.या उपक्रमातून औरंगाबाद धर्मप्रांताने पुन्हा एकदा समाजासाठी असलेली त्यांची बांधिलकी आणि सेवा वृत्ती सिद्ध केली आहे. बीड जिल्ह्यातील प्रशासन आणि नागरिकांनी या कार्याचे मनःपूर्वक अभिनंदन आणि कौतुक केले.धर्मप्रांताने दिलेला हा आधार आम्हाला पुन्हा उभं राहण्याचं बळ देतो, असे एका लाभार्थी कुटुंबाने भावनिक शब्दांत सांगितले.

## अंबाजोगाईत रिंग रोडवर अपघात : कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

अंबाजोगाई शहरातील रिंगरोडवरील मानवलोक कार्यालयाजवळ शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या चंद्रकांत मुरलीधर गंगणे (वय ५२, रा. राडी, ता. अंबाजोगाई) यांचा मृत्यू झाला. ते अंबाजोगाई येथील त्यांच्या घराकडे जात असताना हा अपघात झाला.



मानवलोक कार्यालयाजवळ कारने दिलेल्या जोरदार धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ त्यांना 'स्वाराती' रुग्णालयात दाखल केले. मात्र, तिथे डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. चंद्रकांत गंगणे हे रांजणी येथील साखर कारखान्यात चीफ केमिस्ट म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अकाली मृत्यूची खबर येताच राडी गावावर शोककळा पसरली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा झेंडा फडकविणार-खा.बजरंग सोनवणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

पक्षासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या प्रामाणिक, निष्ठावान अशा सर्व कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत उमेदवारी व त्यांना ताकद देऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणाने आम्ही उभे राहू. तसेच आगामी निवडणुकीत बीड जिल्हा परिषद, सर्व पंचायत समिती आणि नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चा झेंडा फडकविणार असल्याचा विश्वास बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी व्यक्त केला. ते अंबाजोगाईत पक्षाच्या निवडणूक पूर्व आढावा बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयात खासदार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, तर यावेळी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, माजी आमदार प्रा.संगिताताई ठोंबरे, राजेसाहेब देशमुख आणि डॉ.नरेंद्र काळे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, संजय भोसले, तारेख अली उस्मानी, ऍड.शहाजान पठाण, अंकुश ढोबळे, ऍड.इस्माईल गवळी, दीपक शिंदे, केशव ढगे, भास्कर आगळे, देविदास देवकते, तानबा लांडगे, आश्रूबा करडे, पप्पू माके, ज्ञानोबा कांबळे, रविंद्र मोरे, गणेश घाडगे, चंद्रकलाताई देशमुख, बन्सी जोगदंड, व्यंकटेश चामनर, कल्याण भिसे, मुनीर कुरेशी, सोमनाथ धोत्रे, सुधाकर देशमुख, प्रशांत पवार, अशोक मोदी, कार्याध्यक्ष टेकाळे, सुरैय्याभाभी चौधरी, पप्पू काकडे, दिलीप धुमाळ, धनराज माने, सुधाकर जोगदंड, अशोक जाधव, अन्वर कुरेशी, राजेभाऊ देवकते या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रास्ताविक करताना तालुकाध्यक्ष अमर देशमुख म्हणाले की, आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये तरूणांना ५० टक्के संधी देण्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी आणि रणनीती ठरविण्यासाठी आज पक्षातर्फे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

## दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे राज्यात प्रतिवर्षीप्रमाणे चालू वर्षीही २७ ऑक्टोबर २०२५ ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधी दक्षता जनजागृती सप्ताह २०२५(Vigilance -wareness WeeK) भ्रष्टाचाराला नाही म्हणा राष्ट्रसाठी वचन बध्द व्हा! हा आयोजित करून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे २७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी वाजता सोपान चिटमपल्ले यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता जनजागृती सप्ताह २०२५चे उद्घाटन हे शपथ ग्रहण कार्यक्रम संपन्न झाला असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## परळीच्या भूमिपुत्राचा प्रशासनात बहुमान: कोकण म्हाडाच्या मुख्य अधिकारी पदी डॉ. विशाल राठोड यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१ नोव्हेंबर**

प्रशासकीय क्षेत्रामध्ये परळीच्या भूमिपुत्राने विविध मुख्य पदांवर कर्तव्य बजावण्याचा बहुमान मिळवला असून परळीचे डॉ. विशाल राठोड यांची आता तीन वर्षासाठी कोकण विभागाच्या म्हाडाचे मुख्य अधिकारी म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीड़ प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. विशाल राठोड यांच्यावर कोकण विभागाच्या गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाची मुख्य जबाबदारी घेण्यात आली आहे. परळीसाठी ही बहुमानाची बाब असून या नियुक्ती बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



डॉ. विशाल राठोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रकल्प संचालक यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मुख्य अधिकारी, कोकण गृहनिमर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या पदावर ३ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे.परळीचे भूमिपुत्र असलेल्या डॉ. विशाल राठोड यांनी प्रशासनात विविध पदांवर चांगले काम केले आहे. आपल्या उल्लेखनीय कार्याचा ठसा त्यांनी प्रशासनात उमटवलेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय कामाबद्दल त्यांना विविध पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी /प्रकल्प संचालक म्हणून त्यांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने आता त्यांना तीन वर्षासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणा अंतर्गत कोकण म्हाडाचे मुख्य अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## जन शिक्षण संस्थान बीड येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ नोव्हेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित व कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा वित्तपोषित जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री , लोहपुरुष उपाधीने संबोधले जाणारे, देशाची एकता व अखंडता अबाधित राहण्यासाठी विशेष कार्य केलेले सरदार वल्लभ भाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीडचे प्रा श्री कृष्णा बारटक्के, चंपावती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा श्री संजय चौंडे व सर्व कार्यकर्ते व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी सरदार वल्लभाई पटेल यांना अभिवादन केले.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाणी उपलब्धतेसाठी जलतारा जनचळवळ : जिल्हाधिकारी कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ नोव्हेंबर-**



सतत बदलणारे हवामान, अनियमित पावसाचे चक्र आणि बदललेली भौगोलिक परिस्थिती यामुळे शेतीला गंभीर फटका बसत असताना नांदेड जिल्हा प्रशासनाने पाणी संवर्धनाचा भक्कम निर्धार केला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शेतासाठी पाणी उपलब्ध व्हावे, पावसाचे पाणी शेतातच मुरावे यासाठी जलतारा जनचळवळ राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या बैठक व कार्यशाळेत सर्व अधिकाऱ्यांना दिली.

याबाबत नियोजन भवन येथे ३१ ऑक्टोबर रोजी कार्यशाळाही संपन्न झाली. या कार्यशाळेत उपजिल्हाधिकारी (रोहयो) महेश वडदकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी जलताराचे फायदे, निधी व तांत्रिक तपशील याचे सादरीकरण केले. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मनरेगा अधिकारी-अभियंते उपस्थित होते.

**पावसाचे पाणी शेतात -जलतारा म्हणजे काय ?**

शेतातील उताराच्या स्थळी ५ फूट लांबी, ५ फुट रंदी, ६ फुट खोलीचा खड्डा करून, त्यात दगडांनी भर घालून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची ही सोपी, वैज्ञानिक पद्धत आहे. यामुळे पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरते, भूजल पातळी वाढते, शिवारातील विहिरी-बोअरवेलना पाणी मिळते, पिकांच्या वाढीस मदत होते, शेताची जागा वाया जात नाही. एक जलतारा पावसाळ्यात सुमारे ३.६० लाख लीटर पाणी जमिनीत मुरवतो.

**मोठा संकल्प १ लाख जलतारे**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत व कृषी विभागाच्या समन्वयातून एक लाख जलतारे तयार करण्यात येणार असून हे काम मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यातून साधारण ३६०० कोटी लीटर पाणी संरक्षित होणार आहे.

मनरेगा मार्फत आर्थिक सहाय्य

जलतारा तयार करण्यासाठी मनरेगा योजनेतून अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रति एकर ६ हजार रुपयापर्यंत लाभ मिळणार आहे. यामुळे पाणी उपलब्धतेबरोबरच ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसही चालना मिळेल. ग्रामीण भागात रोजगार व मनरेगाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या अभियानाबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांनी तालुकास्तरावर कार्यशाळा घेऊन तातडीने कामे मंजूर करून मार्चअखेर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

# किनवट पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यांची नोंद

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १ नोव्हेंबर-**

किनवट पोलीस ठाण्यात मागील काही दिवसांत तीन वेगवेगळ्या घटनांवरून गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

आत्महत्येची घटना (आ.म्र. नं. ३९/२०२५ कलम १९४ इछडड) मांडवा (ता. किनवट) येथे दि. २३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास व्यंकट नारायण बोल्लेवार (वय ४७) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेची खबर त्यांचे चुलत भाऊ प्रभाकर रामलु बोल्लेवार (वय ३४) यांनी दिली. या प्रकरणी नोंद करून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल मुंडे यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

मारहाण व धमकीप्रकरणी गुन्हा (गुरन क्र. २९८/२०२५ कलम ११८(१), २९६, ३५१(२), ११५(२), ३(५) इछड) फिर्यादी सरिता रवी चव्हाण (वय ३०, रा. सिंदगी (ची), ता. किनवट) यांनी आपल्या पती व सासऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. दि. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारास सिंदगी येथे दोघांनी मिळून फिर्यादीस शिवीगाळ, मारहाण करून गंभीर दुखापत केली तसेच पुन्हा आमच्या घरी आलीस तर जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सिद्धार्थ वाघमारे यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

धार्मिक भावना भडकविणारा व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी गुन्हा (गुरन क्र. २९९/२०२५ कलम ३५३, २९९ इछड) रविकांत किशन कंतूलवार (वय ३६, रा. बोधडी बु.) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेख सोहेल (रा. एकता नगर, गोकुंदा) याने mr sohel king ४२० या इंस्टाग्राम आयडीवर गोमातेचा व गोमासाचा आक्षेपार्ह व्हिडिओ स्टेटस म्हणून प्रसारित केला. या कृत्यामुळे हिंदू बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या व समाजात द्वेष निर्माण झाला. या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास पोलीस उप निरीक्षक फडेवार यांच्या कडे दिला आहे. सर्व गुन्ह्यांचा तपास पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## जांब गटातून जयपाल गायकवाड यांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जांब** -जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जांब गटात जयपाल गायकवाड यांचे नाव जोरदार चर्चेत आले आहे. गायकवाड यांनी अलीकडेच हिप्परगा, दापका राजा आणि लादगा येथे घेतलेल्या संवाद दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे स्वागत करत काँग्रेसला पाठिंबा दर्शविला. जांब गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून, या वेळी स्थानिक उमेदवाराचा मुद्दा ठळक झाला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी स्थानिक पातळीवरून उमेदवारीसाठी नावे मागवली होती, त्यात उच्चशिक्षित आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत जयपाल गायकवाड यांचे नाव पुढे आले आहे. गायकवाड यांच्या संपर्क दौऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत असून, स्थानिक युवा चेहरा आणि प्रामाणिक प्रतिमा या बळावर काँग्रेसला जांब गटात गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप व इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे गायकवाड यांच्या प्रचाराला जांब गटात सुरुवातीपासूनच वेग आला आहे.

# नांदेड भाजपा ओबीसी मोर्चाचा जिल्हा उपाध्यक्षपदी गणेश काकडे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १ नोव्हेंबर-**

भाजपा नांदेड ओबीसी मोर्चाचा जिल्हा उपाध्यक्षपदी सक्रीय,सामाजिक कार्यकर्ते गणेश काकडे यांची अमर राजूरकर यांच्या उपस्पथित एका नियुक्ती पत्राव्दारे करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर प्रभाग क्रमांक १९ जुना कौठा येथील भाजपाचे सक्रीय तथा सामाजिक कार्यकर्ते गणेश धोंडीबाराव काकडे यांच्यी नियुक्ती माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण , खासदार अजित गोपछेडे व संघटक मंत्री संजय कौडगे,भाजपा महानगर जिल्हा अध्यक्ष अमर राजूरकर यांच्या आदेशानुसार



गणेश काकडे नियुक्ती करण्यात आली यावेळी महानगर अध्यक्ष अमर राजुरकर, शितल खांडील, माजी नगरसेविका ललिता शिंदे उपस्थिती होती.सदरील नियुक्ती बदल सामाजिक, राजकीय, मित्र मंडळी यांच्या कडुन अभिनंदन होत आहे.

# गजानन सुर्यवंशी यांच्या कार्यालयास भाजपा पदाधिकाऱ्यांची भेट

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पक्षाचे शहर मंडळ अध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या कार्यालयात महामंत्री संजय भाऊ कोडगे , दक्षिण जिल्हा अध्यक्ष संतुकराव हांबर्डे यांनी पक्ष कार्यालयात भेट दिली असता त्यांचा यथोचित सत्कार करुन अगामी नगर परिषद निवडणूकीची रननिती कशी असावी विरोधकाला हाद्दपार कशा झाला पाहिजे अशी आखणी करावी येणाऱ्या काळात नगर परिषदेमध्ये भाजप पक्षाच्या ताब्यात असली पाहिजे अशी राजकारणातील टिप्स दिल्या आहे.



लोहा तालुक्यात भाजप पक्षाची व्याप्ती मोठी आहे सर्वात मोठा पक्ष आहे . शहरासह तालुक्यात पक्षाचे मतदार व जनतेत ध्येय धोरणा विषय जनतेत जन जागरण करुन मतदार आपल्याकडे वळला पाहिजे. भारतीय जनता पक्षाचे पक्ष निरीक्षक एकनाथ दादा पवार यांनी मतदारसंघ झंझावात दौरे करुन गाव वाडी तांडे पिंजुन काढत आहे यांच्या जनतेतील जन संपर्काचा हामखास फायदा होईल. नगर परिषद निवडणूक अगदी जवळ आली आहे आगामी काळात सत्ता आपलीच राहिली पाहिजे यासाठी रननीती कशी असावी विरोधकांची कोंडी कशी करावी अशा अनेक राजकीय टिप्स दिल्या यावेळी संजयभाऊ कोडगे,संतुकराव हंबर्ड,लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी, तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष शरद पाटील पवार, दिनेश भाऊ मोटे, माजी नगरसेवक संदिप दमकोंडावार, युवराज वाघमारे संजय चव्हाण, यशपाल निर्मले, लक्की फुलवरे, शाहरुख शेख,पिंनू चुडावकर, वैभव हाक्के, बाळासाहेब कतुरे आदी उपस्लित होते.

# अबकी बार स्थानिक उमेदवार, हर एक मतदार की पुकार !

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. १ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे कोणत्याही क्षणी निवडणूक आयोग आचारसंहिता लावण्याची शक्यता आहे १३ आक्टोंबर रोजी जिल्हा परिषद पंचायत समीती सदस्यांसाठी आरक्षणाची सोडत झाली आहे हाणेगाव जिल्हा परिषद गट सर्वसाधारण पुरुष सुटल्याने स्थानिक व बाहेरील इच्छुक उमेदवारांच्या भेटीगाठी वाढल्याचे दिसते आहे पण हाणेगाव गटात स्थानिक उमेदवारालाच प्रथम पसंती मिळण्याचे संकेत आहे पक्ष कोणताही असो स्थानिक उमेदवाराचा प्रथम विचार करायला हवा असे मतदार व कार्यकर्त्यांत चर्चा आहे. बाहेरील उमेदवार एकदा निवडुन गेला की पाच वर्ष भेटत नाही मग आमचे समस्या आमचे म्हणणे कोणास सांगावे अशी चर्चा मतदारांत ऐकावयास मिळते आहे.




कोणताही पक्ष स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोडुन पैशाच्या जोरावर बाहेरच्या उमेदवाराला पसंती दिल्यास स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अण्याय होईल याचा देखील पक्षाने विचार करायला हवा,असे मतदारांत चर्चा आहे सध्यातरी भाजप कडुन स्थानिक प्रबळ उमेदवार म्हणून भाजपाचे तालुका अध्यक्ष प्रितम बाळासाहेब देशमुख यांचा नाव पुढे येत आहे तर काँग्रेस पक्षाकडुन स्थानिक उमेदवारात शिवाजी शिंदे पाटील यांचे नाव पुढे येत आहे व उबाठा गटाकडुन स्थानिक उमेदवार तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे यांच नाव पुढे येत आहे आणि वेगवेगळ्या पक्षाकडुन पंचायत समीती हाणेगाव ओपन महीला व वझर पंचायत समीती ओबीसी पुरूष उमेदवारासाठी स्थानिक उमेदवाराचे शोध चालु असल्याचे मतदार व सुशिक्षीत नागरीकांत चर्चा आहे एकंदरीत पाहता जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी पक्ष कोणताही असो पण स्थानिक उमेदवारावरच विजयाचे गुलाल उधळेल असे स्थानिक मतदारांत चर्चा ऐकावयास मिळते आहे.

## इच्छुक उमेदवार अंकुश भालेराव यांच्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण!

**किनवट** -गोकुंदा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले अंकुश भालेराव यांनी आपल्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण केला आहे. गणातील विविध गावांना भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या गावांमध्ये झाला दौरा: पहिल्या टप्प्यात अंकुश भालेराव



यांनी गणातील महत्त्वाची गावे असलेल्या गोकुंदा, कोठारी, शनिवारपेठ, प्रधानसांगवी, बेंदी, बेदी तांडा, आणि आमडी या गावांना भेटी दिल्या. उद्देश आणि प्रतिसाद: या दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या, मूलभूत गरजा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. या भागातील नागरिकांनी श्री. अंकुश भालेराव यांचे उत्साहाने स्वागत केले आणि त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. पुढील टप्प्याची तयारी: पहिल्या टप्प्याला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर, आता अंकुश भालेराव लवकरच दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करणार असल्याचे त्यांच्या कडून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगण्यात आले. उर्वरित गावांमध्ये भेट देऊन ते आपला जनसंपर्क वाढवणार आहेत. अंकुश भालेराव यांच्या या सक्रिय जनसंपर्क अभियानामुळे गोकुंदा पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

लवाद प्राधिकरण
लवाद अधिकारी श्री. प्रतिक पी. कोठारी
(मल्टी-स्टेट को.ऑप.सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिट्रेशन ॲंड कन्सिलिएशन ॲक्ट १९९६ अन्वये)

**जाहीर नोटीस** दि.: २७/१०/२०२५

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक),अहमदनगर
पो.बॉक्स नं.-७, बँक रोड, अहमदनगर - अर्जदार
विरुध्द - खालील सामनेवाले

| लवाद अर्ज क्र. व सामनेवाला यांचे नाव | दावा रक्कम |
|---|---|
| लवाद अर्ज क्र.१३/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>सचिन जगन्नाथ शहाणे, रा.न्यू बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | रू.<br>५,७४,५१६ |
| लवाद अर्ज क्र.१८/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>गंगाधर नाथराव मुंढे, रा. प्लॉट नं. ४३, ज्योतीनगर / दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रू.<br>१४,६४,८९६ |
| लवाद अर्ज क्र.१७/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>मंगेश नाथराव मुंढे, रा.दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रू.<br>११,७०,४६१ |
| लवाद अर्ज क्र.१५/२०२५ - सा.वाला क्र. ०१<br>विजय सांडू साबळे, रा.मारुती मंदिरासमोर, एनबीजी १०, बालाजीनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर | रू.<br>०५,१९,४७९ |
| लवाद अर्ज क्र.१४/२०२५ व १६/२०२५<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा.७४, जुनेगाव पाचोड बु ll, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | १०,४१,२६९<br>व<br>५,७०,१४२ |
| लवाद अर्ज क्र. १३, १८, १७, १५ / २०२५<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा.७४, जुनेगाव पाचोड बु ll, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | वरील<br>०१ ते ०४<br>प्रमाणे |

ज्यापेक्षा अर्जदार यांनी तुमचे विरुध्द रक्कम वसुलीसाठी लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा तुम्ही स्वतः अथवा तुमचे माहितगार वकीला मार्फत दिनांक ०७/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता श्री. प्रतिक पी. कोठारी, लवाद अधिकारी, आर्बिट्रल ट्रिब्यूनल, अहमदनगर
लवाद प्राधिकरण : ३ रा मजला, वैकुंठभाई मेहता प्रशिक्षण सभागृह, नगर अर्बन को ऑप बँक लि, बॅक रोड, पानसरे गल्ली, अहमदनगर यांचे समोर हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, गैरहजर राहिल्यास आपणास काही सांगावयाचे नाही,असे समजुन लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम करणेत येईल, याची नोंद घ्यावी. आज रोजी आमचे सही शिक्यानिशी दिले असे.

शिक्का
श्री. प्रतीक पी. कोठारी
लवाद अधिकारी, अहमदनगर
ARL

# देशाच्या सुरक्षेसाठी योगदान देत राहिले पाहिजे : ख्वाजा सज्जनुद्दीन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ नोव्हेंबर-**



सीटीसी सीआरपीएफ मुदखेडच्या परिसरात दि.३१ ऑक्टोबर रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री, स्वातंत्र्यसेनानी आणि देशवासीयांचे लाडके, ज्यांना भारताचे बिस्मार्क ही पदवी देऊन गौरवण्यात आले आणि देशाला एकजूट करणारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती सीआरपीएफने मोठ्या उत्साहात साजरी केली.

विविध कार्यक्रमांच्या आयोजनाच्या मालिकेत, सकाळी सर्वप्रथम सीटीसी मुदखेडचे सैनिक आणि अधिकाऱ्यांनी रन फॉर युनिटी या धावण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते, जे मुदखेड शहरातून गेले आणि सीटीसी सीआरपीएफच्या परेड ग्राउंडवर संपले. नंतर, केंद्रीय विद्यालयाचे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी देखील या शर्यतीत सहभागी झाले. यावेळी पोलीस महानिरीक्षक प्राचार्य ख्वाजा सज्जनुद्दीन यांनी उपस्थित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकतेसाठी संवेदनशील राहण्याची आणि त्याप्रती नेहमीच वचनबद्धता दाखवण्याची जबाबदारी दिली.

आपल्या भाषणात, पोलिस महानिरीक्षक सज्जनुद्दीन यांनी या दिवसाचे महत्त्व आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशासाठी केलेल्या अनुकरणीय कार्याबद्दल आणि कामगिरीबद्दल सांगितले. ते म्हणाले की, विविध अडचणी असूनही, आपण सर्वांनी एकतेचे समर्थक असले पाहिजे आणि देशाच्या सुरक्षेसाठी आणि सुरक्षिततेसाठी आपले अपवादात्मक योगदान देत राहिले पाहिजे. हीच सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी श्रद्धांजली असेल.

या प्रसंगी संस्थेचे मुख्य प्रशिक्षण अधिकारी आणि कमांडंट वेद प्रकाश त्रिपाठी, मोहम्मद शाहनेवाज उपकमांडंट, हरिशंकर प्रसाद सहाय्यक कमांडंट, उत्तम साखरे सहाय्यक कमांडंट (मंत्री), इतर अधीनस्थ अधिकारी, सैनिक, प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# कला सन्मान पुरस्काराने चित्रकार वर्मा सन्मानित; माहूरच्या कला संस्कृती क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १ नोव्हेंबर-**

स्व.हरिभाऊजी नागतुरे ग्राम विकास बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक संस्था वणी व आर्टिस्ट स्पेस नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र,शिल्प स्पर्धा व प्रदर्शनात माहूर येथील अंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार रण्जीत दत्त वर्मा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. किरणताई संजय देरकर (अध्यक्षा, एकवीरा महिला बँक, मारेगाव) यांच्या हस्ते कला सन्मान या पुरस्काराने सन्मानित. आजपर्यंत विविध पुरस्कारांनी सन्मानित अस्सल कलेचे धनी, एक प्रतिभावंत गुणी कलाकार चित्रकार रणजित वर्मा यांचा माहूरच्या कला संस्कृती क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून,सर्वस्तरातून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

स्व.हरिभाऊजी नागतुरे ग्राम विकास बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक संस्था वणी व आर्टिस्ट स्पेस नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र,शिल्प स्पर्धा व प्रदर्शन दि.२८ ते ३० ऑक्टोबर २०२५ या दरम्यान लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ येथे भरविण्यात आले होते. प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी आयोजित कार्यक्रमात माहूर येथील शिक्षक चित्रकार रणजीत दत्त वर्मा यांच्या जलरंगातून साकारलेल्या निसर्ग चित्रणास वणी येथील रसिकांनी भरभरून दाद दिली.वर्मा यांचे हे प्रात्यक्षिक वणी येथे दिलेले पहिले प्रात्यक्षिक होते,जे विशेष उल्लेखनिय असे ठरले.प्रात्यक्षिक सादर करताना वर्मा यांनी प्रश्नोत्तरातून विद्यार्थी व रसिकांशी संवाद साधत रसिकांवर आपल्या कलेची अक्षरशाः भुरळ घातली.

बक्षिस वितरण सोहळ्याच्या समारोपीय कार्यक्रमात चित्रकार रण्जीत दत्त वर्मा यांना कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. किरणताई संजय देरकर (अध्यक्षा, एकवीरा महिला बँक, मारेगाव) यांच्या हस्ते कला सन्मान या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे बक्षिस वितरणामध्ये शिल्प



विभागासाठी चित्रकार रणजित वर्मा यांचे वडील दिवंगत पत्रकार तथा चित्रकार दत्त वर्मा यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रथम पारितोषिक देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजक प्रकाश नागतुरे अध्यक्ष तथा माजी गटशिक्षणाधिकारी तथा प्रदिप नागतूरे सचिव, प्राचार्य बा. ना. कला महाविद्यालय पुसद यांच्या संकल्पनेतून स्व हरिभाऊजी नागतुरे यांच्या स्मरणार्थ राज्य स्तरीय चित्र , शिल्प प्रदर्शनाच्या आयोजनाने वणी येथील रसिकांना मिळालेली मेजवाणी खरोखरच अविस्मरणीय अशी ठरली असल्याचे मनोगत सौ. किरणताई संजय देरकर यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले. वर्मा यांच्या या दुहेरी यशाबद्दल अशोक सोनटक्के, महादेवराव,

गजानन कासावार, हरिदास वनस्कर, विजय गंधेवार,गजानन गोडे, म .प्रा. शिक्षण परिषदेचे तालुकाध्यक्ष शेषराव पाटील,विक्रांत हटकर,महेश अण्णापुरे,गणेश कुरुडे,सारंग नागठाणे,प्रा.गजानन बोबडे, प्रा.चंद्रशेखर कुमावत, आकाश खोब्रागडे,

गणेश नैताम,स्वाती नैताम,अरविंद जाधव यांसह अनेकांनी अभिनंदन करत कला क्षेत्रातील पुढील कार्यास शुभेच्या दिल्या.

# पथदिव्यांचा प्रकाश गायब; अंधारात हरवली देगलूरकरांची पहाट!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १ नोव्हेंबर-**

देगलूर शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते सरकार ढाबा या मार्गावरील दुभाजकावर बसविण्यात आलेले पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून अंधारातच आहेत. दररोज सकाळी नागरिक देगलूर महाविद्यालय व होट्टल रोडकडे व्यायामासाठी जात असतात मात्र त्यांची पहाट अंधारातच सुरुवात होते. यामुळे देगलूरकारांकडून नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



शहराला प्रकाशित करण्यासाठी राष्ट्रमाता जिजाऊ चौक ते सरकार ढाबा दरम्यान मुख्य रस्त्यावर तब्बल २२ पथदिवे उभे करण्यात आले आहेत. यापैकी दोन खांब जमीनदोस्त झाले तर बाकी विस पथदिवे बंद अवस्थेत आहेत. लाखो रुपये खर्च करून नागरिकांसाठी ही योजना आखण्यात आली परंतु योजनेतही अक्षरशः अंधारच दिसून येतो. नगरपरिषद देगलूरच्या प्रशासनाकडून यासंदर्भात मोठी गैरसोय होत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरुण तरुणींना धावताना दुखापत होऊ शकते. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी प्रश्नही उपस्थित होत आहे. या मार्गावर महाविद्यालयीन विद्यार्थी -विद्यार्थी, पोलिस व आर्मी भरती करणारे तरुण - तरुणी, विरंगुळ्यासाठी चालणारे जेष्ठ नागरिक, व्यायामासाठी येणारे देगलूरवासी मोबाईलचे टार्च चालू करुन मार्गक्रमण करीत आहेत. आतातरी प्रशासनाच्या डोक्यात कर्तव्य नावाच्या टार्चचा उजेड पडणार का?

या मार्गावर दिवे बंद असूनही कोणी चौकशी का करत नाही? महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? समाजाचा विकास करू इच्छिणाऱ्या लोकप्रतिनिधींना हा अंधार दिसत का नाही? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे या खांबावर राजकीय पुढाऱ्यांची बॅनरबाजी मात्र जोशात होत आहे. ते खांब नागरिकांना उजेड देण्यासाठी आहेत की राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनेरबाजीसाठी आहेत? हे आता नगरपरिषदेच्या प्रशासनाने घोषीत करावे, असा सवाल सुजाण नागरिकांकडून करण्यात येत आहे. आता पाहायचे इतकेच की, देगलूर नगरपरिषद अंधारावर प्रकाश टाकते का, की नागरिकांना आणखी काही दिवस टॉर्चच्या प्रकाशातच चालावे लागणार?

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या पार्श्वभूमीवर प्रा. कवाडे यांचे महामानवास अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१ नोव्हेंबर -**
लातूर शहरात उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फूट उंच 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' या भव्य पुतळ्याच्या उभारणीच्या पार्श्वभूमीवर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष एन.डी. सोनकांबळे, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनिस शेख, नांदेडचे बापूसाहेब गजभारे, लातूर शहराध्यक्ष दर्शन सोनकांबळे, मदन तुळजापूरे (उदगीर), आकाश तुळजापूरे, भालेराव, मिलिंद कांबळे, राजाभाऊ गायकवाड, अशोक लामतुरे, बालाजी कांबळे, अशोक सुतार, प्रा. सुमेध सोनकांबळे, प्रशांत बनसोडे, भगवान माने, बी.एम. कांबळे, वैभव माने, अनोज कांबळे, नरसिंग गायकवाड, आदेश बनसोडे, आकाश कांबळे, अजय गाथाडे, विजय उजळमकर, राघवेंद्र आदींची उपस्थिती होती.



### संक्षिप्त वृत्त...



## म. गांधी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांना विनम्र अभिवादन

**अहमदपूर, दि.१ नोव्हेंबर -**
भारताचे पहिले उपपंतप्रधान तथा पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान 'आयर्न लेडी' प्रियदर्शनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. विचार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमामध्ये प्रथम लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या जीवनावर प्रकाश टाकून राष्ट्रीय एकता दिनाचे महत्त्व प्रतिपादन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक श्री डी. के. गाजरे, श्री विशाल करंजे, श्री अभिषेक डहाळे, श्री राजमल्ले, श्रीमती गीर तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




## जी.पी. माने यांच्या कुटुंबीयांना जोगेंद्र कवाडे यांचे सांत्वन

**लातूर, दि.१ नोव्हेंबर -**
पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी पक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य गजानन पांडुरंग माने यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या परिवाराची भेट घेऊन सांत्वन व्यक्त केले. प्रा. कवाडे यांनी स्व. माने यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी नांदेड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव बापूसाहेब गजभारे, लातूर जिल्हाध्यक्ष एन. डी. सोनकांबळे, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनिस शेख, चाकूर तालुकाध्यक्ष मिलिंद कांबळे, लातूर शहराध्यक्ष दर्शन सोनकांबळे, तसेच बालाजी कांबळे, सुमेध सोनकांबळे, बी.एम. कांबळे, भगवान माने, वैभव माने, अनोज कांबळे, नरसिंग गायकवाड, आदेश बनसोडे, आकाश कांबळे आदी उपस्थित होते.

# औसा नगरपरिषदेतील मतदार नोंदणी गैरप्रकाराची चौकशी करावी

### विवेक मिश्रा यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१, नोव्हेंबर -**
औसा शहरातील नगरपरिषद निवडणुकीपूर्वी मतदार नोंदणी प्रक्रियेत गंभीर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत माजी नगरसेवक विवेक मिश्रा यांनी निवडणूक विभागाकडे चौकशीची मागणी केली आहे. शहरातील इतर चार प्रभागांतील सुमारे ६०० मतदारांची नोंद प्रभाग क्रमांक ४ मध्ये करण्यासाठी एकाच व्यक्तीने दाखल केलेले अर्ज बेकायदेशीर असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

मिश्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीप्रमाणे प्रभाग क्रमांक ४ मध्ये २५६५ मतदार आहेत, मात्र नव्याने सादर केलेल्या अर्जांद्वारे इतर प्रभागांतील ६०० मतदारांची नावे प्रभाग ४ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे. या अर्जांवर अर्जदारांच्या स्वाक्षऱ्या नसून अर्जदारही स्वतः उपस्थित नव्हते, तरीही पालिका प्रशासनाने ते अर्ज स्वीकारल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणूक विभागाच्या २२ डिसेंबर २०२३ च्या शुद्धीपत्रकानुसारच मतदार यादी कायम ठेवावी, आणि नव्याने दाखल केलेले सर्व अर्ज रद्द करण्यात यावेत, अशी मागणी मिश्रा यांनी केली.

त्यांनी पुढे सांगितले की, निवडणूक विभागाच्या सूचनांनुसार प्रभागांच्या सीमेवरील मतदारांची विशेष दक्षता घेणे आणि आवश्यकतेनुसार स्थळनिरीक्षण करणे अपेक्षित असते. मात्र औसा नगरपालिकेने हे नियम न पाळता राजकीय हेतूने मतदार स्थलांतराचा प्रयत्न केला आहे.

प्रभाग ३, ६, १० आणि ११ मधील रहिवाशांची घरे त्याच भागात असतानाही त्यांची



नावे प्रभाग ४ मध्ये हलवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने हा प्रकार निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करणारा आणि बेकायदेशीर असल्याचे मिश्रा यांनी सांगितले.

या प्रकरणी त्यांनी राज्य निवडणूक आयोग मुंबई, निवडणूक निर्णय अधिकारी औसा, सहाय्यक निवडणूक अधिकारी औसा आणि औसा नगरपालिका प्रशासन यांच्याकडे आक्षेप नोंदवले असल्याची माहितीही दिली.

## लातूरमध्ये 'बंटी-बबली'कडून नोकरीच्या आमिषाने २८ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१, नोव्हेंबर -**
रेल्वे आणि आयकर विभागात नोकरी लावून देतो असे सांगत लातूरमधील शरद जाधव किनीकर व अंजली जाधव किनीकर या दांपत्याने मुंबईतील युवक-युवतीकडून तब्बल २८ लाख २३ रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, सिद्धांत विजयकुमार बनसोडे व साक्षी वाघमारे या दोघांना रेल्वेतील टीसी व आयकर विभागात नोकरी देण्याचे आश्वासन देत मोठी रक्कम घेतली. नोकरीची बनावट नियुक्तीपत्रे पोस्टाने पाठवून त्यांना विश्वासात घेतले गेले. अगदी तीन महिन्यांचे बनावट ट्रेनिंगही घेतल्याचे सम ोर आले आहे. पैसे परत मागितल्यावर दांपत्याने धमक्या देण्यास सुरुवात केली. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर चंद्रकांत बनसोडे, सिद्धांत बनसोडे यांनी लातूर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून सखोल चौकशी सुरू केली आहे.

# भारताचा अभिमान! निलंगा तालुक्यातील रुपाली बोधे हिचा मलेशियात दमदार झळाळा

### भारतीय संघाची कर्णधार म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१, नोव्हेंबर -**
मलेशिया येथे पार पडलेल्या १५व्या आशियाई रस्सीखेच स्पर्धेत निलंगा तालुक्यातील बडूर गावची रुपाली विठ्ठल बोधे हिने भारतीय महिला संघाचे कर्णधारपद भूषवून देशाचे नेतृत्व केले. या स्पर्धेत भारतीय संघाने चौथे स्थान पटकावले असले, तरी रुपालीच्या जिद्द, परिश्रम आणि नेतृत्वगुणांमुळे तिच्या गावासह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रुपाली बोधे ही विठ्ठल बोधे यांची कन्या असून त्यांचे मूळ गाव बडूर (ता. निलंगा) आहे. रोजगाराच्या निमित्ताने विठ्ठल बोधे ठाणे येथे बिल्डिंग मटेरियलचा व्यवसाय करतात, तरीही त्यांचे गावाशी घट्ट नाते आजही टिकून आहे.

बालपणापासूनच मैदानी खेळांची



आवड असलेल्या रुपालीने २०१४ पासून रस्सीखेच खेळात सक्रिय सहभाग सुरू केला. तिच्या आजवरच्या कारकिर्दीत तिने शालेय जिल्हास्तरावर दोन सुवर्णपदके, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी, तसेच राष्ट्रीय असोसिएशन स्पर्धेत कास्यपदक मिळविले आहे.

मागील वर्षी ती महाराष्ट्र संघाची कर्णधार म्हणून निवडली गेली होती. नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तिने महिला आणि मिश्र गटातून दोन सुवर्णपदके जिंकत राज्याचा गौरव वाढविला होता.

या वर्षी मलेशिया येथे २४ ते २६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान झालेल्या आशियाई स्पर्धेत रुपालीला भारतीय संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. तिच्या या कामगिरीम ुळे बडूरसह संपूर्ण निलंगा तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, ग्रामस्थ, शिक्षकवर्ग आणि विविध सामाजिक संघटनांनी तिचा सत्कार करत उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

रुपालीच्या या यशामुळे गावातील अनेक मुलींना खेळ क्षेत्रात पुढे जाण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे.

## १७ नोव्हेंबरला पुण्यात शिक्षण आयुक्त कार्यालयावर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१, नोव्हेंबर -**
राज्यातील माध्यमिक शाळांम धील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या, प्रलंबित पदभरती व विविध शासन निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी पुण्यातील शनिवारवाड्यापासून शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे.

या मोर्चाचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षकेतर कर्मचारी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर करणार असून, लातूर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राजेश्वर चापुले, अमोल चामे, अनिल दरेकर, पांडुरंग देडे, अजय अरदवाड, जगन्नाथ येमले, तुळशीदास गोंदरकर, अमोल घुम ाडे यांनी केले आहे.

## व्हिएतनाममधील आंतरराष्ट्रीय आयुर्वेद व योग परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नारायण जाधव यांना निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१, नोव्हेंबर -**
व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी (HCMC) येथे होणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद व योग समिट आणि आरोग्य प्रदर्शन २०२५ या प्रतिष्ठित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक आणि भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली अंतर्गत मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोर्डाचे अध्यक्ष डॉ. नारायण जाधव यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

ही परिषद दोन दिवस व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी येथे होणार असून तिचे आयोजन सिफा-भारत, शिव आयुर्वेद व योग-सिंगापूर, आयुष विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि भारतीय दूतावास, व्हिएतनाम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.



ही आंतरराष्ट्रीय शिखर परिषद जगभरातील आयुर्वेदिक तज्ज्ञ, संशोधक आणि योगाभ्यासकांना एकत्र आणून भारतीय चिकित्सा पद्धतीबद्दल म ार्गदर्शन करण्यासाठी एक प्रतिष्ठित व्यासपीठ ठरणार आहे. तसेच या परिषदेचा उद्देश आयुर्वेद आणि योगाचा जागतिक प्रसार, विचारांची देवाणघेवाण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यदृष्टीने सहकार्य वाढविणे हा आहे.

डॉ. नारायण जाधव यांना या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रण मिळाल्याने उदगीर शहरासह संपूर्ण मराठवाड्यात आनंद व्यक्त केला जात असून त्यांच्या या कामगिरीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चाकूर तालुक्यातील भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार, कार्यकर्त्यांची बैठकीत एकमुखी संमती

**भाजप कार्यकर्त्यांचा ठराव : स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक स्वबळावर लढवावी.. चाकूर तालुक्यात सुसंवाद मेळावा पार...**

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१, नोव्हेंबर -**
चाकूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचा सुसंवाद मेळावा दि.३० ऑक्टोबर रोजी महालक्ष्मी हॉटेल, लातूर रोड येथे उत्साहात पार पडला. या बैठकीस तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत भारतीय जनता पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात असा ठराव एकमुखी मंजूर करण्यात आला.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपाध्यक्ष वसंत डिगोळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून चाकूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निळकंठ मिरकले उपस्थित होते. यावेळी चाकूर मंडळाध्यक्ष सिद्धेश्वर पवार, नळेगाव मंडळाध्यक्ष रणजीत मिरकले,



जिल्हा सरचिटणीस मनीषा नवने, रोहीदास वाघमारे, कपिल माकणे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, प्रदेश सचिव युवराज पाटील, अजय काळे, तुकाराम मद्दे, व्यंकटराव सोनवणे, नितीन रेड्डी, दयानंद पाटील, विठ्ठल धोंडगे, बालाजी सावंत, भागवत जानवळकर, श्रीहरी माळी, श्याम मुंजाणे, अंकुश जनवाडे, संतोष माने, सरपंच घनश्याम मस्के, किशनराव रेड्डी, गजानन बिराजदार, प्रशांत बिबराळे, यभरत गुरमे, दिलीप एनगे, तसेच दोन्ही मंडळातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.


या सुसंवाद बैठकीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका भारतीय जनता पक्षाने स्वबळावर लढवाव्यात. हा ठराव चाकूर मंडळाध्यक्ष सिद्धेश्वर पवार यांनी मांडला तर नळेगाव मंडळाध्यक्ष रणजीत मिरकले यांनी अनुमोदन दिले. अध्यक्ष वसंत डिगोळे यांच्या संमतीने ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

बैठकीत कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले की, ही कार्यकर्त्यांची निवडणूक असून, प्रत्येक कार्यकर्त्याला लढण्याची संधी मिळाली पाहिजे. सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या स्वाक्षरीने ठराव मंजूर केला असून, तो जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर यांच्याकडे पाठवण्यात येणार असल्याचे मंडळाध्यक्ष सिद्धेश्वर पवार यांनी सांगितले. तसेच, आगामी निवडणुका कार्यकर्त्यांनीच हातात घ्याव्यात आणि भाजपने स्वबळावर लढवाव्यात असे एकमत झाले. मात्र, जिल्हा तसेच राज्यातील वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील, तो कार्यकर्त्यांना मान्य असेल असा ठरावही बैठकीत एकमताने पारित करण्यात आला.

या बैठकीचे सूत्रसंचालन गजानन बिराजदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन नळेगाव मंडळाध्यक्ष रणजीत मिरकले यांनी केले.

# उदगीरमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि पर्यटन राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या हस्ते सोहळा संपन्न... उदगीरच्या इतिहासातील भव्य-दिव्य क्षण...**







### पुतळ्याची आकर्षक सजावट

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची व स्मारक परिसराची फुलांनी व विद्युत दिव्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. पुतळ्याचे तेजस्वी रूप पाहण्यासाठी हजारो भिमसैनिक आणि परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

### आदर्श शिंदे यांच्या भीम गीतांनी भारावले प्रेक्षक

पुतळा अनावरणानंतर दसरा मैदानात झालेल्या कार्यक्रमात गायक आदर्श शिंदे यांनी सादर केलेल्या भीमगीतांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. उपस्थितांनी गीतांना मोठी दाद देत डॉ. आंबेडकरांच्या जयघोषात कार्यक्रमाचा समारोप झाला.

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१, नोव्हेंबर -**
विश्वरत्न, भारतरत्न प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उदगीर शहरात उभारावा, अशी गेल्या अनेक दशकांपासून समाजबांधवांची मागणी होती. अखेर ही ऐतिहासिक मागणी पूर्ण झाली असून, माजी मंत्री व आमदार संजय बनसोडे यांच्या संकल्पनेतून कोट्यवधी रुपयांच्या खर्चाने हा भव्य पुतळा उभारण्यात आला.

नांदेड-बिदर मुख्य मार्गालगत उभारण्यात आलेल्या या पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि पर्यटन व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले. या वेळी शहरात आनंदाचे, अभिमानाचे आणि ऐतिहासिक वातावरण पाहायला मि ळाले.

याप्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. अमोल मिटकरी, भदंत उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद, भंते नागसेन बोधी, शिल्पा बनसोडे, बाळासाहेब सोळसकर, राम उदयसिंह निंबाळकर, अनिल ढिकले, मा.आ. गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, उषा कांबळे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, रामचंद्र तिरुके, सुशांत शिंदे, राम बोरगावकर, सोमानाथ जाधव, भरत चामले, समीर शेख, रामराव बिरादार, प्रभावती कांबळे, मन्मथ किडे, बालाजी भोसले, संग्राम हासुळे पाटील, सत्यवान पांडे, चंद्रकांत टेंगटोल, वसंत पाटील, सय्यद जानीमियां, शशिकांत बनसोडे, विठ्ठल चव्हाण, संतोष तिडके, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, अभिजीत औटे, तात्या पाटील, श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, गोविंद ब्रह्मांना, अम ोल अनकल्ले, मनोज पुदाले, रामराव राठोड, बालाजी केंद्रे, अनिल मुदाळे, अनिरुद्ध गुरुडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुतळ्याचे अनावरण फटाक्यांच्या आतषबाजीत व भव्य सोहळ्यात झाले. यावेळी महागायक आदर्श शिंदे यांनी सादर केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. दसरा मैदान, क्रीडा संकुल येथे झालेल्या या जाहीर सभेला हजारो भिमसैनिकांनी हजेरी लावून आनंदोत्सव साजरा केला.

पुतळ्याच्या उभारणीबद्दल माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचे सम ाजबांधवांकडून आभार मानले जात आहेत.